09-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGB/ 12:10

09-03-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.1

SGB/ MMP/ AKN/ 12:10

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवण्याबाबत

सभापती : आज दिनांक 9 मार्च, 2015 रोजी सकाळी 11.00 वाजता माननीय राज्यपालांनी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत अभिभाषण केले आहे. संसदीय परंपरेनुसार ज्या दिवशी माननीय राज्यपाल अभिभाषण करतात त्याच दिवशी सभागृहाच्या पटलावर अभिभाषणाची प्रत ठेवण्यात येते. तथापि, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत आज केवळ शोक प्रस्तावसंबंधीचे कामकाज घेण्याबाबतचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत आजच्या ऐवजी उद्या मंगळवार, दिनांक 10 मार्च, 2015 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : शोक प्रस्ताव
मु.शी. : श्री.रावसाहेब रामराव ऊर्फ आर.आर.पाटील, वि.स.स.व माजी उप मुख्यमंत्री; श्री.परशुराम मारुती चव्हाण, माजी वि.प.स. तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, श्री.रावसाहेब रामराव ऊर्फ आर.आर.पाटील, वि.स.स.व माजी उप मुख्यमंत्री; श्री.परशुराम मारुती चव्हाण, माजी वि.प.स. तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री.रावसाहेब रामराव ऊर्फ आर.आर.पाटील, वि.स.स.व माजी उप मुख्यमंत्री; श्री.परशुराम मारुती चव्हाण, माजी वि.प.स. तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांच्या निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै. रावसाहेब रामराव उर्फ आर.आर.पाटील यांचा जन्म दिनांक 16 ऑगस्ट, 1957 रोजी सांगली जिल्ह्यात तासगाव तालुक्यातील अंजनी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,एलएल. बी.पर्यंत झाले होते.

कै.पाटील यांनी सिध्देवाडी येथील वीरभद्र शिक्षण संस्थेचे संस्थापक, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, तासगाव येथील किसान नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक-चेअरमन, तासगाव तालुका शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन तसेच स्वामी रामानंद भारती सहकारी सूत गिरणीचे संस्थापक-चेअरमन म्हणूनही कार्य केले होते. राज्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. सांगली जिल्ह्यातील दुष्काळी भागाला पाणी मिळावे यासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कै.पाटील यांनी 1979-90 सांगली जिल्हा परिषदेचे सदस्य, 2003-2004 व 2008-2009 असे दोन वेळा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. ते राष्ट्रवादी काँग्रेस

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. महाराष्ट्राची मुलुख मैदानी तोफ, जनसामान्यांचा आर.आर. (आबा) अशीच त्यांची ओळख होती.

कै. पाटील सन 1990, 1995, 1999, 2004, 2009 व 2014 असे सहावेळा तासगाव - कवठेमहांकाळ मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे प्रतोद तसेच 1995-1999 याकाळात विधिमंडळ लोकलेखा समितीचे, समिती प्रमुख म्हणूनही उत्तम कार्य केले होते. सभागृहातील त्यांच्या कामकाजाची नोंद घेवून त्यांना 22 डिसेंबर, 1996 रोजी राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे पहिला "उत्कृष्ट संसदपटू" पुरस्कार देवून त्यांचा गौरव करण्यात आला होता. तसेच, त्यांनी 1999 ते 2003 या काळात महाराष्ट्र राज्याचे ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री म्हणून उत्तम कार्य केले होते. या काळात "संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान योजना" राज्यभर कार्यक्षमपणे राबविली. हीच योजना केंद्राने स्वीकारली. तसेच नोव्हेंबर, 2004 ते नोव्हेंबर, 2008 पर्यंत महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री व उप मुख्यमंत्री पदही त्यांनी भूषविले होते. तर महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभागृह नेते म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले होते. या काळात त्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासाचे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले होते. त्यांनी नोव्हेंबर 2009 ते ऑक्टोबर 2014 पर्यंत राज्याचे गृह मंत्री व गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते. याकाळात "डान्सबार बंदी" व "महात्मा गांधी तंटामुक्ती गाव योजना" राबविली. तसेच पोलीस खात्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कै.पाटील हे उत्तम संघटक, गोरगरिबांचा कैवारी, कुशल प्रशासक, अत्यंत कार्यक्षम व अभ्यासू, उत्कृष्ट संसदपटू, वक्तृत्व, नेतृत्व व कर्तृत्व या तिन्ही गुणांचा संगम असणारे जनमानसातील लोकप्रिय प्रतिमा असलेले नेते होते.

सभापती महोदय, या सभागृहात त्यांनी अनेकदा केलेली भाषणे खूप गाजली. 1990 पासून आतापर्यंत विधानसभेमध्ये ते ज्या ज्यावेळी निवडून आले त्यांच्या बरोबरीने मी सुध्दा निवडून आलो. कै.आर.आर.पाटील हे माझे चांगले सहकारी मित्र होते. अनेक प्रसंगांमध्ये आम्ही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

एकमेकांच्या सुख-दु:खामध्ये सामील होण्याचा अनुभव घेतला आहे. अत्यंत दिलखुलास व्यक्तिमत्व, मनमोकळा स्वभाव, मनामध्ये कोणताही किंतु बाळगणार नाही अशी त्यांची वृत्ती होती.

श्री.एकनाथराव खडसे.....

जनसामान्यांच्या विषयाची कदर करणारा माणूस, आपल्यावर टीकाटिप्पणी झाली तर अस्वस्थ होणारा संवेदनशील माणूस होता. एखाद्याने टीका केली तर लगेच त्याची नोंद घेऊन त्या टीकेच्या संदर्भात ताबडतोबीने खुलासा करणे किंवा आपली चूक सुधारण्यामध्ये पुढाकार घेणे हा त्यांच्या मनाचा मोठेपणा होता. सामाजिक जीवनामध्ये काम करीत असताना गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून त्यांनी काम केले. ते आव्हान त्यांनी स्वीकारले. गडचिरोली जिल्हयामध्ये मी देखील त्यांच्या समवेत प्रवास केला होता. त्यावेळी तेथील आदिवासींची वन जमिनींवरील अतिक्रमणे कायम करुन त्यांना भूखंड देण्याकरिता पुढाकार घेतला. त्यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात वन हक्क समितीसमोर आदिवासींचे सर्वाधिक दावे दाखल झाले आणि ते अधिकाधिक मंजूर झाले.

गडचिरोली हा अविकसित जिल्हा आहे. विकासाच्या दृष्टीने त्या जिल्हयाची वाटचाल होण्यामध्ये त्यांनी वेगवेगळ्या विभागांशी संपर्क साधून जाणीवपूर्वक प्रयत्न केले. राज्याच्या गृह खात्यातील त्यांच्या कामाची आपल्या सगळ्यांना कल्पना आहेच. अनेकदा आम्ही त्यांच्यावर टीका टिप्पणी केली. सावकारांच्या संदर्भात किंवा कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडल्याच्या संदर्भात असेल, त्यांनी मोकळेपणाने ती टीका स्वीकारुन त्याबाबत ताबडतोबीने उपाययोजना केली. कधीही मनामध्ये कोणताही आकस नसलेले आमचे नेते कै.आर.आर.पाटील आमच्यातून इतक्या लवकर निघून जातील असे वाटले नव्हते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्र शोकाकूल झाला आहे. त्यांचे जाणे मनाला चटका लावून गेले आहे. त्यांनी अनेक उपक्रम राबविले. त्यामधून अनेक मित्र जोडले गेले. ते विरोधी पक्षाशी अधिक जवळीक ठेवणारे आणि विरोधी पक्षाची कदर करणारे नेते होते. या सभागृहाच्या माध्यमातून काम करीत असताना विरोधी पक्षाच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक देण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व सर्वसामान्य लोकांसाठी आणि सर्व समाजासाठी सहाय्यकारी ठरले. सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये कै.आर.आर.पाटील म्हणजे आमचे आबा अशा स्वरुपाची भावना निर्माण झाली होती, अशी भावना मनामध्ये रुजली होती. असे व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेल्याबद्दल दु:ख होत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, काळ कोणासाठी थांबला नाही. मी ज्यावेळी त्यांची रुग्णालयामध्ये भेट घेतली, त्यावेळी अनेक विषयांवर त्यांच्याशी चर्चा करण्याचा योग आला. त्यांनी मला सांगितले की,

...4...

श्री.एकनाथराव खडसे.....

तंबाखूने घात केला. कोणालाही अशा प्रकारचे दुर्धर व्यसन लागू नये असे ते सांगत होते. त्यांनी तंबाखूच्या व्यसनाचा त्याग केला होता. परंतु दुर्दैवाने पुन्हा त्यांनी तंबाखू खाणे सुरु केले. आयुष्याच्या शेवटी शेवटी त्यांना गांभीर्यतेची जाणीव झाली होती. माझ्यापुढे दु:ख व्यक्त करताना ते अत्यंत भावनाविवश झाले होते. त्यांचे आणि माझे 25 वर्षाचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

नंतर श्री.भारवि....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे ....

मी त्यांच्या समवेत अनेक वेळा भोजन केले आहे, प्रवास केला आहे. ते माझ्या कुटुंबातील एक सदस्यच होते. ते माझे चांगले मित्र होते. त्यांचे आणि माझे नातेसंबंध होते. असा या माझ्या मित्राच्या जाण्याने मला दु:ख होत आहे. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. श्री.आर.आर.पाटील हे उत्कृष्ट संसदपटू होते. त्यांनी विधान सभेत केलेली भाषणे हा अमोल ठेवा आहे. टीकाटिपणी करताना ती कोणाच्याही जिव्हारी लागणार नाही याची ते नेहमी दक्षता घेत. ते जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष झाले तेव्हा त्यांच्या नेतृत्वाचे गुण अधिकच विकसित झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने त्यांच्या नेतृत्त्वाखाली अनेक निवडणुका जिंकल्या. त्यांच्या निधनाने पक्षाच्या हानी बरोबर समाजाची देखील हानी झाली आहे. अशा व्यक्ती फार कमी असतात की, ज्या घडता घडता फार मोठ्या होतात. एका सर्वसामान्य घरातून येऊन त्यांनी मोठा नावलौकिक मिळविला होता. आबा जाताना देखील लोकांच्या मनामध्ये स्थान निर्माण करून गेले. हीच त्यांच्या आयुष्यातील खरी पुण्याई आहे.

अशा या प्रचंड ध्येयवादी, विकासाची दृष्टी असणाऱ्या मुलुख मैदानी, जनमानसातील उमद्या नेत्याचे सोमवार दिनांक 16 फेब्रुवारी, 2015 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो अशी ईश्वरचरणी मी प्रार्थना करतो.

श्री.परशुराम मारुती चव्हाण यांचा जन्म 25 फेब्रुवारी, 1935 रोजी पुणे जिल्ह्यात भोर तालुक्यातील टापरेवाडी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,एलएल.एम.पर्यंत झाले होते.

श्री. चव्हाण यांनी 1966 ते 1980 पर्यंत फर्स्ट क्लास ज्युडिशिएल मॅजिस्ट्रेट व ॲडिशनल चीफ मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट म्हणून न्यायदानाचे काम केले होते. तसेच त्यांनी महाराष्ट्र अधिनाथ गोसावी समाज संघटना, आदर्श विद्यार्थी मंडळ तसेच भोर तालुका शेतकरी समाज सेवा संघाचे अध्यक्ष, अखिल भारतीय भटक्या जमाती व विमुक्त जाती महासंघाचे संस्थापक-अध्यक्ष तसेच अखिल भारतीय वकील परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक म्हणूनही कार्य केले होते. त्यांनी आयुष्यभर भटक्या विमुक्तांच्या उन्नतीसाठी विशेष योगदान दिले होते. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

श्री.चव्हाण 1980 मध्ये राज्यपालांव्दारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर नामनियुक्त झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 27 जानेवारी 2015 रोजी दु:खद निधन झाले.

कॉम्रेड गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांचा जन्म 26 नोव्हेंबर 1933 रोजी अहमदनगर जिल्ह्यात श्रीरामपूर तालुक्यातील कोल्हार येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,एलएल.बी. पर्यंत झाले होते.

श्री.पानसरे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत तसेच गोवामुक्ती लढ्यातही सक्रीय सहभाग घेतला होता.

श्री.पानसरे यांनी सुरुवातीस कोल्हापूर महानगरपालिकेच्या शाळेत अध्यापनाचे तसेच दहा वर्षे शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणूनही कार्य केले होते. तर काही काळ वकिलीही केली होती. निष्णात कामगार वकील म्हणून त्यांची सर्वत्र ओळख होती. त्यांनी कोल्हापूर डिस्ट्रीक्ट बार असोसिएशनचे अनेक वर्षे अध्यक्ष, ऑल इंडिया ट्रेड युनियनचे कार्याध्यक्ष, समाजवादी प्रबोधिनी संस्थेचे संस्थापक-सदस्य व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र शाखेचे सेक्रेटरी तसेच राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य म्हणूनही अनेक वर्षे कार्य केले होते. त्यांनी पक्षाच्या अनेक आंदोलनांचे नेतृत्वही केले होते. ते कम्युनिस्ट पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

श्री.पानसरे यांनी कामगार क्षेत्रात काम करताना कोल्हापूर जिल्हा फेरीवाला कामगार संघ, गिरणी कामगार युनियन, सहकारी नोकर महासंघ, बँक एम्प्लॉईज युनियन, महाराष्ट्र राज्य गट सचिव संघटना, दुग्ध उत्पादक कामगार संघ तसेच कोल्हापूर जिल्हा घरेलू कामगार मोलकरणी संघटना, कोल्हापूर जिल्हा म्युन्सिपल कामगार संघटना, श्रमिक प्रतिष्ठान तसेच भारतीय महिला फेडरेशन अशा उपेक्षितांच्या अनेक संस्था स्थापन करुन संघटित व असंघटित कामगार क्षेत्रातील व्यक्तींना त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी विशेष योगदान दिले होते. पुरोगामी विचार मंच, दुष्काळ निर्मूलन परिषद, जातीयवाद विरोधी लढे अशा सर्व चळवळीत ते अग्रभागी राहिले. त्यांनी आयुष्यभर कामगार क्षेत्राबरोबर समाजवादी चळवळीचे कार्य केले होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (पाटील)....

श्री.पानसरे यांनी "शिवाजी कोण होता?", "डंकेलचा हल्ला चौफेर" "जागतिकीकरण व शेतकऱ्यांचे प्रश्न", "परिवर्तनाच्या दिशा", "अजून न स्वीकारलेला मंडल आयोग", "पंचायत राज्याचा पंचनामा","काही कामगार कायद्यांची तोंड ओळख", "अंधश्रध्दा निर्मूलन कायदा आहे तरी काय" या सारख्या अनेक पुस्तकांचे लेखन केले होते. त्यांची ती पुस्तके खूपच गाजली होती. त्यांच्या या समाजवादी चळवळीतील केलेल्या कार्याबद्दल त्यांना "भीमक्रांती पुरस्कार," "भाई माधवराव बागल पुरस्कार" तसेच "कोल्हापूर भूषण पुरस्कार" देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला होता.

अशा या ज्येष्ठ विचारवंत व सतत पुरोगामी चळवळीत कार्य करणाऱ्या कामगार नेत्याचे शुक्रवार, दिनांक 20 फेब्रुवारी, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, श्री.आर.आर.पाटील, माजी उप मुख्यमंत्री, श्री.परशुराम मारूती चव्हाण, माजी वि.प.स. तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ.गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांच्या दु:खद निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो आणि ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो अशी भावना व्यक्त करतो.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माजी उप मुख्यमंत्री श्री.रावसाहेब रामराव ऊर्फ आर.आर.पाटील ऊर्फ आबा, श्री.परशुराम चव्हाण, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ.गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे (पाटील) यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यासंबंधी आम्हा सर्वांच्यावतीने भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

येथे बसलेल्या आम्हा सर्वांच्या आयुष्यात आबांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याची अभागी अशी वेळ नियतीने आज आणलेली आहे. अंजनी सारख्या एका छोट्याशा खेड्यातून आबांचे नेतृत्त्व उदयास आले. टप्प्याटप्प्याने त्यांचे नेतृत्त्व अधिकच विकसित होत गेले. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या हाडाच्या सामाजिक कार्यकर्त्याने महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या राजकारणामध्ये आपला वेगळा असा ठसा अल्पावधीच उमटविला. खरे तर असा अभागी क्षण येत आहे याच्या वेदना सर्वांनाच आहेत. नियतीच्या पलीकडे कोणाला जाता येत नाही असे आपण वारंवार बोलतो. त्याची पुनरावृत्ती आज झालेली आहे. आबांचा जन्म एका खेडेगावात झाला. त्यावेळचे त्यांचे दैनंदिन जीवन हे अत्यंत खडतर असेच होते. त्यांचे वडील हे समाजकारणामध्ये होते. परंतु, त्यांचे दुर्दैवाने अकाली निधन झाल्यामुळे घरातील सर्वात मोठा मुलगा म्हणून आबांवर सर्वांची जबाबदारी आली. आई सर्वांनाच घडवत असते. आबांच्या आईने देखील त्यांना घडविण्याचा प्रयत्न केला. खडतर परिस्थितीमध्ये शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा त्यांनी मनामध्ये ठेवली होती. मग ते शिक्षणासाठी कधी तासगावला तर कधी सांगलीला जात असत. शिक्षण घेत असतानाच कमवा आणि शिका या विचारातून त्यांनी प्रखर आत्मविश्वासाद्वारे शिकण्याचा प्रयत्न केला. एका बाजूला ते शिकतही गेले. त्याच बरोबर सामाजिक कार्याची गोडीही निर्माण झाली. खडतर परिस्थिती, गरीबी, हालअपेष्टा सोसत जीवनाचे स्वप्न पाहणाऱ्यांपैकी ते एक तरूण होते. ते आपल्या पद्धतीने शिकतही राहिले. शिकता शिकता सार्वजनिक कार्यात देखील त्यांनी फार मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित केले. विद्यार्थ्यांची चळवळ उभी केली. कॉलेज जीवनामध्ये स्नेह संमेलनाचे कार्यक्रम केले. त्यात त्यांनी हिरिरीने भाग घेतला. प्राचार्य पी.बी.पाटील यांचे संस्कार त्यांच्या मनावर बिंबले गेले. त्यामुळे विद्यार्थीदशेतच आबांसारखा हाडाचा कार्यकर्ता घडत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

गेला. आबा यांचा जन्म 1957 सालातील असून 1979 मध्ये ते जिल्हा परिषदेवर पहिल्यांदा निवडून आले. श्री.शरद पवार यांच्या नेतृत्तवाखाली त्यावेळी त्यांनी बैल ही निशाणी घेत सांगली जिल्ह्यातील निवडणूक लढविली होती. सांगली सारख्या जिल्ह्यातून निवडणूक लढविणे सोपे काम नव्हते. श्री.वसंतदादा पाटील यांचे नेतृत्त्व सांगली जिल्ह्याला लाभले आहे. आपल्या छातीवर गोळ्या घेत कृष्णा नदीमध्ये उडी टाकत स्वातंत्र्याची मशाल पेटविणाऱ्या श्री.वसंतदादा पाटील यांच्या जिल्ह्यामध्ये एका वेगळ्या विचाराने निवडणूक लढविणे सोपे नव्हते. पण ते धारिष्ट्य आबांनी 1979 मध्ये दाखविले. जिल्हा परिषदेवर निवडून आल्यानंतर तासगाव किंवा तेथील परिसरामध्ये न रमता ते जिल्हा परिषदेच्या कार्यालयात रमले.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

त्यावेळी पक्षातील उमेदवारांची संख्या कमी होती. जिल्हा परिषद निवडणुकीच्या माध्यमातून प्रथमच त्यांना विरोधी पक्षाच्या बाकावर बसण्याची संधी मिळाली. आबांमध्ये उपजतच लढाऊपणा होता. त्यांना उपजतच लढण्याचे बाळकडू मिळाले होते. त्या कालावधीत त्यांनी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांवर जिल्हा परिषद सदस्य या नात्याने आसूड ओढण्याचे काम आपल्या प्रभावी भाषणातून करुन एक वेगळा आविष्कार सांगली जिल्हा परिषदमध्ये घडविला. जिल्हा परिषदेमध्ये विरोधी बाकावर असताना देखील त्यांना आपले प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांकडे किंवा पदाधिकाऱ्यांकडे जाण्याची पाळी त्यांच्यावर आली नाही. याचे कारण म्हणजे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये आर.आर.पाटील कोणते प्रश्न विचारुन आपल्याला अडचणीत आणतील याचे भय पदाधिकाऱ्यांमध्ये होते आणि त्यामुळेच त्यांना कोणापुढे याचना करावी लागली नाही. या उलट जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि पदाधिकारी आबांकडे जायचे आणि त्यांना सांगायचे की,"आपली विकासाची कामे असतील तर ती सांगा, आम्ही ती कामे जरुर करु, परंतु आमच्यावर टीकाटिप्पणी करु नका" अशा प्रकारे सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम त्यांनी केले होते. त्यावेळी जिल्हा परिषदेच्या निवडणुका उशिरा झाल्यामुळे त्यांना 11 वर्षाचा कालखंड मिळाला. या कालखंडात आबांनी त्यांचा एक वेगळा प्रभाव निर्माण केला होता.

सभापती महोदय, सर्व काँग्रेस एकत्रित आली, त्यावेळी मी युवा काँग्रेसमध्ये काम करणारा एक छोटासा कार्यकर्ता होतो. सांगलीतील युवा काँग्रेस कार्यकर्त्यांची एक बैठक झाली होती त्यावेळी आर.आर.पाटील यांनी वसंतदादा पाटील यांची बाजू घेतली होती. तेव्हा पक्षांतर्गत काही घटना घडल्याचे मला आठवते. याचा अर्थ आपल्या नेतृत्वावर अपार निष्ठा ठेवून त्यासाठी पडेल ती किंमत मोजण्याची तयारी त्यांनी त्या वयामध्ये दाखविली होती.

सभापती महोदय, 1990 सालच्या निवडणुकीमध्ये आबांना विधानसभेची उमेदवारी मिळाली. आपण सांगली जिल्ह्यातील आहात. आपणास माहीत असेल की, त्याकाळी पश्चिम महाराष्ट्रात सांगली, कोल्हापूर आणि पुणे या भागात विधानसभेची उमेदवारी मिळविणे सोपे नव्हते. परंतु खेड्यापाड्यात जन्मलेल्या आबांसारख्या कार्यकर्त्याला विधानसभेची उमेदवारी मिळाली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

सभापती महोदय, मला आठवते की, वसंतदादांच्या दुर्दैवी निधनानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीमध्ये आपला विचार घेतला जात होता. आबांना 1990 मध्ये विधानसभेची उमेदवारी मिळाली. सांगली जिल्ह्यातील तासगावचा मतदारसंघ अतिशय जागरुक आहे. कोणाचीही सहजगत्या पाठराखण करणारा हा मतदारसंघ नाही. अशा मतदारसंघामध्ये विधानसभेची उमेदवारी मिळाल्यानंतर आबा प्रचंड मताधिक्क्याने निवडून आले. अशाप्रकारे आबा 1990 मध्ये विधानसभेवर प्रथम निवडून आले.

आबांचे शिक्षण बीए,एलएल.बी.पर्यंत झाले. त्यांनी कायद्याची पदवी घेतली, परंतु सनद घेतली नाही. त्यामुळे आबा न्यायालयात वकील म्हणून उभे राहिले नाहीत. ॲड.आर.आर.पाटील म्हणून ते ओळखले गेले नाहीत. त्यांनी न्यायालयात कधी युक्तीवाद केला नसेल, परंतु सरकारच्या न्यायालयात जनतेसाठी प्रखर युक्तीवाद करणारा ताकदीचा नेता आर.आर.यांच्या रुपाने आपण सर्वांनी पाहिला आहे. आपल्या पक्षाचे सरकार असो वा विरोधी पक्षाचे, त्यांनी जनतेचे प्रश्न अतिशय तळमळीने मांडले. लोकशाहीच्या न्याय मंदिरात जनतेचे प्रश्न प्रखर युक्तीवादाने मांडले. आपण सर्वांनी त्यांचे प्रश्न मांडण्याचे कसब पाहिले आहे. 1990-1995 या कालावधीत ते सत्ताधारी पक्षाचे सदस्य असताना देखील त्या परिसरातील एक अशांत टापू म्हणून ओळखला जायचा, त्या टापूमध्ये आबांचा सहभाग केव्हा झाला ते सुद्धा कळले नाही.

सभापती महोदय, राज्याचे नेतृत्व कधी आदरणीय शरद पवार साहेब करीत होते तर कधी श्री.सुधाकररावं नाईक करीत होते. सत्ताधारी पक्षामध्ये असतानाही त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील, सांगली परिसरातील, महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेचे प्रश्न हिरिरीने मांडले. 1995 मध्ये युतीचे सरकार आले त्यावेळी आबांचे एक वेगळे चित्र पहावयास मिळाले. त्या कालखंडात आबाची लक्षवेधी सूचना चर्चेला आली नाही असा एकही दिवस गेला नाही. मी 1995 मध्ये विधानसभेवर निवडून आलो होतो. मी तसा नवखा होता. मी प्रत्येक दिवसाची कामकाजपत्रिका पाहायचो त्यामध्ये आबा यांची लक्षवेधी सूचना आली नाही असा एखादा दिवस अपवादात्मक गेला असेल. त्या काळात त्यांची "लक्षवेधीफेम" अशी ओळख निर्माण झाली होती. आबा विधानसभेत फक्त आपल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

मतदारसंघातील प्रश्न मांडत नव्हते तर महाराष्ट्रातील प्रश्न मांडत होते. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी ते संसदीय आयुधांचा पुरेपूर वापर करीत होते. आबांनी फक्त लक्षवेधी सूचनांवर लक्ष केंद्रित केले नाही तर प्रश्नोत्तराचा तास, अर्धा तास चर्चेची सूचना, अर्थसंकल्पावरील भाषण, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा याद्वारे त्यांचे वाक्चातुर्य आपणा सर्वांना पहावयास मिळाले. विरोधी पक्षामध्ये असताना सुद्धा आपल्याला जे पाहिजे ते मिळविण्याची ताकद आपल्या शब्दांच्या माध्यमातून निर्माण करता येते हे त्यांनी आपल्या अमोघ वाणीतून महाराष्ट्राला दाखवून दिले.

सभापती महोदय, 1999 साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची निर्मिती झाली तेव्हा त्यांनी आदरणीय श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली, त्यावेळी मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नव्हतो. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये उशिरा प्रवेश केला. परंतु महिना-दोन महिन्यांनी मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला त्यावेळी श्री.अजित पवार, श्री.छगन भुजबळ आणि मी प्रवास करीत होतो. त्यावेळी श्री.अजित पवार यांना आबांचा फोन आला. फोनवर बोलताना श्री.अजित पवार आबांना म्हणाले की, "श्री.सुनील तटकरे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सहभागी होण्याचा निर्णय झालेला आहे." त्यांना अतिशय समाधान वाटले त्यांनी तत्काळ अजित पवारांना माझ्याकडे फोन देण्यासाठी सांगितले आणि त्यांनी फोनव्र माझे अभिनंदन केले. सन 1995-1999 या काळात आम्ही विरोधी पक्षात होतो आणि आबांनी विचारलेल्या प्रश्नांना मला उपप्रश्न विचारण्याची संधी अनेकदा मिळाली. आपल्या विभागातील प्रश्न सोडविण्यासाठी संसदीय आयुधाचा वापर कशा प्रकारे करावा याचे एकप्रकारे मार्गदर्शन मला त्यांच्याकडून मिळाले. आता आपण पुन्हा एकत्रपणे काम करणार आहोत याचा एक आनंद त्यांच्या बोलण्यातून मला त्यावेळी जाणवला होता.

सभापती महोदय, 1999 मध्ये सत्तांतर झाले. मी या ठिकाणी कोणत्याही राजकीय अभिनिवेषाने बोलत नाही. 1999 मध्ये सत्तांतर झाले त्यामध्ये आबांची 1995 ते 1999 मधील प्रभावी कारकीर्द कारणीभूत ठरली होती असा मी येथे नम्रतापूर्वक उल्लेख आबांना आदरांजली अर्पण करीत असताना करु इच्छितो. 1999 मध्ये आम्ही सत्तेवर आलो त्यावेळी आबांकडे ग्राम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

विकास विभागाचा कार्यभार देण्यात आला. त्यानंतर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची जबाबदारी देण्यात आली आणि त्या निमित्ताने आबांचे वेगवेगळे पैलू महाराष्ट्राने पाहिले.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांनी देशात "स्वच्छ भारत" अभियान सुरु केले आहे. या स्वच्छता अभियानाचा पहिला पाया आबांनी महाराष्ट्रात प्रथम रचला. आबांनी "संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान" सुरु केले. स्वच्छतेमध्ये लोकांचा सहभाग असला पाहिजे असे त्यांनी प्रथम सांगितले. पूर्वी लोकांचा कामामध्ये सहभाग असावा यासाठी लोकवर्गणी गोळा करुन कामे केली जात होती. गावात विहीर बांधायची असेल तर 30 टक्के, 25 टक्के लोकवर्गणी गोळा केली जात होती. परंतु ती पद्धत हळूहळू बंद झाली. आपल्या गावासाठी लोकांचा सहभाग ही संकल्पना मधल्या काळात पूर्णपणे संपुष्टात आली व सरकारच्या योजनेवर अवलंबून राहण्याची मानसिकता लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढली. तेव्हा ग्राम चळवळीतून आलेल्या आबांनी "संत गाडगे महाराज स्वच्छता अभियानाच्या" माध्यमातून राज्यात स्वच्छता अभियान सुरु केले. त्यानंतर केंद्र सरकारने "निर्मल ग्राम अभियान"म्हणून देशात प्रायोगिक तत्वावर योजना राबविली. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेला त्यांच्या उत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कार देण्याची संकल्पना आंबाना आणली. त्यांच्या नेतृत्वाचा कस असा टप्प्याटप्प्याने लागत गेला.

सभापती महोदय, सन 2003 मध्ये पक्षांतर्गत बदल करण्यात आला त्यावेळी आबांवर गृह विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली. सन 2003-20004 या कालाधीत त्यांचेवर गृह विभागाची जबाबदारी होती तसेच त्यांचेवर प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी आली.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

एकाच वेळी दोन पदांचा पदभार हातामध्ये घेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आपली एक वेगळी ओळख निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या निमित्ताने संत गाडगे महाराज म्हणूनच आबांची ओळख लोकांसमोर आली. रावसाहेब रामराव या नावाचे रुपांतर आर.आर.पाटील आणि त्यानंतर आर.आर.पाटील या नावाचे रुपांतर महाराष्ट्राचे 'आबा' म्हणून कधी झाले हे राज्यातील जनतेला कळले सुध्दा नाही. त्यानंतरच्या कालावधीत लोकांना आर.आर.पाटील हे नाव माहीत नव्हतेच. कारण 'आबा' या नावानेच आपण सर्वजण त्यांना ओळखू लागलो.

सभापती महोदय, 2004 च्या निवडणुकीला पक्ष सामोरे जात असताना आपले संघटन कौशल्य, चौफेर वक्तृत्व, लोकांसोबत जवळीक साधण्याचे वेगळ्या प्रकारचे कसब या बळावर त्यांनी पक्षाला महाराष्ट्रात सर्वाधिक जागा मिळवून दिल्या. त्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला उत्तम यश मिळाले. महाराष्ट्र विधिमंडळ पक्षाच्या नेते पदी आबांची 2004 मध्ये निवड झाली. तो क्षण सुध्दा मला आठवतो. राष्ट्रवादी भवनमध्ये आबांची विधिमंडळ नेतेपदी निवड झाली, त्यानंतरच काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाची निवड झाली. काँग्रेस पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदी श्री.सुशीलकुमार शिंदे की श्री.विलासराव देशमुख हा मुद्दा त्यावेळी समोर आला, पण त्यापूर्वी आबांची निवड झाली. मी या बाबत काही भाष्य करु इच्छित नाही. पण आबांची 2004 मध्ये विधिमंडळ नेतेपदी निवड झाली आणि उप मुख्यमंत्री पदाची जबाबदारी सुध्दा त्यांच्याकडे आली. उप मुख्यमंत्री पदाच्या जबाबदारीचे ओझे त्यांच्या मनावर खूप मोठ्या प्रमाणावर आल्याचा भास शपथविधी समारंभाच्या वेळी सर्वांच्याच लक्षात आला. उप मुख्यमंत्री पदाचा काटेरी मुकुट सुध्दा आबांनी लीलया पध्दतीने सहजपणे पेलला. त्या चार वर्षाच्या कालावधीत एका बाजूला गृहमंत्री पद, राज्याचे उप मुख्यमंत्री पद, या माध्यमातून राज्यामध्ये वेगळा संचार त्यांनी निर्माण केला. उभ्या महाराष्ट्रात सर्व ठिकाणी जाऊन त्यांनी आपल्या नेतृत्वाची आणि कर्तृत्वाची ओळख प्रस्थापित केली.

सभापती महोदय, "अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदानं" अशा आशयाचे एक गीत आहे. ज्यावेळी आबांची उप मुख्यमंत्री पदी निवड झाली त्यावेळी श्रीमती राही भिडे या 'लोकमत' वृत्तपत्रामध्ये काम करीत होत्या. त्यांनी वर्तमानपत्रात "अंजनीच्या सुता तुला शरदाचं वरदानं" या मथळ्याखाली लेख लिहिला होता. कारण अंजनी हे आबांचे गाव आणि शरद पवार साहेबांनी आबांना उप मुख्यमंत्री केले होते. अशा प्रकारचा उत्तम लेख वर्तमानपत्रात आला होता. आबांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

नेतृत्वाची एक वेगळी ओळख, त्यांच्या कर्तृत्वाचा वेगळा आलेख महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अतिशय चांगल्या पध्दतीने उभा राहिल्याचे चित्र पहायला मिळाले.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्राला मोठमोठ्या नेतृत्वाची परंपरा लाभलेली आहे. त्यात स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, आदरणीय शरद पवार साहेब, आपल्यासारखे नेतृत्व, त्या नेतृत्वाच्या बरोबरीने चालण्याची मनोभूमिका, खेड्यापाड्यामध्ये जन्मलेल्या, हाडाच्या कार्यकर्त्याने सातत्याने घेतली. म्हणून त्यांच्या विचाराचा प्रभाव त्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाला. 2008 मध्ये 26/11 चा दुर्दैवी हल्ला झाला. त्यावेळी त्यांच्याकडून झालेल्या एका शब्दाच्या चुकीमुळे त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला, याची खंत त्यांच्या मनात होती. खरे तर आबा आणि पत्रकार यांचे एक अतूट नाते जुळलेले होते. वर्तमानपत्रे असतील, चित्रवाहिन्या असतील. परंतु असा एक दिवस देखील गेला नसेल की, आबांचे नाव, आबांनी केलेले कार्य, आबांनी केलेल्या भाषणांचा उल्लेख वर्तमानपत्रांमध्ये किंवा चित्रवाहिन्यांमध्ये झाला नसेल. परंतु त्यांच्या राजीनाम्याचा निर्णय झाल्यानंतर त्यांच्या मनाला अपार वेदना झाल्या. वास्तविक पाहता त्यांच्या बोलण्याचा तसा अर्थ नव्हता. परंतु तो अर्थ दुर्दैवाने वेगळ्या पध्दतीने ध्वनित झाल्यामुळे त्या बाबतचे शल्य त्यांच्या मनामध्ये होते. आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर ते थेट आपल्या अंजनी गावी निघून गेले. ते कोठेच थांबले नाही. त्यांनी आपला राजीनामा माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवून त्याच दिवशी चित्रकूट बंगला सोडला. त्यांना आपल्या पदाचा मोह नव्हता. साधी गाडी घेऊन ते आपल्या गावी निघून गेले. त्यानंतर पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांच्याकडे आली. खरे तर त्यावेळी ती जबाबदारी माझ्याकडे देण्याचे नक्की झाले होते. 19 नोव्हेंबर रोजी बैठक घेऊन प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी माझ्याकडे देण्याचे पक्षश्रेष्ठींनी निश्चित केले होते. पण 26/11 च्या हल्ल्यामुळे सबंध राज्यात 7-8 दिवस वेगळे वातावरण निर्माण झाले होते. आबांनी पुन्हा एकदा प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारावी असा पक्षाकडून निर्णय घेण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे या ठिकाणी बसलेले आहेत. आज ते सत्ताधारी पक्षात असले तरी ते जेव्हा आमच्या बाजूला होते तेव्हा आबांना सांगलीहून आणण्याची जबाबदारी सन्मानीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्याकडे सोपविली होती. पुन्हा एकदा संघटनात्मक कामांसाठी त्यांच्या कर्तृत्वशैलीच्या, तसेच त्यांच्या संघटन कौशल्याचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पुरेपूर उपयोग पक्षाला झाला. तो काळ कठीण होता. वास्तविक पाहता सत्ता सोडल्यानंतर अनेकांना नैराश्य येत असते. पण आबांना नैराश्याने कधी ग्रासले नाही. त्यांच्या मनामध्ये एक सल आणि वेदना नक्कीच राहिली की, कोणतीही चूक नसताना त्यांना राजीनामा द्यावा लागला. पण पक्षश्रेष्ठींबद्दल अपार असलेल्या भावना कशा पध्दतीने व्यक्त करता येऊ शकतात याचे जिवंत उदाहरण आबांच्या त्या कालखंडात सुध्दा पहायला मिळाले. वर्षभर राज्याच्या कानाकोपऱ्यात फिरत पुन्हा एकदा संघटनेला वैभवाचे दिवस आणले पाहिजे या भूमिकेतून आबांनी काम करण्याचा प्रयत्न केला. 2009 मध्ये तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यानंतर त्यांनी सांगितले की, ज्या गृहमंत्री पदाचा मी त्याग केला आहे त्या पदाची जबाबदारी पुन्हा एकदा माझ्याकडे द्यावी. पक्षश्रेष्ठींनी, पवार साहेबांनी विश्वासाने पुन्हा एकदा त्यांच्याकडे ती जबाबदारी सोपविली आणि गेले पाच वर्षे ते राज्याचे गृहमंत्री म्हणून काम करीत राहिले. नवीन नवीन कल्पना, लोकाभिमुख काम करणे हा आबांच्या जीवनाचा आत्मा होता. त्यांनी संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान योजनेच्या माध्यमातून जसे काम केले, तसेच महात्मा गांधी तंटामुक्ती गाव योजनेच्या माध्यमातून वेगळ्या प्रकारचे काम करण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे आबांनी वकिलीची सनद घेतली नाही. पण जनतेच्या न्यायालयामध्ये जाऊन, पक्षाची अतिशय उत्तम पध्दतीने वकिली करणारा असा नेता आजपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सापडला नाही, याचाही अभिमानपूर्वक उल्लेख मी करु इच्छितो. अनेक वेळा आरोप-प्रत्यारोप होत असतात. जनतेच्या न्यायालयात आपण ज्यावेळी कौल मागण्यासाठी जात असतो तेव्हा पक्षाची भूमिका जनतेसमोर मांडण्याचे कसब आपल्या वक्तृत्वाच्या माध्यमातून, आपल्या अमोल वाणीतून त्यांनी उत्तमप्रकारे घडविले. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रामध्ये दोन्ही वेळा चांगल्या प्रकारचे यश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळाले. महात्मा गांधी तंटामुक्ती गाव योजना सुरु करीत असताना त्यांना ग्रामीण भागातील जन-जीवनाची आठवण खूप मोठ्या प्रमाणावर झाली. कारण गावागावात अनेक वेळा संघर्ष होत असतात. काही राजकीय संघर्ष असतात, काही कौटुंबिक संघर्ष असतात. काही वेळा समाजकारणातून संघर्ष होत असतात. आर्थिक भार आणि मानसिक स्वास्थ्य यामुळे ग्रामीण भागातील एकंदरीत व्यवस्था पूर्णपणे कोलमडून जात असते. अशावेळी प्रत्येक गोष्टीसाठी न्यायालयात जाऊन सामान्य माणसाला न्याय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मिळविता येत नाही. अशा वेळी आपसामध्ये बसून, तडजोडी करुन त्यातून वेगळ्या प्रकारचे जनजीवन महाराष्ट्रात निर्माण करता येऊ शकता येते काय, अशी भावना आबांच्या मनामध्ये त्या काळात आली आणि महात्मा गांधी तंटामुक्त अभियान योजनेची सुरुवात देशात सर्वप्रथम गृह विभागाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली सुरु केली. त्या योजनेला उत्तम असा प्रतिसाद राज्यभरातून मिळाला. माझ्या जिल्ह्याचा मी अभिमानपूर्वक उल्लेख करीन. कारण पहिले दोन-तीन वर्षे रायगड जिल्ह्याने तंटामुक्ती गाव अभियानात यश मिळविले. सांगली जिल्ह्यासारखा आमचा रायगड जिल्हा सुध्दा संवदेनशील आहे. तसेच राजकीयदृष्ट्या खूप मोठ्या प्रमाणावर प्रगल्भ आहे आणि त्या जिल्ह्यात वैचारिक संघर्ष असायचा. परंतु त्या जिल्ह्याने तंटामुक्ती गाव योजनेत उत्तम पध्दतीने काम केले याचा सार्थ अभिमान आबांच्या चेहऱ्यावर दिसायचा. अलिबागला ते ज्यावेळी कार्यक्रमासाठी आले त्यावेळी त्यांच्या बोलण्यातून सुध्दा आम्हाला तो अभिमान कुठे ना कुठे अनुभवायला मिळाला.

सभापती महोदय, उत्कृष्ट संसदपटू म्हणून काम करीत असताना 2014 च्या निवडणुकीला आम्ही सर्वजण सामोरे गेलो. अलीकडच्या काळात आबा मंत्री असताना व मी प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर, ज्या ज्यावेळी मी आबांबरोबर चर्चा करायचो त्या त्यावेळी ते काही वेळा शून्य नजरेमध्ये बसलेले असायचे. मी सहजगत्या त्यांना विचारायचो की, आबा, तुम्ही चिंताग्रस्त का आहात ? पण आबांनी मोकळेपणाने कधीही भावना व्यक्त केल्या नाहीत. ते सांगायचे की, एकंदरीत राज्यात निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता, पक्षाच्या भवितव्याच्या वाटचालीबाबत माझ्या मनात चिंता आहे. त्यावेळी त्यांना कुठल्या आजाराने ग्रासले आहे की काय, अशी पुसटशी कल्पना सुध्दा कोणाच्या मनात आली नाही. काही वेळा मानव जीवनामध्ये वावरत असताना माणसाला कोणत्या ना कोणत्या गोष्टीची कळत नकळत सवय लागते. सवयीला आपण व्यसन म्हणू शकतो किंवा सवयही म्हणू शकतो. जीवनाचा तो एक तऱ्हेचा अविभाज्य घटक बनत असतो. अशा वेळी ती सवय अनेक वेळा कितीही प्रयत्न केला तरी सुटू शकत नाही. अजितदादांनी त्यांच्या सवयीबाबत जाहीररित्या सांगितले त्यावेळी अनेकांना क्लेश वाटला असेल. पण आबांचे जीवन कधी व्यक्तिगत राहिलेच नाही, ना त्यांनी संसारिक आयुष्य त्या निमित्ताने केले, 15-20 वर्षांच्या कालखंडात वहिनींना, मुलांना चित्रकूट बंगल्यावर आणून आपल्याला मिळालेल्या अधिकाराचे, वैभवाचे प्रदर्शन त्यांनी कधी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

केले नाही. घरातील कुटुंब बंगल्यावर आणणे म्हणजे वैभव प्रदर्शित करणे असे होत नाही. पण तरी सुध्दा आबांनी आपल्या राजकीय जीवनात तो मोह सतत टाळला. तुम्ही याला मोह टाळला म्हणा किंवा अन्याय केला म्हणा. पण आबा एका नीतिमूल्यातून सचोटीने वागणारे नेतृत्व असल्यामुळे ते त्या गोष्टीपासून दूर राहिले. परंतु अलीकडच्या कालावधीत एकाकीपणाचे जीवन जगत असताना, विधानसभेच्या निवडणुकांना सामोरे जात असताना सर्वांनाच वाटत होते की, आबांना यावेळची निवडणूक खूप कठीण जाणार आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी त्यांच्या मतदारसंघात खूप मोठया मताधिक्याने राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा उमेदवार पाठीमागे राहिल्यानंतर सर्व ठिकाणी एक असा समज व प्रवाह निर्माण झाला की, आता आबांची निवडणूक ही सर्वात कठीण अशी निवडणूक आहे. पण आबा मला, आदरणीय श्री. शरद पवार साहेबांना व श्री. अजित दादांना सांगायचे की, यावेळी मी आतापर्यंत निवडून आलो त्यापेक्षाही जास्त मतांनी निवडून येईन. राज्यात अन्य ठिकाणी जर प्रचाराला जायचे असेल तर मला सांगा. आबा त्याप्रमाणे स्वतःच्या मतदारसंघात कमी वेळ देत पक्षाच्या राज्यातील इतर उमेदवारांसाठी त्यांच्या मतदारसंघामध्ये सुध्दा गेले आणि तरीही ते मोठ्या मताधिक्याने निवडूनही आले. परंतु, त्यानंतर त्यांचा राहिलेला कालखंड अतिशय कमी होता.

त्यानंतर नवीन सरकार प्रस्थापित झाले. सरकार प्रस्थापित झाल्यानंतर विधिमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून आबांची निवड झाली. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांच्या साक्षीने ज्यावेळी पत्रकार परिषद झाली त्यावेळी आबा आले. आबांची विधिमंडळ राष्ट्रवादी पक्षाचे गटनेते म्हणून घोषणा करून त्यांच्यावर जबाबदारी दिली गेली. त्यानंतर विधानसभेचे शपथविधीचे अधिवेशन ठरले. त्यावेळी सरकारमधील काही ठराविक सन्माननीय सदस्यांचा शपथविधी झाला होता. विधानसभा सभागृहाचे पहिल्या दोन दिवसांचे कामकाज मी, सन्माननीय श्री. दिवाकर रावते साहेब गॅलरीतून पाहत होतो. पहिले दोन दिवस शपथविधीचा कार्यक्रम झाला आणि तिसऱ्या दिवशी विधानसभा अध्यक्षांची निवड आणि विरोधी पक्षनेत्यांची निवड असे दोन कार्यक्रम कार्यक्रमपत्रिकेवर होते. विधानसभा अध्यक्षांच्या निवडीच्या वेळी आबांनी केलेले भाषण उत्तम होते. खरे तर त्यांना त्यांच्या आजारपणाची जाणीव नक्की झालेली असेल. सन्माननीय श्री. गिरीष बापट यांना चिमटा घेत आबांनी केलेले भाषण खूप चांगले होते. सन्माननीय श्री. गिरीष बापट साहेब विधानसभा अध्यक्ष होतील असे आम्हाला वाटत होते. एका बाजूला सन्माननीय श्री. गिरीष बापट साहेब यांना चिमटा घेत आणि दुसऱ्या बाजूला विधानसभा अध्यक्ष श्री. हरिभाऊ बागडे यांचे कौतुक करीत आबांनी केलेले भाषण म्हणजे त्यांच्या उत्कृष्ट वक्तृत्वाचा एक आविष्कार होता. त्यावेळी जीवघेणा आजार झाल्याची कल्पना त्यांना नक्कीच आली होती. कारण नंतरच्या कालावधीत ते व्यथित अंतःकरणाने बोलत होते. त्यावेळी ते दवाखान्यातून आले नव्हते. त्यांच्या गालावर गाठ आल्यासारखी दिसत होती. आम्ही त्याबाबत विचारले असता ते ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

म्हणाले की, माझी दाढ सुजली आहे. इतका गंभीर आजार झाला आहे असे समजले असताना सुध्दा सभागृहात येणे आणि सभागृहाच्या नेतृत्वाविषयी आदराची भावना व्यक्त करणे हे काम कोणालाही कधीच आयुष्यात जमू शकत नाही असे मला वाटते. साक्षात मृत्यू, यमदेवच मला नेण्यासाठी आला आहे इतकी जाणीव त्यावेळी त्यांना झालेली असताना सुध्दा सभागृहात येऊन विधानसभेच्या अध्यक्षांच्या संदर्भात केलेले भाषण हे त्यांच्या उत्कृष्ट भाषणशैलीचाच एक नमुना होता. माननीय अध्यक्षांची निवड झाली. सन्माननीय विरोधी पक्षनेते म्हणून श्री. एकनाथराव शिंदे यांची निवड झाली. त्यावेळी सुध्दा आबांनी भाषण केले. मी, सन्माननीय श्री. दिवाकर रावते साहेब गॅलरीमध्ये बसलो होतो. दोन्ही निवडीच्या वेळी व्यक्तिमत्वांचा गौरव करीत असताना आबांनी केलेले चौफर मिश्किल भाषण खूपच सुंदर होते. आबांनी त्यांच्याबद्दल असलेली मिश्किलता, राजकीय अभिनिवेश या दोन्हींच्या संदर्भात केलेले भाषण यातून आता पुढील 5 वर्षांत आपल्याला काय ऐकावे लागणार आहे याची एक तऱ्हेची चुणूक त्यांनी सत्तारूढ पक्षाच्या बाकांवरील सर्वांना दाखविली होती. प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर आबांनी केलेली त्या दोन भाषणांच्या संदर्भात मला असे वाटते की, संसदीय लोकशाही प्रणालीमधील अत्यंत उत्तम तऱ्हेची ती भाषणे ठरू शकतील. कारण आपले जीवन अत्यंत मर्यादित कालावधीचे आहे याची जाणीव त्यांना एकट्याला व्यक्तिगतरित्या झाली होती. त्यांचे त्यानंतरचे दिवस तर खरेच खूप व्यथित करणारे ठरले. आबांनी 13-14 तारखेला भाषण केले. त्यानंतर आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रतिनिधींचे, 100-150 कार्यकर्त्यांचे एक शिबिर अलिबागला ठेवले होते. शिबिरास कोण कोण येणार आहे हे बघण्यासाठी मी प्रदेशाध्यक्ष म्हणून सर्वांना फोन करीत होतो. मी आबांच्या स्वीय सहायकांना फोन केला आणि आबा केव्हा येणार आहेत असे विचारले. आबांच्या स्वीय सहायकांनी सांगितले की, आबा आईला घेऊन दिल्लीला गेले आहेत. आबा दिल्लीला जाणे कधीच शक्य नव्हते. मी म्हटले की, काय खोटे सांगता ? त्यावेळी ते म्हणाले की, ते आयुष्यात पहिल्यांदा कुटुंबाला दिल्लीला घेऊन गेले आहेत. त्यामुळे आबा कदाचित पक्षाच्या कार्यक्रमाला येणार नाहीत.

पक्षाची कोणतीही सभा असली तरी आबा अनुपस्थित आहेत असे कधी घडले नव्हते. विधानसभेच्या पराजयानंतर होणारे पक्षाचे ते पहिलेच चिंतन शिबिर होते आणि त्याला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

आबा नाहीत ही कल्पना मनाला पटू शकत नव्हती. दिवसभरात आमचे चिंतन शिबिर पार पाडले. आदरणीय श्री. शरद पवार साहेब त्या शिबिरास होते. संध्याकाळी आम्ही सर्वजण बसलो. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी आम्हा दोघा तिघांना बोलावून विचारले की, आबा कुठे आहेत, आम्ही सांगितले की, आबांच्या स्वीय सहायकांना फोन केला असता त्यांनी सांगितले की, आबा कुटुंबासमवेत दिल्लीला गेले आहेत. साहेबांनी सांगितले की, तुम्हाला काही तरी चुकीची माहिती मिळाली आहे. आबा चेन्नईच्या परिसरात हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत अशी माझी माहिती आहे. राजकीय जीवनात अनेक चढउतार पचविलेल्या आदरणीय श्री. शरद पवार साहेबांच्या चेहऱ्यावरील वेदना आम्ही तेथील काही मोजके सहकारी पाहत होतो. साहेब सारखे फोन करीत होते. त्यांनी त्यांच्या कन्येला सुध्दा फोन लावला. परंतु आबा कुठे आहेत हे काही सांगितले जात नव्हते. स्व. विलासरावजी चेन्नईला ज्या अपोलो हॉस्पिटलमध्ये होते त्या ठिकाणीही फोन लावला, आबा तेथे आहेत का पाहिले. शेवटी संध्याकाळचे जेवण बाजूला सारून साहेब बाजूला गेले. त्यांना सततची काळजी लागली होती की, आबा कुठे आहेत. दुसऱ्या दिवशी शिबिर संपल्यानंतर साहेब मुंबईला आले, त्यावेळी समजले की, आबा ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाले आहेत. आपला जीवघेणा आजार त्यांनी सर्वांपासून का लपवून ठेवला याचे उत्तर आता मिळणार नाही. काळाच्या ओघात सुध्दा त्याचे उत्तर कोणालाच मिळू शकणार नाही. ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली, त्यानंतर आम्हा सर्वांना समजले. आबांनी असे का केले याचे उत्तर कोणालाही कधी मिळू शकत नाही. त्यांच्या आजाराचे निदान 6 महिने अगोदरच झाल्याचे त्यांच्या व्यक्तिगत सहकारी डॉक्टरांनी आम्हाला सांगितले. 6-8 महिने इतका मोठा आजार त्यांनी अंगावर काढणे याची कारणमीमांसा कोणाला कधी कळू शकत नाही. मी म्हटल्याप्रमाणे त्या प्रश्नाचे उत्तरही कधी मिळू शकत नाही. त्यावेळी सुध्दा ते हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी जाण्यास तयार नव्हते. डॉ. संजय आणि आबांच्या बरोबर असलेले तासगाव परिसरातील डॉक्टरांनी आबांना गाडीत बसवून बळजबरीने ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले आणि आबांवर शस्त्रक्रिया केली. ती शस्त्रक्रिया फार मोठी होती. आबा 2-3 दिवस कुठे आहेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

हे पोलिसांना तपास करूनही कळू शकत नव्हते. ते कुठे आहेत याचा पोलीस यंत्रणा वेगवेगळ्या पध्दतीने तपास करू लागली. आपला आजार कोणाला कळू नये, आपल्या व्यक्तिगत वेदना कोणाला जाणवू नयेत याची खबरदारी या नेतृत्वाने अखेरच्या कालखंडात सुध्दा घेतली. हे वास्तववादी चित्र क्लेशकारक असले तरी सुध्दा आपल्या सर्वांना ते समजणे अत्यंत आवश्यक आहे. मी, माननीय श्री. अजित दादा ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलमध्ये त्यांना भेटण्यास गेलो, त्यावेळी शस्त्रक्रिया होऊन 4-5 दिवस झाले होते. आम्ही ज्यावेळी ब्रीच कॅण्डीमध्ये गेलो त्यावेळी आम्ही 5 मिनिटे नि:शब्द झालो. आबांवर मोठी शस्त्रक्रिया झाली होती. आबांना बोलताही येत नव्हते. आम्ही दोघेही नि:शब्द एवढ्यासाठी होतो की, आबांनी हा आजार झाला असल्याचे आम्हाला किंवा कुटुंबाला सांगितले नव्हते. आम्हाला हे माहीत नव्हते. साधे लागले तरी सुध्दा पत्नीला, आईला, मुलांना सांगावे अशी भावना प्रत्येकाच्या मनात असते. दुर्धर आजारावरील इतकी मोठी शस्त्रक्रिया झालेली असताना सुध्दा त्यांनी त्याबाबत आपल्या कुटुंबाला किंवा आम्हाला कोणालाही कळू दिले नाही. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांवर शस्त्रक्रिया केलेल्या ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलच्या मोठ्या डॉक्टरांनी आबांच्या संदर्भात निदान केले होते. पण आबांनी त्यांना शपथ घातली होती की, माझा आजार कोणालाही सांगायचा नाही. मन आणि त्यांच्या भावना किंवा आजाराबद्दल त्यांच्या मनात निर्माण झालेली निराशा ही काही कळू शकली नाही. आम्ही भेटायला गेल्यानंतर 5-10 मिनिटांनी ते मोकळेपणे बोलू लागले. ते एवढेच म्हणाले की, आता मी डिसचार्ज घेतो. मला नंतर नागपूरच्या अधिवेशनासाठी यायचे आहे. किती प्रखर आत्मविश्वास आणि इच्छाशक्ती असते ते पहा. आबा यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते म्हणून निवडले गेले होते. मोठी शस्त्रक्रिया, नाकामध्ये लावलेली नळकांडी आणि तरीही ते एक वाक्य बोलले की, मला काहीही करून नागपूरच्या अधिवेशनात सहभागी होण्यास यायचे आहे. नियतीच्या मनात काही वेगळेच होते. गटनेता झाल्यानंतर पुन्हा नागपूरच्या अधिवेशनात न येण्याची नियतीने खबरदारी घेतल्यासारखेच ते होते. त्यांच्या तब्बेतीमध्ये चढउतार होत गेले. ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलमधून डिसचार्ज मिळाल्यानंतर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

माननीय श्री. वसंत डावखरे साहेबांच्या बंगल्यावर ते होते. त्यावेळी सुध्दा मी भेटण्यास गेलो. त्यावेळी त्यांचे आजारावरील पुढील उपचार सुरू झाले होते. ते भेटल्यावर म्हणाले की, सभागृहात आपण आपले काम सतत करीत रहा. मी लवकरच दुसऱ्या आठवड्यात का होईना नागपूरला येणार आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

आम्हाला कळले होते की, आता आबा नागपूरच्या अधिवेशनाला येऊ शकणार नाहीत. त्यानंतरच्या काळात त्यांच्या आजाराबद्दलच्या वेगवेगळ्या बातम्या आमच्यापर्यंत येत राहिल्या. कधी त्यांच्याकडून उपचाराला प्रतिसाद मिळत होता तर कधी तो मिळतही नव्हता. नंतर मग ते ब्रिच कँडी रुग्णालयातच होते. त्या रुग्णालयात महिना-दीड महिन्याचा कालावधी गेला. आबा आपल्याला झालेल्या आजाराशी झुंजत होते. त्यांचे त्यांनाच हे कळले होते की, यामधून आपली मुक्तता होणार नाही. तरी सुध्दा ज्या ज्या वेळी आमच्यापैकी कुणी त्यांना भेटावयास जायचे त्यावेळी "कसे चालले आहे", अशी विचारणा त्यांच्याकडून होत असे. काही वेळा तर त्यांना बोलताही येत नसे. अशा वेळी कागदावर लिहून ते त्यांच्या भावना व्यक्त करायचे. बांधिलकी किती मोठ्या प्रमाणात असू शकते, याचे मूर्तिमंत उदाहरण आबांच्या रुपाने आपल्या सर्वांना पहावयास मिळाले. त्यानंतर तो काळा क्षण आला आणि आबांच्या दुर्दैवी निधनाची बातमी आपल्या सर्वांना समजली. संपूर्ण महाराष्ट्रभर शोककळा पसरली. मागील काही काळात महाराष्ट्राला काय झाले आहे, हेच समजेनासे झाले आहे. या कालखंडात महाराष्ट्र मोठमोठ्या नेत्यांना मुकला. माजी मुख्यमंत्री सन्माननीय विलासरावजी देशमुख यांचा मृत्यू महाराष्ट्राला चटका लावून गेला, गोपीनाथराव मुंडेंचा मृत्यूही आपल्या सर्वांना चटका लावून गेला, आबा तर साधारणपणे त्यांच्यापेक्षा 7/8 वर्षांनी लहान होते, पण त्यांचाही मृत्यू महाराष्ट्राच्या समाजकारणाला आणि राजकारणाला चटका लावून गेला.

सभापती महोदय, आबा म्हणजे आमच्या पक्षाची प्रतिमा, पक्षाची ओळख, पक्षाचा चेहरा होते आणि त्याच दृष्टीने आबांकडे सर्वजण अतिशय विश्वासाने पहात होते. आमच्यावर सातत्याने आरोप होत होते. पण आबांचा चेहरा लोकांसमोर ठेवल्यानंतर लोक पक्षाच्या पाठीशी उभे राहतील, असा आत्मविश्वास आमच्यामध्ये होता. आबांनी लोकांमध्ये एक वेगळे स्थान निर्माण केले होते. म्हणूनच त्यांच्यावरील अंत्यसंस्कारसमयी लाखोंचा जनसमुदाय जमला होता, सर्व राजकीय पक्षांचे नेते सुध्दा उपस्थित होते. आबांना चिताग्नी दिला गेला तसा दुर्दैवी क्षण पुन्हा आपल्या आयुष्यामध्ये कधी येऊ नये, अशा भावना या निमित्ताने मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, आबांना आपल्या सर्वांच्या वतीने, संकुचित अर्थाने नव्हे तर खरोखरच सर्वांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्यांचे विचार, त्यांचा हसरा चेहरा, त्यांचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

निरागस वागणे, त्यांचा मिश्कीलपणा, त्यांचा हजरजबाबीपणा, उत्कृष्ट वक्तृत्त्व या सर्व गोष्टी पुढील कालावधीत चिरकाल आपल्या सर्वांच्या स्मरणात राहतील, अशा भावना व्यक्त करुन त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. आबांच्या जाण्याने व्यक्तिश: आमचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पण जी नवीन पिढी आज राजकारणात आहे, ते एका चांगल्या नेतृत्त्वाला दुर्दैवाने मुकले आहेत, असेच आज म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री.परशुराम मारुती चव्हाण यांचे देखील दु:खद निधन झाले आहे. ते सन 1980 मध्ये राज्यपालांव्दारा विधानपरिषदेवर नामनियुक्त झाले होते. अशा एका थोर समाजसेवकाचे निधन झाले आहे. स्व.चव्हाण साहेबांनी फर्स्ट क्लास ज्युडिशिएल मॅजिस्ट्रेट व ॲडिशनल चीफ मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट म्हणून न्यायदानाचे देखील काम केले आहे. अखिल भारतीय भटक्या जमाती व विमुक्त जाती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले होते. अशा या व्यक्तिमत्त्वालाही मी आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांना देखील आज आपण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. ज्या राजर्षी शाहू महाराजांनी पुरोगामी विचार महाराष्ट्राला कोल्हापूर सारख्या ठिकाणी राहून दिला, त्याच शहरात डाव्या विचारसरणीच्या, पुरोगामी विचाराच्या नेतृत्त्वाची हत्या झाली, याचे शल्य आणि दु:ख आज आपल्या सर्वांच्या मनामध्ये आहे.

सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ तसेच गोवामुक्ती लढ्यातही त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. या नेतृत्त्वाने अलीकडे वय झालेले असतानाही महाराष्ट्रासाठी, कोल्हापूरसाठी, वेगवेगळ्या प्रश्नांसाठी अखंडपणे आपले विचार प्रखरतेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अशा एका पुरोगामी नेतृत्त्वाला, सामाजिक कार्यकर्त्याला आज आमच्या सर्वांच्या वतीने मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, पुन्हा आमच्या कुणाच्याच आयुष्यामध्ये आबांसारख्या नेतृत्त्वाला किंवा तेवढ्या वयातील कुठल्याही सहकाऱ्याला श्रध्दांजली वाहण्याची अभागी वेळ आमच्यावर येऊ नये. आबांचे स्मरण आणि आबांचा हसरा चेहरा हीच आमच्या भविष्याची ठेव आहे, असे मी मानतो. पुन्हा एकदा या सर्व थोर नेत्यांना आदरांजली वाहतो आणि थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : आजच्या शोक प्रस्तावाच्या अनुषंगाने माझ्याकडे एकूण 20 सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत. आपली प्रथा अशी आहे की, सभागृहाचे नेते शोक प्रस्ताव मांडतात, सन्माननीय विरोधी पक्ष नेते त्यांना पाठिंबा देतात, त्यानंतर विविध पक्षांचे गटनेते आपल्या भावना व्यक्त करतात आणि शोक प्रस्ताव संमत होतो. आज मी एक अपवाद म्हणून जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना भावना व्यक्त करण्यासाठी संधी देण्याचा प्रयत्न करीत असलो तरी सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण तीन ते चार मिनिटांत किंवा जास्तीत जास्त पाच मिनिटात कसे पूर्ण होईल, असा प्रयत्न करावा, अशी माझी विनंती आहे. मी जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देईन. परंतु, सन्माननीय सदस्यांनी कमीतकमी वेळेत आपल्या भावना व्यक्त कराव्यात, एवढीच माझी विनंती आहे.

आता सन्माननीय सदस्य श्री.अनंतराव गाडगीळ यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.अनंत गाडगीळ (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मला आज एका प्रसंगाची आठवण होत आहे. साधारणपणे 17 ते 18 वर्षापूर्वी राज्याच्या युवक काँग्रेसचे पदाधिकारी म्हणून माझी आणि आबांची निवड झाली. टिळक भवनला आम्ही एकत्र आलो आणि बैठक संपल्यानंतर बाहेर पडताना आर.आर.पाटील साहेबांनी मला असे विचारले की, "तुम्ही मंत्रालयाकडे जाणार आहात का, तिकडेच जाणार असाल तर आपण एकत्र टॅक्सी करुन जाऊ या." एवढा सर्वसामान्यांसारखा वागणारा राजकीय कार्यकर्ता, नेता पहिल्यांदाच मी माझ्या आयुष्यात बघितला. तो प्रसंग माझ्या आजही स्मरणात आहे.

सभापती महोदय, आर.आर.पाटील साहेबांकडे अतिशय उत्कृष्ट वक्तृत्व होते. मी आमदार झाल्यानंतर विधान भवनातील ग्रंथालयात आर.आर.पाटील साहेबांची भाषणे वाचत होतो. खरोखर प्रसंगाचे भान ठेऊन प्रसंगोचित अशा प्रकारचे वक्तृत्व मला त्यांच्या भाषणातून दिसून आले. माझ्या पहिल्या इंग्रजी पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला मी त्यांना आमंत्रित केले होते. यशवंतराव चव्हाण सेंटरला न भूतो न भविष्यती अशा प्रकारचा कार्यक्रम संपन्न झाला. कै.विलासरावजी देशमुख आणि कै.प्रमोद नवलकरही त्या कार्यक्रमाला आले होते. ज्याप्रमाणे मघाशी सन्माननीय सदस्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ.....

श्री.सुनील तटकरे यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे आबांना इतरांना चिमटा काढण्याची सवय होती. आत शिरल्याशिरल्या विलासरावांना ते म्हणाले की, "विलासराव तुमची पंचाईत आहे." त्यावर विलासरावांनी विचारले की, "का, कशामुळे पंचाईत आहे ?" त्यावर आबा म्हणाले की, "गाडगीळांनी इंग्रजीमध्ये पुस्तक लिहिले आहे." विलासरावांनी नंतर चपखलपणे उत्तर दिले. त्यानंतर त्या तिघांमध्ये टोमणे मारणे, चिमटा काढणे, मिश्कील उत्तरे देणे, अशी चर्चा खूप रंगली आणि ती त्या काळामध्ये लोकांनाही खूप आवडली होती. खरोखरच वक्तृत्वाचा एक नमुना त्या ठिकाणी बघावयास मिळाला होता.

सभापती महोदय, समाजातील एक पिढी वेगळ्या मार्गाला जाऊन बिघडत चालली आहे, या काळजीपोटी डान्स बारवर बंदी आणण्याबाबत आबांच्या भावना वेगळ्या प्रकारच्या होत्या. एकदोन वेळा मी त्यांच्याशी या विषयावर चर्चाही केली होती. खरोखरच समाजातील अनिष्ट गोष्टींमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची तळमळ त्यांच्यामध्ये होती आणि त्या दृष्टीकोनातूनच त्यांनी डान्स बार बंदीचा निर्णय घेतला होता.

सभापती महोदय, अनेकांना माहीत नसेल की, पोलिसांच्या भरतीमध्ये जो भ्रष्टाचार चालला होता, तो थांबविण्याकरिता ऑनलाईन भरती प्रोसेस आर.आर.पाटील साहेबांनी महाराष्ट्रात सुरु केली. मला वाटते, त्याचे सर्व श्रेय आबांनाच दिले गेले पाहिजे. आणखी एक गोष्ट अनेकांना माहीत नाही, त्यामुळे मी त्याचा जरुर उल्लेख या ठिकाणी करणार आहे. कसाब या दहशतवाद्याला फाशी देण्याचा निर्णय झाला त्यावेळी दिल्लीवरुन असे सांगण्यात आले होते की, याची चर्चा न होता फाशी दिली जावी. सकाळी 7.30 वाजता आबांना निरोप देण्यात आला की, कसाबला फाशी दिलेली आहे. त्यावेळी खरोखरच त्यांच्या मनामध्ये राष्ट्रप्रेम उफाळून आले. आज आपण आपल्या देशावर आघात करणाऱ्या व्यक्तीला एक प्रकारचे शासन केले आहे, अशा त्यांच्या भावना होत्या आणि गृहमंत्री या नात्याने त्यांनी त्या व्यक्तही केल्या होत्या.

सभापती महोदय, हल्लीच्या युगात वॉटस् ॲपने निरोप दिले जातात. वॉटस् ॲपवरील एक पोस्ट मी आजही जपून ठेवली आहे. ती अशी होती की, "यमराज स्वर्गामधून येत आहेत, आबांना सांगत आहेत की, आता वेळ झाली आहे, मागून जनता यमाला ओरडून सांगत आहे की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ.....

यमराज चुकीच्या माणसाला, चुकीच्या वेळी तुम्ही घेऊन जात आहात." ही पोस्ट सर्व महाराष्ट्रभर फिरत होती.

सभापती महोदय, आर.आर.पाटील साहेब खूप आजारी होते, असे डॉक्टरांकडून आम्हाला समजले त्यावेळी मी आणि माझ्या पत्नीने त्यांना गेटवेल कार्ड आणि एक पुष्पगुच्छ हॉस्पिटलमध्ये पाठविला. दुर्दैवाची गोष्ट ही की, त्या पुष्पगुच्छाचे रुपांतर पुष्पचक्रामध्ये होईल, अशी पुसटशी कल्पनाही आम्हाला आली नव्हती. अशा एका चांगल्या नेतृत्त्वाला, सामान्य कुटुंबातून आलेल्या नेत्याला, जनतेची नाडी ओळखून जनतेसमोर आदराने त्यांची बाजू मांडणा-या व्यक्तिमत्वाला आज आपण मुकलो आहोत. मी व्यक्तिशः आणि माझ्या पक्षातर्फे आर.आर.पाटील यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै.परशुरामजी चव्हाण हे सामान्य घरातून, उपेक्षित वर्गामधून आले होते. राजकारणातील अनेक प्रमुख लोकांचे वकील म्हणून त्यांनी काम केले. बोरिवलीच्या कोर्टामध्ये असताना त्यांना अडचण निर्माण करणारी एक घटना घडली होती. ते कुलाब्यात रहात होते. त्या घटनेचा परिणाम असा झाला की, ते त्यांना सहन झाले नाही आणि कुलाब्याच्या फुटपाथवरच ते आजारी पडले.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ...

हायकोर्टात ते अनेक वर्षापासून काम करीत होते. ते अत्यंत निष्णांत वकील होते. ते गरीब घराण्यातून आलेले होते. समाजासाठी लढणारे व्यक्तिमत्व आता आपल्यातून हरपले आहे. मी त्यांना माझ्या वतीने व काँग्रेस पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्राला वैचारिक परंपरा आहे, ही वैचारिक परंपरा लोप पावते की, काय अशी घटना कोल्हापूर येथे घडलेली आहे. महाराष्ट्राचा इतिहास असा आहे की, विचार पटले नाही तर वैचारिक संघर्ष वर्तमान पत्राच्या व प्रबोधनाच्या माध्यमातून जाहीर केले जात होते. परंतु आता महाराष्ट्रात विचार पटला नाही तर त्या विचारांना शब्दांद्वारे नव्हे तर शस्त्रांद्वारे उत्तर दिले जाते. ही खंत सर्वाच्या मनाला लागून राहिली आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व गोवा मुक्ती आंदोलनात हिरिरीने भाग घेणारे डाव्या विचारसरणीचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांची कोल्हापूरात हत्त्या झाली आहे. अशा व्यक्तिमत्वाला मी सलाम करतो. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल पक्षातर्फे व माझ्यातर्फे मी श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभागृहाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रसंगी मला दिवंगत आर.आर.पाटील यांच्या दोन प्रसंगाची आठवण होत आहे. मुंबईत विद्यार्थ्यांच्या आत्महत्या झाल्या होत्या. त्यावेळी महाराष्ट्रात अशा अनेक घटना घडत होत्या. आत्महत्या कशा रोखता येतील यासाठी मी परळ येथील दामोदर हॉलमध्ये मुख्याध्यापक यांचे एक शिबिर आयोजित केले होते. याबाबत वर्तमानपत्रात छोटीशी दोन ओळीची बातमी दिली होती. त्यावेळी दिवंगत आर.आर.पाटील राज्याचे गृहमंत्री होते, ती बातमी वाचून त्यांनी मला फोन केला व ते असे म्हणाले होते की, कपिल या कार्यक्रमासाठी मला यावयाचे असून हा विषय मला समजून घ्यावयाचा आहे. मानसोपचार तज्ज्ञ डॉ.आनंद नाडकर्णी यांना मी त्या कार्यक्रमासाठी बोलाविले होते. स्वतः गृहमंत्री या कार्यक्रमासाठी येत असतील तर फार चांगली गोष्ट आहे, तुम्ही स्वतः या कार्यक्रमाची दखल घेतली आहे. ही बाब आमच्यासाठी फार मोठी आहे त्यामुळे या कार्यक्रमासाठी आपण जरुर यावे असे मी त्यांना सांगितले होते. त्या कार्यक्रमासाठी दिवंगत आर.आर.पाटील आल्यावर मी त्यांना म्हटले की, तुम्ही स्टेजवर बसा, खाली बसू नका. त्यावेळी ते म्हणाले की, मला या ठिकाणी खाली बसून हा कार्यक्रम ऐकायचा आहे. आम्ही असे म्हणालो होतो की, आपण हा कार्यक्रम खाली बसून ऐका परंतु या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी 'तणाव मुक्ती अभियान' आपण सुरु करु या, त्या कार्यक्रमाचे उद्घाटन आपण करावे. त्या कार्यक्रमाचे उद्घाटन त्यांनी केले होते. त्यावेळी थोडक्यात त्यांनी विचार व्यक्त केले होते. त्यानंतर सभागृहात आल्यावर त्यांनी 'चाईल्ड हेल्प लाईन' सुरु करण्याची घोषणा केली होती. इतकी संवेदनशीलता ज्या राज्यकर्त्यांकडे असते तो राज्यकर्ता जेव्हा आपल्यातून निघून जातो त्यावेळी राज्यातील सर्व जनतेला चटका लागल्याशिवाय राहत नाही.

सभापती महोदय, याबाबत सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी आताच सांगितले आहे. या अगोदर विलासराव देशमुख व गोपीनाथराव मुंडे आपल्यातून निघून गेले आणि आता आर.आर.पाटील यांचे अकाली निधन झाले आहे. हे तिन्ही नेते राज्यातील सर्व जनतेला चटका लावून गेले आहेत. दिवंगत आर.आर.पाटील यांच्या संदर्भातील एक प्रसंग मी आणखी सांगतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, सांगली येथील तीन तरुणांना नक्षलवादाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती, हा विषय मी सभागृहात मांडला होता. याबाबत सभागृहात खूप वादावादी झाली होती. सभापती महोदयांना तो प्रसंग आठवत असेल. गृहमंत्री म्हणून आर.आर.पाटील उत्तर देत होते. या प्रश्नांबाबत मी खूप भांडलो व सभात्याग करुन बाहेर गेलो. तेव्हा त्यांनी मला दालनात बोलावून घेतले व ते म्हणाले की, मी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना बोलाविले आहे. हा प्रश्न तुम्ही पुन्हा पोलीस अधिकाऱ्यांना समजावून सांगा. त्याच रात्री सायंकाळी त्या तिन्ही तरुणांना सोडण्याचा निर्णय आर.आर.पाटील यांनी घेतला होता. सभागृहात असलेले आर.आर.पाटील व सभागृहाच्या बाहेर असलेले आर.आर.पाटील हे वेगळे आहेत, ते अत्यंत संवेदनशील होते.

सभापती महोदय, दिवंगत आर.आर.पाटील यांनी झाडू हातात घेतला होता. तो झाडू फोटो काढण्यासाठी घेतला नव्हता. अलीकडे झाडूंचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होत आहेत. दिवंगत आर.आर.पाटील यांच्या स्वच्छता अभियान कार्यक्रमातून गाडगेबाबांचे प्रतीक सुंदरतेने वापरुन राज्यातील असंख्य खेडी स्वच्छ केली होती. नुसती खेडीच स्वच्छ केली नाही तर आर.आर.पाटील यांचे व्यक्तिगत व सार्वजनिक जीवन अतिशय सुंदर व स्वच्छ होते. राजकारणातील नैतिकता, सभ्यता त्यांच्याकडे पाहूनच कळत होती. फार अभावाने सत्ताधारी व असा राजकारणी आढळतो. त्यांनी आपल्या कुटुंबीयांना चित्रकुट बंगल्यापासून लांब ठेवले होते. त्यांना सर्व सोई सुविधांपासून दूर ठेवले होते. त्यांनी आपल्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकविले.

सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी आताच सांगितले की, पक्षावर आरोप होत असताना आम्हा सर्वांना त्यांचा आश्वासक चेहरा समोर ठेवावासा वाटला यातच सर्व आले आहे की, आर.आर.पाटील हे किती मोठे होते. ऐवढ्या मोठ्या पक्षाला आबांच्या चेहऱ्यामुळे संरक्षण वाटते इतके मोठे जीवन दिवंगत आर.आर.पाटील जगले आहेत. त्यामुळे त्यांची चिरकाल आठवण या पुढील काळात सर्वांनाच राहणार आहे. दिवंगत आर.आर.पाटील यांच्या असंख्य आठवणी आहेत. या पुढील काळात सर्व आठवणी आपणासोबत राहणार आहेत. विधानसभा व विधानपरिषद सभागृहातील त्यांची भाषणे एकत्रित संग्रहित करुन एखादे पुस्तक प्रकाशित केले तर तो फार मोठा ठेवा होऊ शकेल, असे मला वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, मी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते व डॉ.दीपक सावंत यांचे आभार मानतो. विरोधी पक्षातील एवढा मोठा नेता गेल्यानंतर त्यासंदर्भात दोन उपक्रम या मंत्री महोदयांनी ताबडतोब सुरु केले आहेत. मंत्री महोदयांनी दखल घेतली त्याबाबत मी त्यांचे पुन्हा आभार मानतो.

सभापती महोदय, भटक्या विमुक्त जाती यांच्यासाठी माजी सदस्य श्री.परशुराम चव्हाण यांनी जे काम केले ते सभागृहातील सदस्यांनी व महाराष्ट्राच्या जनतेने पाहिले आहे. या उपेक्षित वर्गाला त्यांची सतत आठवण येत राहील.

सभापती महोदय, कॉम्रेड गोविंद पानसरे यांची हत्या नथुरामवादी प्रतिगामी शक्तीने पुन्हा केली आहे. महात्मा गांधी यांच्या हत्तेनंतर महाराष्ट्राला जो कलंक लागला तो अजूनही पुसला गेला नाही. महात्मा गांधी यांचा बळी महाराष्ट्रातील नथुराम यांनी घेतला. त्यानंतर महाराष्ट्रात पुन्हा असे कधी घडणार नाही असे आपण मानत होतो. महाराष्ट्र पुरोगामी आहे, शाहू, फुले व आंबेडकर यांचा महाराष्ट्र आहे. यानंतर या शक्तीने दाभोळकर यांचा बळी घेतला व आता कॉ.गोविंद पानसरे यांचा बळी घेतला आहे. 82 वर्षाच्या म्हाताऱ्या माणसाने कोणाचे काय बिघडविले होते. केवळ समाजप्रबोधनाचा वसा घेत ते काम करीत होते. 'शिवाजी कोण होता' हे ते सांगत होते. पण शिवाजी कोण होता हे तुम्ही सांगायचे नाही अशा धमक्या त्यांना दिल्या जात होत्या. 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या एक लाखापेक्षा जास्त प्रतींची विक्री झालेली आहे. त्यामुळे या पुस्तकाची ताकद किती विलक्षण असेल हे यावरुन लक्षात येते. मराठी पुस्तकांच्या आवृत्या हजार ते दोन हजारांच्यावर विकल्या जात नाहीत. अपवाद फक्त 'श्रीमान योगी', बाबासाहेब पुरंदरे यांचे 'शिवचरित्र' किंवा पु.ल.देशपांडे यांची पुस्तके यांचा आहे. अपवादात्मक काही पुस्तके सोडली तर अशा प्रकारे अल्पावधीत लाखाच्या प्रतीत हे पुस्तक विकले जाते हे कॉ.गोविंद पानसरे यांच्या बाबतीत घडले आहे. ती कांदबरी किंवा कथा नव्हती. शिवरायांच्या बाबत अतिशय चिकित्सक असे पुस्तक होते. शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे, त्या शिवरायांचे खरे चरित्र समोर मांडण्याचा प्रयत्न कॉ.गोविंद पानसरे यांनी केला. ही बाब प्रतिगामी शक्तींना रुचली नाही, त्यामुळे त्यांना धमक्या दिल्या जात होत्या. महाराष्ट्रात अशा पुरोगामी व्यक्तिच्या हत्या होत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील..

असतील तर त्याची दखल महाराष्ट्राने कशी घ्यावी हा मोठा प्रश्न आहे. श्रध्दांजली ही फक्त उपचारासाठी नसते. सभागृहाच्या माध्यमातून महान व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण करतो. त्यावेळी त्यांची आठवण चिरकाल ठेवावी,त्यांचे आदर्श पुढे कायम रहावेत. हा त्यामागील प्रयत्न असतो. कॉ.गोविंद पानसरे यांनी जे काम हातात घेतले होते. ते कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. कॉ.गोविंद पानसरे यांच्या कामाची दखल आपण यासाठी घेत आहोत की, कॉ. पानसरे हे त्यांच्या बलिदानाने मोठे झाले आहेतच परंतु त्या अगोदर त्यांनी केलेले काम शाहू महाराजांच्या कोल्हापूर येथे सत्यशोधक चळवळीचा प्रचंड मोठा वारसा महाराष्ट्राला मिळाला आहे. त्या वारसाचे ते अग्रणी होते. कॉ.पानसरे नेहमी बंड करुन उभे राहत. त्यांनी कधीही कोणाची तमा बाळगली नाही. जातीयवादी शक्तींच्या विरोधात ठामपणे उभे राहणे, आपले म्हणणे अत्यंत प्रभावीपणे मांडणे, कोणाशीही कटुता न ठेवता अशा प्रकारे कॉ.पानसरे वागत होते व काम करीत होते. कॉ.पानसरे यांच्या हत्यारांचा शोध राज्य सरकार घेईल. परंतु पुन्हा महाराष्ट्रात अशी नथुरामी शक्ती निर्माण होता कामा नये. तिला कायमचा पायबंद घातला पाहिजे अशी प्रतिज्ञा आपण सर्वांनी सभागृहात केली पाहिजे. दिवंगत तिन्ही नेत्यांना माझ्या लोकभारती पक्षातर्फे व माझ्यातर्फे श्रध्दांजली अर्पण करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभागृहाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.रावसाहेब रामराम ऊर्फ आर.आर.पाटील यांना आबा म्हणत परंतु हे आबा नक्की कोणाचे होते तर सर्वजण म्हणत होते की, आबा आमचे होते. राजकारणात शुध्दता निर्माण करणारे व्यक्तिमत्व आपणातून निघून गेले. त्यांना आपण आज आदरांजली अर्पण करीत आहोत. भावपूर्णता अशी असू शकते याचा अनुभव आम्हाला त्यांच्या भाषणातून येत होता. आपण सतत त्यांच्या सानिध्यात होतो त्यामुळे ते आपणा सर्वांना जाणवत होते.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

त्या काळात कै.आर.आर.पाटील यांचा सांगली जिल्हा परिषदेत वचक होता. सभापती महोदय, आपणास याची कल्पना आहे. परंतु राजकारणात नव्याने उदयास येत असताना आपला राजकीय वचक निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांना सांगली जिल्हा परिषदेने दिले. सांगली जिल्हा परिषदेतून त्यांनी आपली राजकीय कारकीर्द सुरु केली. कै.आर.आर.पाटील प्रामुख्याने वसंतदादा पाटील यांचे समर्थक म्हणून ओळखले गेले. कारण वसंतदादांचा साधेपणा, सहजपणा आणि सामान्य माणसाविषयी असलेला त्यांचा आपुलकीचा स्वभाव कै.आर.आर.पाटील साहेबांमध्ये पूर्णत: उतरलेला होता. त्यानंतर त्यांच्यावर आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचे राजकीय संस्कार झाले. कै.वसंतदादा पाटील आणि आदरणीय श्री.शरद पवार साहेबांच्या सानिध्यातील परिणाम त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्वामध्ये आपल्याला नेहमीच जाणवत असे.

सभापती महोदय, मला आठवते की, मी ज्यावेळी युती शासनाच्या काळात मंत्री झालो त्यावेळी श्री.मनोहर जोशी साहेब मुख्यमंत्री होते. त्यावेळी मी नवीन होतो. मी आमदार होण्यापूर्वी मंत्रालय बघितले नव्हते, विधिमंडळाशी तर माझा काही संबंधच आला नव्हता. त्यावेळी माननीय श्री.मनोहर जोशी साहेब मला एवढेच म्हणाले की, आर.आर.पाटील आणि श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या बाबतीत नेहमी सावध राहायचे. विरोधी पक्षात त्यांचे अभ्यासपूर्ण वर्तन असे स्थान आहे, त्यांचा नेहमी आदर करावयाचा असे त्यांनी मला सांगितले होते. श्री.मनोहर जोशी साहेबांनी मला कै.आर.आर.पाटील आणि श्री.दिलीप वळसे-पाटील साहेबांची नावे सांगितली होती. तेव्हा पासून मी कै.आर.आर.पाटील साहेबांकडे आदरपूर्वक बघत होतो. मघाशी श्री.सुनील तटकरे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ते कोणत्याही आयुधाच्या माध्यमातून सभागृहात बोलण्यासाठी उभे राहिले नाहीत, असा त्यांचा एकही दिवस जात नव्हता. हे आम्ही अनुभवले आहे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यात कै.आर.आर.पाटील यांच्या सारखे भ्रष्टाचार मुक्त राजकारणी म्हणून नाव मिळविणे कठीण आहे. कै.आर.आर.पाटील साहेब आज आपल्यातून निधून गेले याचे आपणा सर्वांना मोठे दु:ख आहे. राजकारणी कसा असावा असे राज्यातील कोणत्याही माणसाला विचारले तर कै.आर.आर.पाटील यांच्या सारखा राजकारणी असावा असे वाटावे, असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

कै.आर.आर.पाटील आपल्यातून निघून गेले. ते मंत्री म्हणून कार्यरत असताना देखील कोणीही सांगली येथे जाणार असतील तर माझ्या घरी जाऊन, माझ्या आईच्या हातची भाकरी खाऊन या, असे सांगणारे कै.आर.आर.पाटील साहेब आपल्यातून निघून गेले. ते सतत सत्तेच्या उबेत राहत असताना, सामर्थ्यात राहत असताना त्यांची आई, पत्नी आणि मुले गावात शेतातील झोपडीत राहत होते, असे मोठेपण जगणे फार कठीण असते. अशा प्रकारे त्यागाची भूमिका घरातील सर्व लोकांमध्ये असणे हा देखील वेगळेपणा आपल्याला कै.आर.आर.पाटील यांच्या बाबतीत अनुभवायला मिळाला. कोणत्याही आईला आपला मुलगा गेल्यानंतर होणारे दु:ख हे अनावर असते. पण कै.आर.आर.पाटील साहेबांच्या आईचा हंबरडा दु:ख, वेदना त्या दिवशी आपल्याला जाणीव करुन देत होते.

सभापती महोदय, कै.आर.आर.पाटील साहेब खूप साधे होते. मुंबई शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवायचे होते. त्यासाठी ते इंग्लंड येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सिस्टीम बघण्यासाठी इंग्लंडला गेले होते. त्यावेळी त्यांनी सूट परिधान केला होता. परंतु, त्यांनी सूट परिधान केल्याचीच बातमी सगळीकडे होती. म्हणजे त्यांनी सूट परिधान केल्यामुळे त्याची बातमी होणे हीच त्यांच्या साधेपणाचे लक्षण सांगणारी बातमी होती. सन 1999 मध्ये आघाडी शासन सत्तेवर आले आणि कै.आर.आर.पाटील साहेबांना ग्राम विकास मंत्री पद मिळाले. संत गाडगे बाबांनी स्वच्छतेचे अभियान चालविले. त्या माध्यमातून ग्रामीण भागाला स्वच्छतेची आवश्यकता आहे, असे सांगत संत गाडगेबाबा रात्रंदिवस फिरत असत. परंतु गाव स्वच्छ करण्याचे परिणाम त्यांना साधता आले नाही. आपण अमरावती येथे गेलो तर आपल्याला अमरावती शहराच्या बाहेर खूप कचरा दिसतो. आपण अमरावती येथे चांगले भवन बांधलेले आहे. कै.आर.आर.पाटील साहेबांनी संत गाडगे बाबांच्या नावाने ग्राम स्वच्छता अभियान राबवून असे एक चांगले वातावरण निर्माण केले, हे मोठे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या जीवनातील सर्वात श्रेष्ठ काम जर कोणते असेल तर ते ग्राम स्वच्छता अभियानाचे आहे. संत गाडगे बाबांनी ग्रामीण जीवनाकरिता जे सांगितले ते अंमलात आणण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. जे संत गाडगे बाबांना जमले नाही ते कै.आर.आर.पाटील साहेबांनी करुन दाखविले. आजही गावागावांमध्ये ग्राम स्वच्छता अभियान पुरस्कार मिळविण्यासाठी शर्यत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, तंटा मुक्ती अभियान हे देखील चांगले अभियान आहे. तंटा मुक्ती अभियान आणि ग्राम स्वच्छता अभियान या त्यांच्या जीवनातील सर्वात मोठ्या गोष्टी आहेत. आपण सर्व लोकप्रतिनिधी कोठेही गेलो तरी आपल्याला लोक कौतुकाने सांगतात की, आमचे गाव तंटा मुक्त आहे. आमचे गाव ग्राम स्वच्छता अभियानामध्ये पहिले आलेले आहे. मंत्री पद मिळाल्यानंतर त्या व्यक्तीमध्ये आपला ठसा उमटविण्याचे सामर्थ्य असू शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे. तंटा मुक्त गावाचे मला जास्त कौतुक वाटते. मला आठवते की, भंडारा जिल्ह्यात दलित महिलेला नग्न करुन त्या महिलेची धिंड काढण्यात आली होती. त्यावेळी मी तेथे गेलो होतो. त्यानंतर जालना जिल्ह्यात अशा प्रकारच्या दोन घटना घडल्या होत्या. मी त्या ठिकाणी देखील गेलो होतो. सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे साहेब देखील तेथे आले होते. त्यावेळी मी अमरावती येथे महिला मोर्चा काढला होता. त्यावेळी मला धमक्या दिल्या जात होत्या. मी सांगितले की, हा राजकारणाचा विषय नाही, हा जागृतीचा विषय आहे, महिलांचा मोर्चा आहे. गावागावांमध्ये असे जे वाद आहेत, त्यामध्ये तंटा मुक्त गाव हा त्यातील महत्वाचा गाभा आहे. आमच्या गावात तंटा नाही, आम्ही सर्व जाती पंथासह गुण्यागोविंदाने राहतो असा मोठा संदेश देणारे तंटा मुक्ती गाव अभियान हे प्रबळ असे समाज प्रबोधन करणारे आणि शाहू महाराजांना खऱ्या अर्थाने सन्मानीत करणारे अभियान आहे. तंटा मुक्ती गाव अभियान निर्माण करण्याचे सामर्थ्य असणारे कै.आर.आर.पाटील आज आपल्यातून निघून गेलेले आहेत. त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला होता.

सभापती महोदय, त्यानंतर पुन्हा विधानसभेची निवडणूक झाली, आघाडी शासनाला बहुमत मिळाले. त्यावेळी आमच्या पक्षाला बहुमत मिळाले नाही, आम्ही अपयशी ठरलो. आघाडी शासन पुन्हा सत्तेवर आले आणि कै.आर.आर.पाटील साहेब उप मुख्यमंत्री झाले. त्यांना हवालदारांचे उप मुख्यमंत्री असे म्हटले जात होते. ते अत्यंत साधे होते. त्यांनी सभागृहात डान्सबार बंदीचे विधेयक मांडले होते. त्यावेळी सन्माननीय सदस्य कै.प्रमोद नवलकर साहेब सभागृहात होते. कै.आर.आर.पाटील साहेबांनी डान्सबार बंदी विधेयकावर प्रभावी भाषण केले. त्यावेळी कै.प्रमोद नवालकर साहेबांनी त्यांना सांगितले की, हा कायदा अपुरा आहे, हा कायदा न्यायालयात टिकणार नाही, आपण हे विधेयक परत घ्यावे आणि त्या प्रमाणे ते विधेयक न्यायालयात टिकले नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

परंतु डान्सबार बंदी विरोधात ज्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील हॉटेल मालकांच्या वतीने रान पेटविले त्या मनजितसिंग सेठींना तुरुंगात पाठविण्याचे सामर्थ्य कै.आर.आर.पाटील यांनी दाखविले. त्यावेळी डान्सबार हा विषय किती किळसवाणा आहे, हा संदेश लोकांमध्ये गेला. डान्सबार काय असतो हे सर्वसामान्य लोकांना माहीत नव्हते. परंतु कै.आर.आर.पाटील साहेबांनी मांडलेल्या डान्सबार बंदी विधेयकामुळे वाहिन्यांच्या माध्यमातून राज्यातील लोकांना असे वाटू लागले की, आपण आपली मुले सांभाळली पाहिजेत. आपली मुले वाईट मार्गाला लागू नयेत. आपला मुलगा जर डान्सबारच्या नादी लागून उधळपट्टी करणार असेल तर त्याला वाचविण्याचे काम डान्सबार बंदीच्या विधेयकाने केले. सामान्य माणसापासून श्रीमंतांपर्यंत एक सामाजिक विषय त्यांनी निर्माण केला. मंत्री पद मिळाल्यानंतर कोणताही विषय हाती घेतल्यानंतर त्या कामाविषयी ठसा उमटविण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये होते. एरवी त्यांचा स्वभाव असा होता की, आपण कशात पडायचे नाही, डान्सबारमध्ये पैसेवाले जातात, आपल्याला त्याचे काय, आपल्याला त्याचा नाद नाही, तरी देखील त्यांनी डान्सबारवर बंदी आणली. गरीब लोक तमाशाला जाऊन आपले मन रिजवत असतात. डान्सबार बंदी कायदा संमत झाल्यानंतर त्यांची कारकीर्द चांगली सुरु असताना 26/11 रोजी मुंबई शहरावर आतंकवादी हल्ला झाला. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. त्यांच्या एका वाक्यामुळे त्यांना मंत्री पदावरुन पायउतार व्हावे लागले. त्यांच्या मनाला ते खूप लागले. मी त्यावेळी त्यांना भेटलो. त्यानंतर ते निघून गेले. त्यांनी नंतर तो संपूर्ण किस्सा सांगितला. मी मघाशी म्हणालो की, सामान्य हवालदाराला ते आपले वाटायचे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

लक्षात घ्या. अधिकाऱ्यांना वाटायचे की नाही याची मला माहिती नाही. त्यांच्यामध्ये आज गॅंगवार सुरु आहे. उद्याही सुरु राहील. कोणत्याही गृहमंत्र्यांला हे अधिकारी सुखाने जगू देतील असे वाटत नाही. या सभागृहात या विषयाबाबत वर्णन केले गेले आहे, ते सभागृहाच्या पटलावर आलेले आहे. आज प्रमोद नवलकर हयात नाहीत. सामान्य पोलीस हवालदारांना आर.आर.पाटील आपले वाटायचे. त्या मनोबलावर आर.आर.पाटील आमचे गृहमंत्री होते. त्या मनोबलातून तुकाराम ओंबळे हा त्यागी माणूस निर्माण झाला. तुकाराम ओंबळेंनी बलिदान केले. त्यांचे सामर्थ्य ओंबळेंच्या जीवनामध्ये जाणवत असताना आर.आर.पाटील यांना 26/11 च्या घटनेमुळे गृहमंत्री पदाचा त्याग करावा लागला. आंतरराष्ट्रीय स्तरावरील ती घटना होती. आंतरराष्ट्रीय दहशतवाद्याला जिवंत पकडण्याचे काम आर.आर.पाटील यांच्या तुकाराम ओंबळेंनी केले. जिवंत दहशतवादी फक्त मुंबईच्या पोलिसांनी पकडला. त्याबद्दल आर.आर.पाटील यांचे कोणी कौतुक केले नाही. उलट त्यांना शिक्षा दिली गेली. आम्हाला ते खटकले. आज त्यांच्या मृत्यूनंतर बोलावे लागत आहे. त्यानंतर आदरणीय श्री.शरद पवार यांनी त्यांना पुन्हा गृहमंत्री केले. तो त्यांचा सन्मान होता. सामान्यांचे आवाहन पेलण्याची ताकद त्यांच्यामध्ये होती. सामान्यांना ते आपले वाटायचे.

सभापती महोदय, मी राज्याचा गृहमंत्री आहे, गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री पद मी स्वीकारणार आणि तेथे सुरु असलेल्या नक्षलवादी चळवळीला मी सामोरे जाणार असे जाहीर करुन त्यांनी कृती करुन दाखविली. नक्षलवादी चळवळीला सामोरे तर गेलेच, परंतु गडचिरोली शहरामध्ये आर.आर.पाटील स्कूटरवरुन फिरले. त्यांच्यासोबत पोलीस बंदोबस्त नव्हता. गृहमंत्र्यांचे हे स्कूटरवरुन फिरणे सर्व वाहिन्यांवरुन दाखविले गेले. जेणेकरुन आदिवासी समाजाचे मनोबल वाढेल. तुमच्यावर कितीही दबाव असला तरी राज्य आणि गृहमंत्री तुमच्याबरोबर आहे, तुम्ही त्यांच्या दबावाला बळी पडू नका हे सांगण्याचे काम ते करीत होते.

सभापती महोदय, नक्षलवादी भागामधील दहशतवादी वातावरणाचा एक प्रसंग मला सांगावासा वाटतो. नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु होते. नक्षलवाद्यांनी त्यांच्या विरोधातील संशयित म्हणून आमच्या पक्षाच्या एका तालुका प्रमुखाची मान कापून हत्या केली होती. त्याची पत्नी अंगणवाडी शिक्षिका होती. माझ्यासारख्या शिवसैनिकाच्या ही बाब लक्षात आल्यानंतर मी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

तिला भेटायचे ठरविले. मी माझे सहकारी डॉ.दीपक सावंत यांना विनंती केली की, तुम्ही माझ्याबरोबर चला. डॉ.दीपक सावंत यांनी ही बाब श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या कानावर घातली. मला श्री.उध्दवजी ठाकरे यांनी फोन करुन सांगितले की, तुम्ही त्या भागात जाऊ नका. मी तेव्हा न जाण्याचा निर्णय घेतला. परंतु पुढील आठवडयात शनिवार-रविवार या दिवशी मी तेथे गेलो. त्याच्या पत्नीची भेट घेतली. सर्व परिस्थिती पाहून आल्यानंतर मी सभागृहात प्रश्न मांडला. त्याच्या पत्नीच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला होता, ती जगू शकत नव्हती. तत्कालीन महिला व बालविकास मंत्री स्व.सुभाष झनक यांनी सभागृहात घोषणा केली आणि ताबडतोब आदेश पारित केले गेले. मी त्या नक्षलवादी भागात जाऊन आल्याचे आर.आर.पाटील यांना कळले. त्यांनी माझी भेट घेऊन मला सांगितले की, मला कळविल्याशिवाय त्या भागात पुन्हा जाऊ नका. मी त्यांना म्हटले की, मी पुन्हा जाणार आहे. माझ्या पक्षाच्या तालुका प्रमुखाला ज्या दलमने मारले, त्यांना भेटून मी जाब विचारणार आहे.

सभापती महोदय, मी त्यांना जाब विचारला की, माझ्या तालुका प्रमुखाला का मारले? ते माझ्यावर भडकले. ते मला म्हणाले की, मी तुम्हाला सांगितले ते अधिकारवाणीने, प्रेमाने आणि मित्र या नात्याने. तुम्ही परत त्या भागात गेलात तर काही बरेवाईट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तुम्हीच मला एका प्रश्नाचे उत्तर द्या. या सदनाचा सदस्य आणि आमदार या नात्याने तेथे गेल्यानंतर त्याची हत्या झाली तर त्याचा जाब गृहमंत्री म्हणून मला द्यावा लागेल. माझी तुमच्याबाबत काही जबाबदारी आहे की नाही? अशा पध्दतीने प्रत्येक व्यक्तीबद्दल विचार करणारे व्यक्तिमत्व मी स्वत: अनुभवले आहे. आदिवासी जनतेचा विश्वास वाढेल म्हणून नक्षलवादी भागात राज्याचा गृहमंत्री आणि पालकमंत्री म्हणून ते सदैव फिरत असत. एकदा ते मला आणि माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथ खडसे यांना हेलिकॉप्टरमधून पाच सहा ठिकाणांची पाहणी करण्यासाठी फिरले. त्यांनी जाहीर सभा घेतल्या. जाहीर सभेत ते म्हणाले होते की, श्री.एकनाथराव खडसे हे विरोधी पक्षनेते आहेत, श्री.दिवाकर रावते हे शिवसेना पक्षाचे नेते आहेत. आदिवासी भागामध्ये जाऊन तेथील जनतेचे मनोबल वाढविण्याची कृती ही वेगळी आहे. त्याबद्दल श्री.सुरेश द्वादशीवार यांनी विश्लेषण केले होते. त्यानंतर नक्षलवाद्यांची शरणागती वाढू लागली. विश्लेषण केल्यानंतर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

दहशतवादी वातावरणात वावरणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे मनोबल वाढत गेले. सामान्य लोकांसाठी त्यांनी आपल्या गृहमंत्री पदाचा वापर केला.

सभापती महोदय, मी मंत्रालयातील अधिकारी व मंत्र्यांच्या नावाच्या पाट्या मराठी भाषेतील असाव्यात असा आग्रह धरला होता. अन्यथा इंग्रजी भाषेमधील नावाच्या पाट्यांना मी डांबर फासण्याचे जाहीर केले होते. वास्तविक मी तसे करणार नव्हतो. परंतु माझ्या आग्रहानंतर आर.आर.पाटील यांनी तातडीने आपल्या नावाची पाटी मराठी भाषेत बदलली. असा एक आमचा सहकारी आमच्यातून निघून गेला आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी 2014 च्या निवडणुकीचा उल्लेख केला. आर.आर.पाटील यांचे ते रुप मला खूप आवडले. काही झाले तरी आर.आर.पाटील निवडणुकीत पडले नाही तर मी राजीनामा देणार अशी घोषणा खासदार श्री.संजयकाका पाटील यांनी केली होती आणि मी निवडणुकीत पडलो तर राजकारणातून निवृत्ती घेणार अशी जाहीर घोषणा आर.आर.पाटील यांनी केली होती. एवढा त्यांचा आपल्या मतदारसंघाबद्दल आत्मविश्वास होता. आर.आर.पाटील निवडून आल्यानंतर आमच्या पक्ष प्रमुखांनी त्यांना फोन करुन त्यांचे अभिनंदन केले होते. जनतेवरचा विश्वास, त्यांची जिद्द याच्या बळावरच ते म्हणाले होते की, मी निवडून येणारच. मी त्यांना लिलावती रुग्णालयात भेटायला गेलो होतो. ते खुर्चीत बसलेले होते. मला उठताच येईना, इतका वेळ ते माझ्याशी बोलायचा प्रयत्न करीत होते. मला डॉक्टर खुणवत होते. मी त्यांना म्हणालो की, मला एक महत्वाचे काम असल्यामुळे मी तुम्हाला पुन्हा उद्या भेटायला येतो. आर.आर.पाटील कसे होते हे दाखवायला आमच्या मित्रांनी फोटो आणला होता. खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी आंदोलन सुरु केले होते. त्या आंदोलनामध्ये लहान लहान मुलांमध्ये आर.आर.पाटील दिसत होते. तो त्यांचा खरा निरागस फोटो होता. आज ते आपल्यातून निघून गेले आहेत. मी माझ्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने आणि पक्ष प्रमुखांच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो.

या सभागृहाचे माजी सदस्य श्री.परशुराम मारुती चव्हाण तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ.गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांनाही त्यांच्या दु:खद निधनाबद्दल आदरांजली अर्पण करतो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्याला लेखी विनंती केल्यानुसार कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, आर.आर.पाटील यांच्याशी माझे संबंध वयाच्या 15 व्या वर्षापासून जुळले होते. तासगाव तालुक्यातील अंजनी गाव शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला होता. त्या गावामध्ये काँग्रेस पक्षाला एकही मत मिळत नव्हते. अंजनी गावामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे अभ्यास शिबिर भरायचे. मी दोन तीन वेळा अभ्यास शिबिराला उपस्थित राहिलो होतो. एका गरीब कुटुंबातील तरुण कार्यकर्ता म्हणून आर.आर.पाटील यांना मी त्या अभ्यास शिबिरात पहायचो. कॉ.गोविंदराव पानसरे, एन.डी.पाटील आदी डाव्या विचारसरणीचे लोक आम्हाला शिबिरामध्ये लेक्चर द्यायचे.

नंतर श्री.भारवि....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

आम्ही कवठेमहांकाळला यायचो. अंजनी गाव थोडे लांब होते. दोन तीन वेळा मला तेथे जाण्याची संधी मिळाली. ते संबंध त्यांनी शेवट पर्यंत ठेवले. त्यांच्यावर सर्वात प्रथम संस्कार हे शेकापने केले. ते शेकापच्या मुशीतून तयार झाले होते. ते संस्कार त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवले होते. येथे सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी त्यांच्याबद्दलचे सुंदर अनुभव येथे सांगितले आहेत. पी.बी.पाटील यांच्या शांती निकेतन येथून शिक्षण घेताना त्यांची खाण्याची आणि कपड्याची कशा प्रकारे परिस्थिती होती ती त्यांनी अनेक वेळा आमच्या समोर मांडली होती. त्यांच्यावर खरी नजर दिवंगत श्री.वसंतदादा पाटील यांची गेली. त्यानंतर मग आमच्या पक्षाकडून अंजनी गाव हळूहळू गेले. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितल्याप्रमाणे 1975 नंतर म्हणजे आणीबाणी नंतर वेगळे राजकारण घडले. त्यानंतर कॉंग्रेस पक्ष फुटल्याची घटना घडली.

सभापती महोदय, मी येथे आबांच्या बाबतीतील तीनच गोष्टी सांगणार आहे. आबांनी जे विचार आणि आचरण ग्रहण केले होते ते शेवट पर्यंत कायम ठेवले होते. आबांनी आपली प्रत्येक जबाबदारी समर्थपणे पार पाडलेली आहे. डान्स बारसंबंधातील लक्षवेधी सूचना लागत नव्हती. त्यावेळी श्री.दिलीप वळसे-पाटील हे विधान सभेचे माननीय अध्यक्ष होते. सदर लक्षवेधी सूचना लागत नाही म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील, सन्माननीय सदस्य श्री.विवेक पाटील आणि मी आबांना भेटलो व परिस्थिती सांगितली. शेतकऱ्यांना जमिनींमुळे पैसे मिळाले. त्या शेतकऱ्यांची मुले डान्स बारमध्ये जाऊन पैसे उधळतात हे त्यांना सांगितले. आमचे सर्व म्हणणे त्यांनी 15-20 मिनिटे ऐकले. ते स्वतः आमच्या बरोबर आले आणि श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे गेले आणि त्यांना सांगितले की, ही लक्षवेधी सूचना मान्य करावी. त्यावर मला सभागृहात चर्चा करावयाची आहे. डान्स बार बंदीमुळे एक वेगळे वातावरण राज्यात आणि देशात निर्माण झाले होते. पनवेल हे डान्स बारचे हब झाले होते. राज्यातील सर्व लोक पनवेल येथे येत होते. अनेक आरोप झाल्यानंतर देखील तातडीने डान्स बार बंद करण्याचे काम आबांच्या निर्णयामुळे झाले. त्या निर्णयावर ते शेवटपर्यंत ठाम राहिले. त्यामुळे रायगड जिल्हा त्यांना कधीच विसरणार नाही. डान्स बारमुळे शेतकऱ्यांची पुढील पिढी वाया जाऊ न देण्याचे काम आबांनी केलेले आहे.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे म्हणाले ते खरे आहे. रायगड जिल्हा राजकीयदृष्टया जागरूक आहे. या जिल्ह्यात अनेक संघर्ष होत असतात. आमच्या दोघांच्या कारकिर्दीमध्ये थोडे कमी संघर्ष झाले. पूर्वी विकोपाला संघर्ष जात होते. मी शक्य तो शासकीय कार्यक्रम टाळतो. आबांनी मला एका शासकीय कार्यक्रमाला येण्यासाठी आग्रह केला. कदाचित हे त्यांनी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांच्या सांगण्यावरून केले असेल असे मला वाटते. आबांनी मला फोन केला आणि सांगितले की, जयंत पाटील आपणाला या कार्यक्रमाला यायचे आहे. त्या कार्यक्रमाला मी गेलो होतो. त्यावेळी त्यांनी जे भाषण केले होते त्याची पुनरावृत्ती मी आता करीत नाही. रायगड जिल्ह्यामध्ये हेवेदाव्यावरून भांडण होऊन त्यांचे रूपांतर राजकीय संघर्षामध्ये व्हायचे. तो जिल्हा मी आता तंटामुक्त करीत आहे, त्याचा मला खूप मोठा आनंद वाटतो असे त्यांनी त्यावेळी सांगितले होते. आबांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये डान्स बार बंदी, संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान, तंटामुक्त गाव हे तीन चांगले ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. सभापती महोदय, आपण देखील एके काळी ग्रामविकास खाते सांभाळलेले आहे. आबांनी श्री.शरद पवार साहेबांकडून ग्रामविकास खाते हे मागवून घेतले होते. त्यांनी चांगले निर्णय घेऊन स्वतःची इतिहासामध्ये नोंद करून ठेवली आहे असे मला वाटते. मी आबांचे अनेक किस्से सांगू शकतो. पण वेळ अपुरा आहे. आबांचे राहणीमान, बोलण्याचा ठब हा वेगळा होता. त्याचा अभ्यास नवीन पिढीने करणे आवश्यक आहे. मी राष्ट्रवादी पक्षाचे खजिनदार आणि प्रदेशाध्यक्ष यांना सांगू इच्छितो की, आबांच्या अनुभवांचे एक पुस्तक काढावे. त्यासाठी लागणारी मदत आम्ही देखील करू. त्यांच्या भाषणाचा उपयोग संसदीय कामकाजामध्ये करता येऊ शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, कॉ.गोविंद पानसरे यांच्या अभ्यासक्रमात तयार झालेला मी एक कार्यकर्ता आहे. आजच्या राजकारणामध्ये शेवट पर्यंत एकाच पक्षात राहणे हे एक वेगळेच काम आहे. कॉ.गोविंद पानसरे यांनी वेगळ्या प्रकारे आयुष्य व्यतित केले. नगर जिल्ह्यातून ते कोल्हापूरला आले. कोल्हापूरला त्यांनी नाकेदाराची नोकरी केली. त्यातून त्यांनी पुढील शिक्षण घेऊन वकिली केली. त्यांची खरी ओळख लेखक म्हणून आहे. ते एक उत्तम लेखक होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

त्यांच्याकडे शेवटपर्यंत पैसे नव्हते. पुस्तक काढायचे असेल की, ते मला फोन करायचे. जयंत पाटील मी कॉ.पानसरे बोलतोय. दहा हजार रूपयांचा चेक पाठवून द्यावा. मला पुस्तक लिहायचे आहे. ते मला ऑर्डरच द्यायचे की, माझ्याकडे ताबडतोब परवा चेक आला पाहिजे. अशा प्रकारे त्यांनी अधिकारवाणीने नाते जोडले होते. शिवाजी कोण होता यावर त्यांनी पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे देशातील 18 भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे. आता पर्यंत या पुस्तकाच्या 1 लाख 42 हजार 4 प्रती विकल्या गेल्या आहेत. त्यांनी शिवाजी महाराजांचे वर्णन करताना असे म्हटले आहे की, लढाई आणि राजकारणामध्ये शिवाजी महाराजांबरोबर गरीब माणूस होता. इतिहासकारांनी वेगळ्या पद्धतीने वस्तुस्थिती मांडली होती. खरी वस्तुस्थिती काय होती हे कॉ.पानसरेंनी आपल्या पुस्तकामध्ये मांडली आहे. शिवाजी महाराजांच्या राजवटीत कष्टकरी, दलित व बहुजन समाजातील सर्वात खालच्या वर्गातील लोक महाराजांबरोबर होते. ते शेवटपर्यंत महाराजांबरोबर होते. त्यांनी कधीही स्वतःच्या जीवाची पर्वा केली नाही. पन्हाळ्याला वेढा पडलेला असताना शिवाजी महाराजांच्या रक्षणासाठी जीवा धावून आला होता. तो न्हावी होता. मला येथे जातीचा उल्लेख करायचा नाही. कॉ.पानसरे व्याख्याने देताना ज्या प्रकारे मांडणी करायचे ते ऐकताना अंगावर शहारे यायचे. त्यांनी मंडल आयोगावर पुस्तक लिहिले. मार्क्स कसा होता यावर देखील पुस्तक लिहिले. मार्क्स काय म्हणाला होता याचे विश्लेषण करून एका वेगळ्या प्रकारचे पुस्तक त्यांनी लिहिले आहे. त्यांचे व्याख्यान भारावून टाकणारे असायचे. आपण कॉ.पानसरे यांचा शोक प्रस्ताव घेतल्याबद्दल आभार मानले आहेत. माझी शासनाकडे मागणी आहे की, कॉ.पानसरेंच्या हत्येचा शोध लागला पाहिजे. कोल्हापूरातून पुरोगामी चळवळ सुरू झाली. शाहू महाजारांचे नाव घेऊन आपण राजकारण करीत असतो. अशा या कोल्हापूरात 82 वर्षाच्या कॉम्रेडची हत्या होते ते क्लेशदायक आहे. तेव्हा या घटनेची चौकशी झाली पाहिजे, आरोपी पकडले पाहिजेत. यासाठी ज्या ज्या यंत्रणा राबविता येतील त्या त्या राबविल्या गेल्या पाहिजेत. नाही तर या ठिकाणी वेगळी परिस्थिती निर्माण होईल. महाराष्ट्र आणि बिहार एकच आहे काय

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

असे चित्र निर्माण होण्याची शक्यता आहे. या घटनेच्या तपासाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले असल्यामुळे शासन कोणती उपाययोजना करणार आहे ते या राज्याला कळले पाहिजे. मी व्यक्तीशः व माझ्या पक्षाकडून कॉ.पानसरे आणि श्री.आर.आर.पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.

.....

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार, सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आर.आर.पाटील ज्या जिल्ह्यातून राजकीयदृष्टया मोठे झाले त्या जिल्ह्यामध्ये ज्या प्रकारची व्यक्तिमत्वे मोठी झाली त्यांची पार्श्वभूमी पाहता आबांना त्या जिल्ह्यात मोठे होणे हे अवघडच होते. एका सामान्य कुटुंबातील तरुण जिल्हा परिषदेची निवडणूक लढवत राज्याच्या उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचतो ही अशक्य कोटीतील गोष्ट होती. आपण त्या जिल्ह्यातील असल्यामुळे आपणास ते माहीत आहे. कै.वसंतदादा पाटील त्या जिल्ह्यात मोठे झाले. वसंतदादांना शह देण्यासाठी वाळव्यामधून छगनबापूसारखे व्यक्तिमत्व उभे राहिले. मग छगनबापूंचे चिरंजीव जयंतराव समोर आले. पण आबांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही. कोणताही राजकीय पाठिंबा नाही. कुटुंबातील कोणीही ग्रामपंचायतचा सदस्य नाही, अशा कुटुंबातील एक व्यक्ती आणि ती ही सांगली सारख्या जिल्ह्यातून पुढे येणे अशक्य वाटत असल्यामुळे आबांचे व्यक्तिमत्व मोठे वाटते. अनेक सन्माननीय सदस्यांनी आबांना आदरांजली व्यक्त करीत असताना त्यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयाचा उल्लेख केला. जेव्हा त्यांनी अतिरेकी कसाबचे शव दफन करण्याचा निर्णय घेतला तेव्हा माझ्यासारख्या विरोधी पक्षाच्या बाकावर बसणाऱ्या सदस्याला त्यांचा प्रचंड आदर वाटला. आपल्या राजकीय क्षेत्राची परिस्थिती अशी आहे की, आपणास कोणाचे जाहीरपणे कौतुक करता येत नाही म्हणून मी त्यांना जागेवरुन पत्र लिहिले की, "आबा, तुम्हाला सलाम". आबांनी घेतलेल्या निर्णयाचे आपण सर्वांनी कौतुक केलेले आहे. आबांनी कसाबचे शव दफन करण्याचा निर्णय घेतला, ती केवढी मोठी रिस्क होती ? जातीय संघर्ष झाला असता, परंतु त्याची काळजी न करता त्यांनी अतिशय शांतपणे निर्णय घेतला आणि तो सभागृहात सांगितला. तेव्हा माझ्या मनात त्यांच्या विषयीचा आदर वाढला. असे आपल्या सर्वांचे आबा आपल्यातून निघून गेले. मी माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कॉम्रेड गोविंदराव पानसरे हे असेच मोठे व्यक्तिमत्व होते. त्यांची झालेली हत्या हा आपल्या सर्वांच्या दृष्टीने चिंतेचा आणि विचार करायला लावणारा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी त्यांचे योग्य वर्णन केलेले आहे. कॉम्रेड गोविंदराव

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील.....

पानसरे हे देखील सामान्य कुटुंबातील व्यक्तिमत्व होते. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांचा जन्म अहमदनगरमध्ये झाला असला तरी त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. ते महानगरपालिकेत कर्मचारी म्हणून काम करीत होते. त्यांनी कायद्याची पदवी घेतली असली तरी त्यांनी वकिली न करता ते कामगांराचे एक चांगला नेते बनले. कोल्हापूर जिल्ह्यातील प्रत्येक अन्याया विरुद्ध ते रस्त्यावर उतरले होते. अलीकडे कोल्हापूरमध्ये टोल विरोधी संघर्ष झाला त्या संघर्षामध्ये त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. एखाद्या विषयाचा सर्वंकष अभ्यास कसा करायचा, तो अभ्यास लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जी शैली लागते ती शैली त्यांच्याबरोबर काम करताना मला अनुभवयास मिळाली.

सभापती महोदय, कॉम्रेड गोविंदाराव पानसरे यांच्याकडे मी एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणून पाहतो. काही वर्षापूर्वी त्यांच्या मुलाचे अकाली दु:खद निधन झाले. त्यावेळचा प्रसंग मला आठवतो. कॉम्रेड अविनाश पानसरे यांची अत्यंयात्रा कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यालया जवळ आली त्यावेळी गोविंदराव हा प्रसंग कसा घेतील याची सर्वांना चिंता वाटत होती. परंतु गोविंदराव पानसरे स्वत: गाडीवर चढले आणि त्यांनी कम्युनिस्ट पार्टीचा झेंडा मुलाच्या अंगावर पांघरुन "कॉम्रेड अविनाश पानसरे अमर रहे" अशी घोषणा दिली. आपल्या कार्यकर्त्यांना त्यांनी धीर दिला. आपला लढा गोविंदराव पानसरे लढतील असे सामान्य माणसाला नेहमीच वाटले. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्यावर खुनी हल्ला झाला. सरकार त्यांच्या मारेकऱ्यांना शोधण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहे. त्यांचे मारेकरी पकडण्यासाठी सर्व पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. त्यांचे मारेकरी शोधण्यास आपणास नक्कीच यश मिळेल. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.परशुराम चव्हाण यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करतो.

श्री. आर.आर.पाटील, सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंदराव पानसरे आणि श्री.परशुराम मारुती चव्हाण यांच्या दु:खद निधनाबद्दल मी पक्षाच्या वतीने आणि माझ्या वतीने त्यांना आदरांजली अर्पण करुन माझे भाषण पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील राजकीय क्षेत्रामध्ये आर.आर.पाटील या नावा भोवती एक वलय होते. प्रशासनामध्ये कशाप्रकारे काम करावे, सामाजिक बांधिलकी कशी असावी हे आर.आर.पाटील यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले होते. गरीब माणूस, शेतकरी, शेतमजूर किंवा दऱ्याखोऱ्यामध्ये राहणारा आदिवासी बांधव या सर्वांना न्याय देण्यासाठी एक तत्पर नेतृत्व म्हणून आर.आर.पाटील यांच्याकडे पाहिले जात होते. मी त्यांना आर.आर.पाटील म्हणूनच संबोधित होतो. 1990 मध्ये आर.आर.पाटील विधानसभेवर निवडून आले. मी विधानसभेवर 1985 मध्ये निवडून आलो होतो. मी त्यांना सिनिअर होतो. आम्ही दोघेजण एकाच बाकावर बसत होतो. आम्ही दोघेजण प्रश्न, लक्षवेधी सूचना एकत्रितपणे देत होतो. बहुतांश प्रश्नांमध्ये आमच्या दोघांच्या नावांचा उल्लेख असायचा. आम्ही दोघेजण जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सभागृहात प्रयत्न करीत होतो. अशा असंख्य आठवणी माझ्या मनामध्ये आहेत.

सभापती महोदय, आर.आर.पाटील कणखर नेतृत्वासाठी देखील प्रसिद्ध होते. मी 1993 मध्ये गृह राज्यमंत्री होतो. त्यावेळी आर.आर.पाटील माझ्या मागच्या बाकावर बसत होते. आम्ही अनेकवेळा एकत्रितपणे गप्पा मारलेल्या आहेत. आर.आर.पाटील यांच्या विचारामध्ये सातत्याने गरीब माणूस केंद्र बिंदू होता. त्यांच्यासाठी ते सभागृहात तळमळीने प्रश्न मांडायचे. 1995 मध्ये युतीचे सरकार आले तेव्हा आम्हा दोघांनाही विरोधी बाकावर बसावे लागले. विरोधी पक्षामध्ये काम करताना जनतेचे प्रश्न कशाप्रकारे मांडावेत याचे त्यांना चांगले ज्ञान होते. आर.आर.पाटील यांचे भाषण सुरु झाल्यावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्य सदनामध्ये उपस्थित राहत असत.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

आर.आर.पाटील यांचे भाषण वास्तविकतेवर आधारित असायचे. ते भाषणाची मांडणी अतिशय चांगल्या प्रकारे करायचे. आम्ही सभागृहात बोलण्यासाठी आर.आर.पाटील साहेबांना प्रथम प्राधान्य देत होतो. आम्ही त्यांना सांगायचो की, हा प्रश्न गरिबांच्या संदर्भातील आहे, शेतकऱ्यांच्या संदर्भातील आहे. त्यामुळे हा प्रश्न तुम्ही मांडला पाहिजे. आर.आर.पाटील साहेब तो प्रश्न मांडून अतिशय प्रभावी प्रकारचे वक्तव्य सभागृहात करीत होते. त्या काळापासून आम्ही आर.आर.पाटील यांना ओळखायचो. त्यावेळी आम्ही जवळजवळ बसायचो. एका बाजूला मी, अजितदादा पवार साहेब आणि मध्ये आर.आर.पाटील बसायचे. त्यावेळी ते मला म्हणायचे की, माणिकराव तुम्ही गेले तीन वर्षे मंत्री राहिलात, परंतु आता 1999 मध्ये आपल्या पक्षाचे सरकार आले आणि मला मंत्री केले नाही तर मी तुम्हाला शपथविधी सुरु असताना खाली ओढेन. अशा प्रकारचे माझे आर.आर.पाटील साहेबांसोबत मैत्रीचे संबंध होते, सख्य होते.

सभापती महोदय, 1999 मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वेगळा झाल्यानंतर त्यांनी आपले संबंध कधी बिघडू दिले नाहीत. उलट एक-दुसऱ्यांना सल्ला द्यायचा असल्यास, त्यावर चर्चा व्हायची. या बाबतचे उदाहरण सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी दिले. माननीय शरद पवार साहेबांनी आर.आर.पाटील यांना 1999 मध्ये विचारले होते की, तुम्हाला ग्राम विकास विभाग हवा आहे की, अर्थ विभाग हवा आहे. आर.आर.पाटील आणि माझी खोली जवळजवळ होती. ते माझ्याकडे आले आणि मला म्हणाले की, पवार साहेबांनी मला ग्रामविकास विभागाचा मंत्री व्हायचे की अर्थ मंत्री व्हायचे, या बाबत विचारणा केली आहे. मी कोणता विभाग स्वीकारावा ? मी त्यांना सांगितले की, तुमचे आतापर्यंतचे कार्य जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून झालेले आहे, तुम्हाला सगळा अनुभव ग्रामीण विकासाबाबत आहे. त्यामुळे तुम्ही अर्थ विभागापेक्षा ग्रामविकास विभाग स्वीकारावा, असे मला वाटते. त्यानंतर आर.आर.पाटील हे पवार साहेबांना भेटले व ग्रामविकास विभाग स्वीकारण्याबाबत सांगितले. त्यांनी तेथून मला फोन करुन सांगितले की, मी पवार साहेबांना स्पष्टपणे सांगितले की मला ग्रामविकास विभाग हवा आहे आणि पवार साहेबांनी त्यास सहमती दर्शविली. महोदय, कोणताही विषय असला की आम्ही एकमेकांशी बोलायचो. मंत्री असताना आर.आर.पाटील म्हणायचे की, माणिकराव फुरसत मिळत नाही, फुरसत मिळाली की आपण बाहेर बसू. आम्ही अनेकदा एकत्र बसलो, अनेक वेळा चर्चा केल्या. मला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

आठवत नाही की, असे एकही अधिवेशन नसेल की त्या अधिवेशनात आर.आर.पाटील यांनी मला सांगितले नसेल की, आपण अधिवेशनानंतर एकत्र बसून चर्चा करु. आपण एकत्र आलो पाहिजे अशी त्यांची सातत्याची भूमिका होती. कारण काँग्रेस विचारावर त्यांची निष्ठा होती. मंत्रिमंडळातील निर्णयाबाबतचे त्यांचे विचार तुम्हा-आम्हा सर्वांना माहीत आहेत. प्रमुख नेतृत्वाने सांगितले की, असे केले पाहिजे तर त्यावर आर.आर.पाटील स्पष्टपणे आपले मत मांडायचे. शेतकऱ्यांच्या कापसाला भाव देण्याचा निर्णय असेल, सामान्य माणसाला न्याय देण्याचा निर्णय असेल, त्यावेळी सर्वसामान्यांची बाजू घेणारे नेतृत्व राज्यामध्ये कोणी होते तर त्याचा अग्रक्रम हा आर.आर.पाटील यांना द्यावा लागेल. अशा प्रकारचे एक नेतृत्व आज आपल्यामध्ये नाही याचे दु:ख तुम्हा-आम्हा सर्वांना आहे.

सभापती महोदय, नवीन विधानसभा गठीत झाल्यानंतर त्यांनी पहिल्या अधिवेशनात केलेली दोन्ही भाषणे आम्ही विधानसभेच्या गॅलरीमध्ये जाऊन ऐकली. त्यांनी सांगितले की, आम्ही सदनामध्ये बसलेलो आहोत, परंतु आमची भूमिका आम्हालाच कळत नाही. आम्ही तिकडच्या बाजूचे आहोत की इकडच्या बाजूचे आहोत हेच माहीत नाही. लोकांसमोर कशा प्रकारे वस्तुस्थिती मांडायची, लोकांना कसे हसवायचे, या बाबत त्यांनी अतिशय सुंदर शैलीमध्ये मांडणी केली. त्यावेळी संपूर्ण सभागृह खदखदून हसत होते. दोन्ही बाकावरील सदस्य हसत होते. त्यावेळी अशा प्रकारच्या नेतृत्वाला अवकाळी जावे लागेल असे वाटले नव्हते. आर.आर.पाटील यांना रुग्णालयात जावे लागेल आणि त्यातच त्यांना आपल्यातून निघून जावे लागेल असे त्या क्षणी कोणालाच वाटले नव्हते. त्यावेळी त्यांनी प्रभावीपणे, आनंदी होऊन आणि अतिशय उत्साहाने भाषण केले होते. त्यांना डॉक्टरांनी सांगितले होते की, तुम्हाला अमुक आजार झालेला आहे आणि उपचार म्हणून ऑपरेशन करावे लागेल. परंतु त्यांनी ते सर्व दाबून ठेवून पक्षाने दिलेली जबाबदारी सभागृहात व्यवस्थितपणे मांडली. त्यांनी सभागृहात सर्व वस्तुस्थितीचे विवेचन केले. परंतु आज आर.आर.साहेब आपल्यामध्ये नाहीत हे आपल्याला मान्य आणि सहनही होत नाही. विधानसभा सभागृहात आर.आर.पाटील नाहीत,त्यांची भाषणे ऐकायला मिळणार नाहीत याचे तीव्र दु:ख खालच्या आणि वरच्या सभागृहातील सदस्यांच्या मनामध्ये आहे.आमचे अतिशय जवळचे मित्र, अत्यंत प्रेम करणारे आर.आर.पाटील आमच्यातून निघून गेले याचे तीव्र दु:ख व्यक्तिश: मला आणि माझ्या कुटुंबीयाला सुध्दा आहे. मी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

पक्षाच्या वतीने सुध्दा सातत्याने सांगितले आहे की, आर.आर.पाटील साहेबांची दोन्ही पक्षामध्ये समन्वय असण्याची भूमिका असायची, तसे त्यांचे सातत्याने बोलणे असायचे, तशी त्यांची पावले असायची.

महोदय, 2004 मध्ये त्यांनी मला सांगितले होते की, माणिकराव, मी मुख्यमंत्री होणार आहे. पण 2004 मध्ये काँग्रेस पक्षाला मुख्यमंत्री पद आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला उप मुख्यमंत्री पद देण्याचे ठरले. इतरांशी जेवढे स्पष्टपणे ते बोलू शकत नव्हते तेवढे ते मित्र म्हणून माझ्याशी सर्व गोष्टी बोलायचे. त्यामुळे आर.आर.पाटील यांच्या निधनामुळे माझी आणि माझ्या कुटुंबांची प्रचंड हानी झालेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील बसलेले आहेत. त्यांनी सुध्दा त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. आज आर.आर.पाटील साहेबांना तंबाखूमुळे आपल्यातून जावे लागले हे उघड मान्य करावे लागेल. राज्यामध्ये अशा प्रकारचे मृत्यू रोज कितीतरी होत आहेत. त्यामुळे शासनाच्या वतीने तंबाखूवर बंदी आणण्याचे धाडस केले तर मला वाटते खऱ्या अर्थाने आर.आर.पाटील यांना ती श्रध्दांजली ठरु शकेल. मला वाटते या दृष्टिकोनातून राज्य शासन विचार करेल अशा प्रकारची भावना व अपेक्षा मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, कै.कॉम्रेड पानसरे यांची हत्या करण्यात आली. मी शोक प्रस्तावावर वेगळे काही बोलणार नाही. परंतु त्यांच्या निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव सदनामध्ये येऊ नये याचे आश्यर्च वाटते. अशा प्रकारची भूमिका कोणत्या विचारातून बाहेर येते ? सामाजिक विचार असलेल्या महाराष्ट्रात, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराच्या महाराष्ट्रात कॉम्रेड पानसरेंच्या निधनाबाबतचा शोक प्रस्ताव येऊ नये, अशा प्रकारचा विचार करणे सुध्दा या पुरोगामी राज्याचे दुर्दैव आहे. आपल्या पुढाकाराने सदनामध्ये सर्वांनी मागणी केली आणि त्यानंतर हा शोक प्रस्ताव मांडण्यात आला. त्यांच्या विचाराच्या संदर्भात चर्चा झाली पाहिजे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

कॉ. पानसरे यांचे संपूर्ण जीवन पाहिले तर असे दिसेल की, सामाजिक बांधिलकी म्हणून संपूर्ण राज्याला दिशा देण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी आपल्या सभा भाषणांतून वक्तृत्व केले. आपण त्यांचे विचार ज्या ज्या वेळी ऐकत होतो, त्या त्या वेळी त्यामध्ये सामाजिक बांधिलकी दिसत होती. राज्य कोणत्या विचाराने पुढे गेले पाहिजे हे सांगणारे आणि एक ठेवा असलेले कॉ. पानसरे यांचे नेतृत्व होते. त्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून आपले विचार मांडले. तसेच मोठ्या प्रमाणात साहित्य सुध्दा निर्माण केले. त्यांच्या अनेक साहित्यांचा उल्लेख केला गेला आहे. "शिवाजी कोण होता ?" हे साहित्य त्यांनी लिहिले, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी केला. सन्माननीय सदस्यांनी पुस्तकातील काही भागही सांगण्याचा प्रयत्न केला. कॉ. पानसरे यांनी एकाच विषयावर नाही तर अनेक विषयांवर साहित्य लिहिले. आपल्याला त्यांनी लिहिलेल्या साहित्यांवरून त्यांच्या नेतृत्वाची, वक्तृत्वाची, व्यक्तिमत्वाची कल्पना येते. "शिवाजी कोण होता ?" हे त्यांचे साहित्यामधील अत्यंत महत्त्वाचे पुस्तक आहे. त्यावेळी या पुस्तकाच्या दीड लाखांपेक्षा जास्त प्रतींचा खप झाला होता. आता या पुस्तकाची प्रचंड मागणी वाढली आहे. मुस्लिमांचे लाड, मंडल आयोग आणि मागासलेले मुस्लिम, सच्चर समिती व मागासलेले मुस्लिम, मंडल आयोग आणि राखीव जागांचा प्रश्न, अजून न स्वीकारलेला मंडल आयोग, धर्माच्या नावाखाली अधर्म, धर्म, जात, वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा, राजर्षी शाहू आणि वारसा, शिवजन्म, कुचाळगी ब्रिगेड आणि संभाजी ब्रिगेड, जागतिकीकरण व शेतकऱ्यांचे प्रश्न, सरकारचे पर काळजीने शेतीधोरण, डंकेलचा चौफर हल्ला, धर्मासंबंधी परिवर्तनवादाची भूमिका काय असावी, वर्तमानपत्रे व कायदा, काश्मिरबाबत कलम 370 ची कुळकथा असे अनेक साहित्य त्यांनी लिहून ठेवले आहे. सामाजिक चळवळीतील अशा थोर विचारांच्या नेतृत्वाला श्रध्दांजली वाहण्याचा प्रस्ताव मांडला आहे, त्याला मी पाठिंबा देतो. मी या संदर्भात भावना व्यक्त केलेल्या आहेत. सामाजिक चळवळीतील महान नेतृत्वास राज्य मुकले आहे. कॉ. पानसरे यांच्यावरील हल्ल्याच्या चौकशीचा विषय आहे. कै. दाभोळकरांनंतर कॉ. पानसरेंवर खुनी हल्ला झाला आहे. शासन कोणाचे होते, हा विषय नाही. कॉ. पानसरे यांची हत्या झाली आहे. कॉ. पानसरे यांची हत्या कोणत्या विचारांतून झाली आहे या संदर्भात संशय आहे, असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

नाही तर तसे पक्के मत जनतेचे होत आहे. शासनाने या संदर्भात काळजी घेऊन आरोपी कुठे आहेत हे शोधून काढणे गरजेचे आहे. खुन्यांना पकडण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने वेगवेगळ्या तपास यंत्रणांच्या माध्यमातून गुन्हेगारांना शोधावे अशी सूचना मी शासनाला करतो. श्री. परशुराम चव्हाण हे विधानपरिषदेचे सदस्य होते, त्यांचेही निधन झाले आहे. मी तीनही व्यक्तींना माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली वाहतो.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी स्व. रावसाहेब रामराव पाटील, स्व. परशुरामजी चव्हाण, स्व. कॉ. गोविंदराव पानसरे यांच्या दु:खद निधनाच्या संदर्भात या सदनात शोक प्रस्ताव मांडला आणि त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, संबंध राज्याचे आर.आर.आबा आपल्यातून निघून गेले आहेत, त्यांच्या जाण्याने राज्याचे, त्यांच्या कुटुंबाचे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेवढे नुकसान झाले आहे, कदाचित एक काकणभर आगाऊ नुकसान व्यक्तिगत धनंजय मुंडे म्हणून माझे सुध्दा झाले आहे. हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विरोधी पक्षनेता म्हणून माझ्यावर जबाबदारी आली. माझ्या जीवनावर अनेक मान्यवरांचे प्रभाव आहेत त्यापैकी आता तरी कोणीही या जगात नाहीत. अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधी पक्षनेता म्हणून पहिल्यांदा भाषण करण्यास संधी मिळेल, त्यावेळी आर.आर. आबा यांचे मार्गदर्शन घेण्याचा विचार माझ्या मनात आला. आर.आर. आबांचे मार्गदर्शन घेऊन अर्थसंकल्पीय अधिवेशनातील पहिले भाषण मला करायचे होते. कोणाच्याही जीवनात असा वाईट प्रसंग येऊ नये, असा प्रसंग माझ्या जीवनात आर.आर. आबांच्या निधनाच्या संदर्भात मांडलेल्या शोक प्रस्तावावरील भाषणामुळे आला आहे. मला ज्यांचे मार्गदर्शन घेऊन सभागृहात बोलायचे होते, त्यांच्या शोक प्रस्तावावर मला माझ्या भावना व्यक्त कराव्या लागत आहेत, यापेक्षा वाईट गोष्ट कोणतीच नाही.

सभापती महोदय, मी फार तरूण वयात राजकारणात आलो. माझा आबांचा पहिला परिचय सिम्बॉयसिस लॉ कॉलेजला असताना मुंबईमध्ये झाला. कदाचित त्याला 18-20 वर्षे झाले असतील. त्यावेळी शिवशाहीचे सरकार होते. अतिशय कठोर विरोधी पक्षाचा एक सदस्य म्हणून आबांचा परिचय संबंध राज्याला त्यावेळी होत होता. मनाची उत्कंठा आणि मनातील एक इच्छा म्हणून आबांची भेट घेतली. ते फार वेळ माझ्याशी बोलले नाहीत. ते एवढेच बोलले की, तूच का मुंडेचा पुतण्या, पुण्याला शिकायला असतो. मी म्हणालो होय. पुढे त्यांनी असे सांगितले की, शिक्षण चांगले घे, कारण राजकरणाचा आणि वकिली करणाऱ्याचा संबंध आला की, सहजासहजी वकिली होत नाही असा माझा अनुभव आहे. माझी राजकारणाच्या नादाने वकिलीही झाली नाही. मी दोनदा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

जिल्हा परिषदेचा सदस्य झालो. दुसऱ्यांदा मी जिल्हा परिषदेचा सदस्य झाल्यानंतर मला अध्यक्ष होण्याची संधी मिळाली. त्यावेळी आघाडीचे सरकार राज्यात होते. विधानसभा सभागृहात आदरणीय श्री. गोपीनाथ मुंडे साहेब भाजपचे गट नेते म्हणून काम करीत होते. बीड जिल्ह्यात भयंकर पाणी टंचाई होती. आम्ही तरूण जिल्हा परिषदेचे सदस्य होतो. त्यावेळी एक तळमळ होती की, आपण आपल्या जिल्ह्यात वेगळे काही तरी करावे. बीड जिल्ह्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी खोल गेली होती. 200 फुटापर्यंत पाणी लागत नव्हते. मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष म्हणून त्यावेळचे राज्याचे ग्रामविकास मंत्री आर.आर. आबा यांच्याकडे जाऊन विनंती केली की, राज्यात 200 फुटांचा नियम आहे. पण आज बीड जिल्ह्यात पाणी टंचाईची अत्यंत भयंकर स्थिती निर्माण झाली आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

जिल्हा परिषदेमार्फत बोअरवेलची योजना सुरु करावयाची असेल तर बोअरवेल खोदण्यासाठी 200 फुटांची मर्यादा शासनाने घातली होती. मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष या नात्याने तत्कालीन ग्राम विकास मंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांना भेटलो आणि आम्हाला विशेष बाब म्हणून 400 फुटांपर्यंत बोअरवेल खोदण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती त्यांना केली. माझ्या विनंतीला मान देऊन आबांनीही अशा प्रकारची विशेष परवानगी बीड जिल्ह्यासाठी दिली होती.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सामान्यांचे असामान्य नेतृत्त्व करणाऱ्या आबांकडे पाहून मागील दोन पिढ्यांमधील लोक राजकारणामध्ये आले, एवढा जबरदस्त प्रभाव आबांच्या व्यक्तिमत्त्वाचा होता. ज्यावेळी महाराष्ट्राला, आम्हा सर्वांना, मग ते कोणत्याही पक्षाचे किंवा कोणत्याही विचारांचे तरुण असोत, त्यांना आबांसारख्या आदर्श नेतृत्त्वाची आज गरज होती आणि त्याचवेळी आबा आपल्या सर्वांना सोडून निघून गेले आहेत.

सभापती महोदय, आर.आर.पाटील साहेबांनी घेतलेल्या अनेक निर्णयांची चर्चा अनेक मान्यवर वक्त्यांनी येथे केली आहे. मी आबांबाबत एवढेच सांगेन की, खऱ्या अर्थाने या महाराष्ट्राला, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आणि आम्हा सर्वांना त्यांची गरज होती. अशावेळी ते आज आमच्यामध्ये नाहीत. ही खंत, ही पोकळी कधीही भरुन न निघणारी आहे. मी विरोधी पक्ष नेता या नात्याने सदनातील सर्व विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या वतीने स्व.आर.आर.पाटील ऊर्फ आबांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य कै.परशुराम मारुती चव्हाण यांचा जन्म दिनांक 25 फेब्रुवारी, 1935 रोजी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील टापरेवाडी येथे झाला. एल.एल.एम. पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी फर्स्ट क्लास ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट व ॲडिशनल चीफ मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट म्हणून न्यायदानाचे कामही केले आहे. आज ते आपल्याला सोडून गेले आहेत. मी कै.परशुराम मारुती चव्हाण यांना विरोधी पक्ष नेता या नात्याने सदनातील सर्व विरोधी पक्ष सदस्यांच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, मी आपले मनापासून आभार व्यक्त करतो. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव आज या सभागृहात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

आलेला आहे. आपल्यालाही आठवत असेल की, कामकाज सल्लागार समितीमध्ये मी स्वत:, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे व हेमंत टकले आम्ही तिघांनी या प्रस्तावाबद्दल अशी विनंती केली होती की, विधानपरिषदेमध्ये कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव स्व.आर.आर.पाटील यांच्या दु:खद निधनाबद्दलच्या शोक प्रस्तावासोबत आणावा. खरे म्हणजे, या शोक प्रस्तावाच्या माध्यमातून एका विचाराला संपूर्ण सभागृहाच्या वतीने वंदन केले जाणार आहे. पण त्या दिवशी माननीय संसदीय कार्य मंत्र्यांकडून असे सांगण्यात आले की, असा प्रस्ताव आपल्याला घेता येणार नाही. खरे तर कॉम्रेड पानसरे यांच्या हत्येनंतर महाराष्ट्रभर जी चर्चा झाली होती, ती हीच होती की, 82 वर्षाच्या विचारवंताचे विचार कोणत्या अशा अविचारी तरुणावर भारी पडले की, त्याने 82 वर्षाच्या वृद्ध विचारवंताला आयुष्यातूनच संपवून टाकले. महाराष्ट्राला काळिमा फासणारी आणि पुरोगामी विचारांच्या या महाराष्ट्राला शरमेने मान खाली घालायला लावणारी ही घटना आहे.

सभापती महोदय, अनेक चळवळींमधून स्वत:चे नेतृत्त्व उभे करणे आणि ते अतिसामान्य लोकांपर्यंत, असंघटित कामगारांपर्यंत पोहोचविणे, आपल्या लेखणीने आपले विचार सामान्य माणसाच्या मनात तेवत ठेवणे, अशा प्रकारचे काम पानसरे यांनी केले. पण त्यांना संपवून टाकावे, असे कोणाला वाटत असेल तर राज्यकर्ते म्हणून काम करणाऱ्या मंडळींनी सुध्दा या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कॉम्रेड पानसरे हे वयाने ज्येष्ठ होते. मघाशी सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील यांनी एक उदाहरण दिले. पानसरेंच्या चिरंजीवाचे निधन झाल्यानंतर चिरंजीवाला अग्नी देताना वडिलांना सर्वात मोठे दु:ख कोणते असेल तर आपल्या तरुण, एकुलत्या एका मुलाला आपल्याला अग्नी द्यावा लागत आहे, याचे ते दु:ख होते. पण तरीही स्वत:चे विचार आणि चळवळ त्यांनी जीवंत ठेवली. अशा एका ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्याला, कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांना मी विरोधी पक्ष नेता या नात्याने सदनातील विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी आणि माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.आर.आर.पाटील ऊर्फ आबा हे फार लवकर आपल्यातून निघून जातील, असे कधीही वाटले नव्हते. ज्यावेळी मी विधानपरिषदेचा विरोधी पक्ष नेता होतो, त्यावेळी आबांचा आणि माझा जवळचा संबंध आला. त्या काळात त्यांची आणि माझी जवळीक वाढली. सर्वसामान्य माणसाच्या घरात जन्माला येऊन किंवा शेतकऱ्याच्या पोटी जन्माला येऊन कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना, कोणताही राजकीय वरदहस्त नसताना, स्वतःच्या कर्तृत्त्वाने राजकारणात येऊन सामान्य माणसाशी आपल्या जीवनाची नाळ पक्की ठेवणारा एक नेता म्हणजे आबा होते, हे आपल्याला सातत्याने दिसून आले आहे.

सभापती महोदय, मी विरोधी पक्षनेता झालो त्यावेळी महाराष्ट्रामध्ये सावकारीचा विषय ऐरणीवर आला होता. एकही अधिवेशन असे पार पडत नव्हते की, ज्यामध्ये सावकार आणि शेतकरी यांचा विषय चर्चेला आला नसेल. त्यावेळी शेतकऱ्यांशी बांधिलकी असणा-या आर.आर.पाटील या एकमेव नेत्याने मंत्री म्हणून माझ्या प्रश्नाला सभागृहात उत्तर देत असताना असे सांगितले होते की, "फुंडकर साहेब, या महाराष्ट्रातील सावकारी संपविल्याशिवाय मी राहणार नाही. मी गृहमंत्री पदावर असताना जे जे कोणी शेतकऱ्याला त्रास देत असतील त्या सावकाराला कोपरापासून ढोपरापर्यंत सोलल्याशिवाय मी राहणार नाही." हे वाक्य नंतर सर्व महाराष्ट्रभर गाजले. काही लोकांनी या वाक्याची नंतर खिल्ली उडविली असली तरी त्यांनी निर्धाराने राज्यात सावकारी प्रतिबंधक कायदा आणला. त्या कायद्याचे खरे श्रेय जर कुणाला द्यायचे असेल तर ते आर.आर.पाटील यांनाच दिले पाहिजे. ज्या ज्या वेळी शेतकऱ्यांचे प्रश्न विधानपरिषदेमध्ये, विधानसभेमध्ये निघायचे त्यावेळी सावकारांवर आसूड ओढणारे सत्तारूढ पक्षातील आर.आर.पाटील हे एकमेव नेते होते.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर...

ते जे बोलत होते ती बाब ती करुन दाखवित होते. माझ्याशी खाजगीमध्ये अनेक वेळा ते बोलत होते. मी विरोधी पक्षनेता असताना ते म्हणत होते की, भाऊसाहेब मी तुमच्या विचाराशी सहमत आहे. महाराष्ट्रातील सावकारी प्रथा मोडून काढल्याशिवाय आपण स्वस्थ बसायचे नाही. त्यामुळे स्व.आर.आर.पाटील यांच्या पुढाकाराने सावकारी प्रतिबंध कायदा आल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांवर मोठे उपकार केले आहेत. तंटा मुक्ती अभियान, संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान, त्यामुळे या सभागृहात सर्वात महत्वाचा निर्णय सावकारी प्रतिबंध कायदा हा झाला आहे. महाराष्ट्रातील सावकारग्रस्त शेतकऱ्यांना संरक्षण देण्याचे काम स्व.आर.आर.पाटील यांनी केले आहे ते कधीही विसरता येणार नाही. अत्यंत दिलदार मनाचा नेता होता, अनेक वेळा अनेक प्रसंगाच्या वेळी स्व.आर.आर.पाटील यांच्या दालनात गेल्यावर त्यांच्याशी चर्चा करताना शेतकऱ्यांबाबत त्यांना जो कळवळा होता तो शब्दांत सांगता येण्यासारखा नाही.

सभापती महोदय, मी विरोधी पक्ष नेता झाल्यापासून ज्या ज्या वेळी त्यांचा व माझा संपर्क आला, त्यावेळी अतिशय मित्रत्वाच्या नात्याने भावाच्या नात्याने त्यांनी मला वागणूक दिली होती. दोन वर्षापूर्वी झालेल्या खामगांव नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये ते खामगांव येथे प्रचारासाठी आले होते. त्यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष व शिवसेना हे सर्व पक्ष वेगवेगळे निवडणुका लढवित होते. एकमेकांच्या विरोधात निवडणूक प्रचार सुरु होता. खामगांव येथे ते प्रचारासाठी येणार अशी मला माहिती मिळाल्यावर मित्राला भेटले पाहिजे म्हणून मी त्यांना निरोप दिला. त्यांनी असे सांगितले की, सभा संपल्याशिवाय आपणाला भेटता येणार नाही. सभा आटोपल्यावर ते हेलिपॅडवर आले होते. सदर हेलिपॅड माझ्या घराच्या मागच्या बाजूला होते. तेथे मी त्यांना भेटावयास गेलो होतो. त्यावेळी मी विधानपरिषदेचा विरोधी पक्षनेता होता. ते हेलिकॉप्टरमध्ये बसण्याच्या वेळी तेथे पोहचलो होतो. मी त्यांना म्हणालो की, आबा आज आपण आमच्या गावात आला आहात, तुमचे स्वागत आहे, तुम्ही माझ्या विरोधात प्रचार करण्यासाठी आला आहात. एका राजकीय पक्षाचा विचार तुम्ही मांडण्यासाठी आला आहात. माझी एक विनंती आहे की, तुम्ही येथे आला आहात तर फक्त दोन मिनिटे माझ्या घरी चला चहा घेऊन आपण जाऊ शकता. त्यांनी एक पाय हेलिकॉप्टरमध्ये टाकलेला असताना तो मागे घेऊन ते म्हणाले की, चला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर...

मी फक्त पाच मिनिटे आपणाकडे थांबतो. कारण मला पुन्हा पुढील दुसऱ्या सभेसाठी जावयाचे आहे. मला या ठिकाणी उल्लेख करावासा वाटतो की, ते घरी आल्यानंतर आमच्या कुटुंबीयांना गृहमंत्री घरी आले असे कधीच वाटले नाही. ते संपूर्ण घरात फिरुन घरातील सर्वांची आस्थेने चौकशी करीत होते. पाच मिनिटांऐवजी ते अर्धा तास माझ्या घरी थांबले होते. अशा पध्दतीचा हा नेता होता. विरोधी पक्ष किंवा सर्वांना आपणासा वाटणारा हा नेता होता. आज ते आपल्यातून निघून गेले आहेत. त्यांना भेटण्यासाठी मी हॉस्पीटलमध्ये गेलो होतो त्यांना भेटण्यास तेव्हा बंदी होती. त्यांच्या तब्येतीची चौकशी बाहेरुन करुन मला तेथून परतावे लागले होते. त्यांची व माझी प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही.

सभापती महोदय, नियती कधी कधी असा क्रूर खेळ खेळत असते. 'जो आवडे सर्वांना तोचि आवडे देवाला' अशी मराठीत एक म्हण आहे ती म्हण खोटी नाही. महाराष्ट्राला दिशा देणारे नेतृत्व महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना आपलेसे वाटणारे नेतृत्व, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आधार व दिलासा देणारे नेतृत्व आपल्यातून निघून गेले आहे. राष्ट्रवादी पक्षाची हानी झालीच आहे तशीच संपूर्ण महाराष्ट्राची देखील मोठी हानी झाली आहे. मी माझ्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, श्री.परशुराम मारोती चव्हाण यांना देखील मी श्रध्दांजली अपर्ण करतो. त्याचप्रमाणे कॉ.गोंविदराव पानसरे हे चळवळीतील नेते होते,त्यांची महाराष्ट्रात अशा पध्दतीने हत्या होणे हे महाराष्ट्राला न शोभणारे कृत्य महाराष्ट्रात घडले आहे. महाराष्ट्रासाठी ही हत्या म्हणजे एक मोठा कलंक आहे. अशा प्रकारची कृत्ये पुन्हा होऊ नयेत, याची दखल महाराष्ट्राने किमान घेतली पाहिजे. अशा प्रकारची मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे माननीय नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझ्या शोकसंवेदना व्यक्त करण्याची परवानगी आपण दिली त्याबाबत मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, श्री.आर.आर.पाटील यांना संपूर्ण महाराष्ट्र आबा म्हणून ओळखत होते. त्यांचे अकाली झालेल्या निधनामुळे केवळ सभागृहातील सन्माननीय सदस्यांना किंवा त्यांच्या मतदारसंघातील जनतेलाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला चटका लावणारी ही घटना आहे. वक्तृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्व यांचा त्रिवेणी संगम श्री.आर.आर.पाटील यांच्या व्यक्तिमत्वात होता. सभागृहात किंवा सभागृहाच्याबाहेर ते सातत्याने संघर्ष करीत होते. त्यांचे निधन झाले त्यावेळी त्यांना माहिती होते की, यातून आपण आता बाहेर पडणार नाही तरी देखील त्यांनी अतिशय खंबीरपणे मृत्यूशी झुंज देत शेवटचा श्वास घेतला होता. हेही धाडस त्यांनी दाखविले होते.

सभापती महोदय, त्यांची व माझी पहिली भेट झाली तेव्हा मी त्यांना रावसाहेब म्हणून ओळखत होतो. तेव्हा मी राजकारणात नव्हतो. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळावे यासाठी मी लॉंगमार्च काढला होता. त्यावेळी आंदोलन सुरु होते. क्रांतीवीर नाथनाथ अण्णा नायकवाडी यांनी एक बैठक घेतली होती. त्यांचा हुतात्मा साखर कारखाना आहे. मंत्री महोदय, श्री.चंद्रकांत पाटील यांना त्याबाबत माहिती आहे. हुतात्मा साखर कारखान्याची पहिली मोळी टाकण्याचा कार्यक्रम होता. माननीय श्री.बाळासाहेब विखे-पाटील यांना देखील तेथे बोलविले होते. तेव्हा आम्ही सर्व लोक विरोधी पक्षात होतो. श्री.बाबा आढाव होते, त्या ठिकाणी श्री.आर.आर.पाटील देखील उपस्थित होते. नागनाथ अण्णा नायकवाडी श्री.आर.आर.पाटील यांना रावसाहेब म्हणत होते. मी राजकारणात नव्हतो तेव्हा ते पहिल्यांदा आमदार झाले होते. सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ते ग्रामपंचायत सदस्यांपासून पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांपासून त्यांनी मोठमोठी पदे काबिज केली होती. त्यांनी ही पदे कर्तृत्व, नेतृत्व व वक्तृत्वाने जिंकली आहेत, त्यांच्या प्रथम भेटीत मला फूले, आंबेडकर, शाहू व शिवरायांचा वैचारिक वारसा दिसला होता. त्यामुळे मी प्रभावित झालो होतो. त्यांची व माझी पहिली भेट झाली तेव्हा ते राजकारणात होते, मी राजकारणात नव्हतो. त्यांच्याकडे हजरजबाबीपणा होता. ते नेहमी सडेतोड

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

बोलत होते. ते उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट संघटक होते. सामाजिक पिंड ज्याला आपण म्हणतो तो अत्यंत महत्वाचा गुण त्यांच्यामध्ये होता. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याबाबत अनेक आठवणी सांगितल्या आहेत. त्यांची मी पुनरावृत्ती करणार नाही. देशात राजकीय पातळीवर जे स्वच्छता अभियान सुरु आहे त्याचे प्रणेते स्व.आर.आर.पाटील हे आहेत. महाराष्ट्रात त्यांनी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरु केले होते. स्व.आर.आर.पाटील यांनी हे अभियान सुरु केले ते फक्त गावातील घाण काढण्यासाठी नव्हते. हजारो वर्षापूर्वीपासून आपल्या मनात जातीयतेची घाण आहे, विषमतेची व भ्रष्टाचाराची घाण आहे.

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

कै.आर.आर.पाटील साहेबांनी ही घाण स्वच्छ करण्यासाठी संत गाडगे बाबांचा प्रतिकात्मक उपयोग केला, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी ग्राम स्वच्छता अभियान, तंटा मुक्ती अभियान सुरु केले.

सभापती महोदय, माझे एकदा त्यांच्या बरोबर भांडण झाले होते. ते भांडण कशासाठी होते ? ते ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा घेण्याचा प्रस्ताव मांडला होता. मी त्यांना सांगितले की, ग्रामपंचायत असताना ग्रामसभेची काय आवश्यकता आहे ? एकाच गावात दोन संस्था कशासाठी पाहिजेत ? मी त्यांना असेही सांगितले की, गावात अल्पसंख्याक, दलित समाजाच्या लोकांची संख्या कमी असते. गावात मागासवर्ग समाजाची लोकसंख्या कमी असते व इतर समाजाची लोकसंख्या जास्त असते. मग ग्रामसभेत अल्पसंख्याक समुदायाच्या विरुद्ध एखादा ठराव पास करावयाचा असेल तर कसे होणार ? त्यांनी सांगितले की, आपण काळजी करु नका, असे काहीही होणार नाही. ग्रामसभा ही देखील कै.आर.आर.पाटील साहेबांचीच देणगी आहे. त्यांनी महात्मा गांधी तंटा मुक्ती अभियान सुरु केले. गावातील भांडणे गावातच मिटविली पाहिजेत. त्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये जाण्याची आवश्यकता नाही, कोर्टात जाण्याची आवश्यकता नाही, त्यासाठी अनावश्यक खर्च करायचा नाही. लोकांचा खर्च वाचवावा हा त्या मागील दृष्टीकोन होता. गावातील भांडणे सामंजस्याने गावातच मिटविली पाहिजेत या हेतूने त्यांनी महात्मा गांधी तंटा मुक्ती अभियान सुरु केले होते.

सभापती महोदय, कै.आर.आर.पाटील साहेबांबरोबर मी तासगाव येथे गेलो होतो. त्यावेळी आपल्या शिराळा गावी त्यांच्या बरोबर माझी बैठक झाली होती. त्यावेळी ते सत्तेत नव्हते. त्यावेळी राज्यात युती शासन सत्तेवर होते. आम्ही तासगाव येथील एका समारंभाच्या उद्घाटनाला गेलो होतो. गौतम बुद्धांच्या हाताप्रमाणे असलेल्या सिम्बॉलचा तो उद्घाटन समारंभ होता. कै.आर.आर.पाटील साहेबांच्या अध्यक्षतेखाली तो उद्घाटन समारंभ होणार होता. आम्ही दोघेही त्या समारंभासाठी गेलो होतो. ते मला 'सर' म्हणत असत. उद्घाटन समारंभ झाल्यानंतर स्टेजवर येऊन ते मला म्हणाले की, सर, हा जो सिम्बॉल आहे, या सिम्बॉल प्रमाणेच तंटा मुक्ती अभियान पुरस्काराचा सिम्बॉल आहे. आम्ही स्टेजवर गेलो. समारंभाला सुरुवात झाली. ज्यावेळी मला

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

बोलण्याची संधी मिळाली त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, आपण हा जो सिम्बॉल घेतला, तो खूप सुरेख आहे. परंतु मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते आणि ते म्हणजे ज्या खैरलांजी गावात भोतमांगे परिवाराचा सत्यानाश झाला त्या गावाला देखील तुमच्या विभागाने तंटा मुक्ती अभियान पुरस्कार दिलेला आहे. हे ऐकून त्यांना देखील धक्का बसला. त्यावेळी त्यांनी जाहीर सभेत सांगितले की, मी येथून गेल्यानंतर असे कसे घडले याचा तपास करतो. खैरलांजी प्रकरणामुळे आपल्या राज्याची संपूर्ण जगात बदनामी झाली. आपल्या देशाला शरमेने मान खाली घालावी लागली, त्या गावाला तंटा मुक्तीचा पुरस्कार मिळतो ? कै.आर.आर.पाटील साहेबांना हे खूप लागले. त्यांनी हे खूप मनावर घेतले. तो कार्यक्रम संपल्यानंतर ते मुंबई येथे आले आणि त्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तंबी दिली की, ज्या गावामध्ये अशा प्रकारची जातीयवादी प्रकरणे होत असतील, अत्याचार होत असतील अशा गावांना यापुढे तंटा मुक्ती अभियान पुरस्कार द्यायचा नाही. उलट त्या गावांना दंड कसा करता येईल हे बघावे, अशा प्रकारची भूमिका त्यांनी घेतली.

सभापती महोदय, मघाशी आमच्या मित्रांनी त्यांच्या भाषणात सावकारी प्रथेच्या संदर्भात उल्लेख केला. सावकार शेतकऱ्यांना छळतात, सावकारांच्या जाचामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागतात. म्हणून कै.आर.आर.पाटील साहेबांनी सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याची घोषणा केली. सावकार शेतकऱ्यांची अडवणूक करीत असतील, पिळवणूक करीत असतील, शेतकऱ्यांच्या घरावर जप्ती आणत असतील, बेकायदेशीर सावकारी करीत असतील तर त्यांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याची त्यांनी घोषणा केली. ही साधी गोष्ट नाही. ठीक आहे, त्यांनी कोणाला कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढले नसेल. पण त्यांच्या एका वाक्यामुळे, त्यांच्या अशा भूमिकेमुळे संपूर्ण राज्यातील सावकार सूतासारखे सरळ झाले. यापुढे शेतकऱ्यांचे शोषण करणे उचित होणार नाही याचा सावकारांना शंभर वेळा विचार करावा लागला. लोक भावनेचा आदर कसा करायचा याचे उत्कृष्ट आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे कै.आर.आर.पाटील साहेब आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, मुंबई शहरावर 26/11 रोजी दुर्दैवी हल्ला झाला. त्या हल्ल्यात अनेक अधिकारी मारले गेले. आपण मघाशी कै.तुकाराम ओंबळे यांच्या नावाचा उल्लेख केला. गिरगाव चौपाटीवर कै.तुकाराम आंबळे यांचा पुतळा बसविण्यात आलेला आहे. कै.आर.आर.पाटील साहेबांच्या काळातच तो पुतळा बसविण्यात आलेला आहे. त्यावेळी वर्तमानपत्रात चुकून एक बातमी छापून आली आणि त्या बातमीचे काहूर माजविण्यात आले. अनेक लोक अनेक गोष्टी बोलतात, त्याचे काही नाही. परंतु वर्तमानपत्रात छापून आलेल्या त्या बातमीचे काहूर माजविण्यात आले. त्यांच्या संवेदनशील मनाला ते पटले नाही. ते आपला बाडबिस्तरा घेऊन सरळ आपल्या अंजनी गावी गेले. त्यावेळी त्यांनी कोणालाही विचारणा केली नाही. सत्ता सोडण्यासाठी देखील अभाळाएवढे काळीज लागते.

सभापती महोदय, कै.आर.आर.पाटील साहेबांचे सामाजिक भान कसे होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे जेम्सलेन प्रकरण होय. जेम्सलेन याने शिवबा, जिजाऊ मॉ साहेबांची बदनामी करणारे पुस्तक लिहिले. त्यावेळी कै.आर.आर.पाटील साहेबांनी जेम्सलेन याला लंडन येथून पकडून आणू आणि जेलमध्ये टाकू, अशा प्रकारची भाषा सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर देखील वापरली. ते अशा प्रकारे कणखर भूमिका घेत होते. राजकारणातील एक पुरोगामी व्यक्तिमत्व, सर्व समावेशक व्यक्तिमत्व, स्वत:च्या पक्षातील लोकांना आणि विरोधकांना देखील हयात लेकर चलो, कायनात लेकर चलो, सारी दुनिया को साथ लेकर चलो, अशा प्रकारची भूमिका घेणारे कै.आर.आर.पाटील आपल्यातून निघून गेले, ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. त्यांच्या जाण्यामुळे आम्ही राजकारणातील पुरोगामी व्यक्तिमत्व गमविले. त्यांच्या जाण्यामुळे महाराष्ट्राचे खूप मोठे नुकसान झालेले आहे. लोक पुरोगामित्वाच्या खूप गोष्टी बोलतात. परंतु ज्याला आपण अंत:करणापासून म्हणतो, म्हणजे जळणाऱ्याला आगीची धग कळते, पाहणाऱ्याला ती कळत नाही. ते ज्या परिस्थितीतून आले, त्यांना त्या आगीचे चटके बसले, तेव्हा त्यांना गरिबांचे दु:ख कळले आणि त्यांनी गरिबांसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. मी माझ्या वतीने, माझ्या कुटुंबीयांच्या वतीने, रिपब्लिकन पक्षाच्या वतीने त्यांच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

कै.परशुराम मारुती चव्हाण हे भटक्या विमुक्त समाजाचे नेते होते. भटक्या विमुक्त समाजासाठी त्यांनी बरेच काम केलेले आहे. कै.चव्हाण यांचे दिनांक 27 जानेवारी, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी माझ्या वतीने, माझ्या कुटुंबीयांच्या वतीने, रिपब्लिकन पक्षाच्या वतीने त्यांच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करतो.

कॉ.गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांच्या विषयी बोलण्यासारखे बरेच काही आहे. परंतु मी फक्त दोन-तीन गोष्टींचाच उल्लेख करणार आहे. कॉ.गोविंद अण्णा पानसरे यांनी शाहू महाराजांच्या क्रांती भूमितून आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. कॉ.गोविंद अण्णा पानसरे यांची करण्यात आलेली हत्या हा महाराष्ट्राला लागलेला सर्वात मोठा कलंक आहे. कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या हत्येमुळे महाराष्ट्राची दोन प्रकारात विभागणी झालेली आहे. एक म्हणजे, पुरोगामी महाराष्ट्र विरुद्ध प्रतिगामी महाराष्ट्र अशी ती विभागणी आहे. कॉ.गोविंदराव पानसरेंच्या हत्येमुळे पुरोगामी महाराष्ट्र विरुद्ध प्रतिगामी महाराष्ट्राने युद्ध सुरु केलेले आहे, असे मला वाटते. शासन याचा गांभीर्याने विचार करणार आहे की नाही, याची खात्री शासनाने सभागृहाला दिली पाहिजे. महात्मा गांधीजींच्या हत्येपासून हा विषय चालत आलेला आहे. महात्मा गांधीजींची हत्या झाली, त्याला वध म्हटले गेले. गांधी हत्येला गांधी वध म्हणतात. पुणे येथे कै.दाभोळकरांची हत्या झाली.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

त्याच पुण्यामध्ये 'ध' चा 'मा' झाला हे आपण समजू शकतो. परंतु तेथे देखील डॉ.नरेंद्र दाभोळकरांची हत्या झाली. अजून त्या घटनेतील आरोपींना अटक झालेली नाही. 82 वर्षाचे विद्वान, पुरोगामी, कामगार व कष्टकऱ्यांच्या व लढणाऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसणारे नेते कॉ.पानसरे यांची हत्या झाली. त्याबद्दल वध म्हटले नाही हे बरे झाले. गांधींची हत्या करणारे लोक गांधीचा वध म्हणतात, हीच मंडळी कॉ.पानसरेंच्या हत्येला जबाबदार नाहीत ना? सरकारने याची दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, परवा मी त्यांच्या पत्नींना भेटून आलो. त्यांचा संपूर्ण परिवार धैर्यवान आहे. कम्युनिस्ट वर्गाचा जो लढा झाला, जाती अंताचा लढा झाला तो कॉ.पानसरे यांनी उभा केला होता. जाती अंताचा लढा ज्यांना आवडला नाही अशा प्रतिगामी महाराष्ट्राने कॉ.पानसरे यांची हत्या केली असा माझा आरोप आहे. भाई माधवराव बागल यांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा उभा केला होता. ते कामगारांचे अनभिषिक्त नेते होते. कॉ.पानसरे यांच्या हत्येचे आरोपी सापडले पाहिजेत, त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे.

सभापती महोदय, आर.आर.पाटील, परशुराम चव्हाण व कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या स्मृतीस माझ्या पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मी श्रध्दांजली अर्पण करतो. या माध्यमातून एक विनंती करतो की, कॉ.पानसरे यांच्या हत्यारांना ताबडतोब जेरबंद करुन त्यांना कठोर शिक्षा व्हावी तरच ख-या अर्थाने कॉ.पानसरे यांना श्रध्दांजली अर्पण केली असे म्हणता येईल. प्रत्येकाने जात पात वगैरे प्रथा बंद केली. अनेकांनी या ठिकाणी व्यसनाचा उल्लेख केला. आर.आर.पाटील यांच्याशी माझी पहिली भेट मी एक साधारण कार्यकर्ता असताना नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या घरी वाळवा येथे झाली. खैरलांजीच्या प्रश्नावर काय झाले याची आपल्याला माहिती आहे. आर.आर.पाटील यांच्या निधनाने व्यसनमुक्तीचा संदेश दिला गेला असे म्हटले गेले. तंबाखू, दारु, सिगारेट आदी अनेक प्रकारची व्यसने आहेत. अंधश्रध्दा, कर्मकांड, जातीवाद, उच्च नीचता या सर्वांविरुध्द लढण्याचे काम आपण सर्वांनी मिळून केले पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण श्रध्दांजली अर्पण केली असे म्हणता येईल. मी पुन्हा एकदा आर.आर.पाटील, परशुराम चव्हाण व कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या स्मृतीस श्रध्दांजली अर्पण करुन थांबतो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय श्री.एकनाथराव खडसे यांनी जो शोक प्रस्ताव मांडला त्यावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, आर.आर.पाटील यांच्याबद्दल शोक प्रस्तावावर बोलण्याची वेळ यावी यासारखी दुसरी दुर्दैवी गोष्ट असू शकत नाही. आर.आर.पाटील आणि माझे संबंध कसे होते, किती होते याची या ठिकाणी उपस्थित असलेल्या अनेकांना कल्पना आहे. आर.आर.पाटील यांनी सुरुवातीपासून मला लहान भावाप्रमाणे वागणूक दिली. मी देखील त्यांना मोठ्या भावाप्रमाणे मानत होतो. त्यांचा प्रत्येक शब्द मोठया भावाच्या नात्याने झेलायचो. आर.आर.पाटील यांनी सांगितले आणि मी केले नाही अशी एकही गोष्ट नाही. आर.आर.पाटील आजारी पडले, रुग्णालयात दाखल झाले, परंतु तेथून ते बाहेर आले नाहीत.

सभापती महोदय, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या दरम्यान त्यांना आजाराची जाणीव झाली होती. दुर्दैवाने त्यांनी त्याकडे अधिक गांभीर्याने पाहिले नाही. त्यांनी आजार अंगावर काढला. आजही त्यांच्याबद्दल बोलत असताना भावनावेग दाटून येतो. ते नजरेसमोरुन हलत नाहीत. असे वाटते की, ते आता सभागृहात येतील आणि आपल्याला हसवतील. त्यांचे पार्थिव पाहून अनेकांनी हंबरडा फोडला. त्यांच्या आईला दु:खावेग आवरता आला नाही. त्यांचे आईवर आणि आईचे त्यांच्यावर अतोनात प्रेम होते.

सभापती महोदय, राष्ट्रवादी मासिकामध्ये लिहायचा प्रसंग आला तेव्हा आम्ही त्यांना लिहिण्याबद्दल विनंती केली. ते म्हणाले की, मला इतर काही लिहायचे सांगू नका, मी आईबद्दल लेख लिहितो. त्यांचे आपल्या आईवर इतके प्रचंड प्रेम होते. उप मुख्यमंत्री पदाची शपथ घेत असताना त्यांचे हात थरथरत असल्याचे आपण अनेकांनी दूरदर्शनच्या माध्यमातून पाहिले असेल. आम्ही त्यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता ते म्हणाले होते की, मी सामान्य घरातून आलेला एक कार्यकर्ता असताना उप मुख्यमंत्री झालो. माझ्यासमोर माझी आई बसली होती. आजवर आमदार, मंत्री पदाची शपथ घेत असताना कुटुंबातील कोणीही व्यक्ती माझ्यासमोर नव्हती. परंतु उप मुख्यमंत्री पदाची शपथ घेण्यासाठी जात असताना मी आईला आणले होते आणि तिला बघून उचंबळून आले, त्यामुळे माझे हात थरथरायला लागले.

नंतर श्री.भारवि...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

त्यांचे आईवर खूप प्रेम होते. ब्रीच कँडी रूग्णालयात दाखल होण्यापूर्वी काही डॉक्टरांसमवेत बैठक झाली होती. त्या बैठकीला मी स्वतः उपस्थित होतो. आपल्या आजारपणाची कल्पना त्यांनी पवार साहेबांना देखील दिली नव्हती. एवढेच नव्हे तर त्यांनी घरातील लोकांना सुद्धा कळविले नव्हते. आपले दु:ख आईला सोसवणार नाही हे त्यांना माहीत असल्यामुळे त्यांनी आईच्या व घरच्यांच्या परोक्ष उपचार करण्यास सुरूवात केली होती. आपण उपचार घेतल्यानंतर आजारातून बाहेर पडू असे त्यांना वाटले होते. पूर्ण बरे झाल्यानंतर आई समोर जाऊ असा त्यांचा दृढ आत्मविश्वास होता. एवढे प्रेम त्यांचे आईवडिलांवर होते.

सभापती महोदय, आबांबद्दल सगळे बोलले. आबा हे सगळ्यांचे होते असा उल्लेख माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी केला. या राज्यातील दलित, शेतकरी, समाजवादी, हिंदुत्त्ववादी किंवा अन्य चळवळींशी त्यांचा संबंध नव्हता असे नाही. त्यांचा संबंध हा वरवरच नव्हता. त्यासंबंधातील अनेक उदाहरणे देता येतील. त्यांना प्रत्येकाप्रती आत्मीयता आणि जिव्हाळा होता. एकदा ते कोल्हापूरला गेले असताना दूध उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. त्यावेळी शेतकऱ्यांनी त्यांची गाडी अडवून गाडीवर दुधाचा कॅन उपडा केला. ही घटना अनेकांना माहीत देखील असेल. या घटनेनंतर ते मुंबईत आल्यावर त्यांच्यावर अनेकजण रागावले. त्यावेळी त्यांना सुनावण्यात आले होते की, आपण गृह मंत्री आहात. आपल्या गाडीवर दूध ओतले गेले. दुधाच्या ऐवजी दुसरे काही असते आणि आपणाला काय झाले असते तर अशी विचारणा त्यांच्याकडे केली असता त्यांनी सांगितले की, ते सर्वजण आपलेच आहेत. ते एका विषयासंबंधी आंदोलन करीत असले तरी देखील ते शेतकऱ्यांसंबंधी चळवळ करीत आहेत. ते आपल्या राज्यातील, गोरगरीब जनतेसंबंधी चळवळ करीत आहेत. ते त्यांच्या भावना वेगळ्या पद्धतीने व्यक्त करीत असले तरी ते आपले असल्यामुळे आपल्याला कधीही अपाय करणार नाहीत याची मला पक्की खात्री आहे. त्यांच्या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे. त्यामुळेच सर्वच चळवळींसाठी त्यांनी प्रेमाची, जिव्हाळ्याची भूमिका सदैव घेतली होती. त्यांच्यामुळे मला अनेक दऱ्याखोऱ्यांमध्ये जाण्याचा योग आला. आबांमुळे आम्ही श्रीमती मेघा पाटकर यांच्या नर्मदा खोऱ्यातील आंदोलनाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

देखील भेट दिली होती. जेथे चालणे सुद्धा शक्य नाही अशा ठिकाणी आम्ही आबांबरोबर गेलो होतो. तेथे आबा निव्वळ चळवळीच्या प्रेमाखातर गेले होते. कोणत्याही राज्यकर्त्याला जे भाग्य किंवा आपुलकी लाभली नाही ती आबांना लाभली. आबांच्या निवडणुकीला श्री.अण्णा हजारे, श्रीमती मेधाताई पाटकर, श्री.धर्माधिकारी यांसारख्या राजकारणाशी संबंध नसलेल्या व्यक्तींनी देखील तासगावला जाऊन आबांच्या निवडणुकीचा प्रचार केला होता. राज्यात वेगळे वातावरण असताना सुद्धा त्यांनी सांगितले होते की, काहीही असले तरी मी निवडणून येणार. त्यांचा लोकांच्याप्रती प्रचंड आत्मविश्वास होता. येथे अनेकांनी आबांचे वर्णन केले आहे. आबांनी गाडगे महाराज स्वच्छता अभियान, तंटामुक्ती गाव योजना, डान्स बार बंदी, गुटखा बंदी, सावकारी प्रतिबंधक विधेयक अशा प्रकारची महत्त्वाची कामे केलीत. एवढेच नव्हे तर महिलांना झेंडावंदनाचा अधिकार देखील त्यांनी मिळवून दिला होता. पोलीस ठाण्याच्या माध्यमातून महिला पोलिसांना इन्चार्ज देखील त्यांनी बनविले होते. आपल्या महाराष्ट्राला माणूस गेल्यांतर त्याचे मोठेपण कळते. आबांनी घेतलेल्या निर्णयामध्ये मोठेपण किती आहे हे आता दिसून येते. हे मोठेपण असेच आले नाही. हे मोठेपण त्यांनी त्यांच्या विचारातून आणि आचरणातून प्राप्त केलेले आहे. त्याची किंमत देखील त्यांना अनेक वेळा मोजायला लागली आहे. माझी मुले देखील जिल्हा परिषदांच्या शाळेमध्ये शिकत असल्याचा उल्लेख ते अनेक वेळा करीत होते. यावरून आमची त्यांच्याशी अनेक वेळा शाब्दिक चकमक देखील उडायची. त्यावेळी आम्ही त्यांना सांगायचो की, आबा आपण जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये होतात. तेथे आपले आईवडील होते. त्यामुळे आपण त्या शाळेमध्ये होता. यात मुलांचा काय दोष आहे. त्यावेळी ते असे सांगायचे की, माझ्या गावातील लोक देखील तेथेच आहेत. त्यामुळे माझी मुले देखील तेथील शाळेतच असली पाहिजेत. ही जी लोकांच्या प्रती असलेली कमिटमेंट आज कमी जणांमध्ये पहायला मिळते. आबा हे निरपेक्षवृत्तीने काम करीत होते. ते भ्रष्टाचारापासून लांब होते. यासाठी देखील त्यांना किंमत मोजावी लागली आहे. ते आजारी असताना त्यांच्या कुटुंबाला श्री.वसंत डावखरे यांच्या बंगल्यावर रहावे लागले. आबा अनेक वर्ष या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

राज्याचे मंत्री होते. गृह मंत्री होते. पण या माणसाचे मुंबईत घर नाही. आबा हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन वेळा प्रदेशाध्यक्ष झाले. त्यावेळी त्यांच्या समवेत काम करण्याचा प्रसंग माझ्यावर आला होता. पहिल्यांदा ज्यावेळी ते प्रदेशाध्यक्ष झाले त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी प्रदेशाध्यक्ष होतो, पण एका अटीवर. पैशाची भानगड मला आपण सांगू नये. पक्ष वाढविण्याचे काम मी करेन. पण पक्षासाठी निधी मिळवून देण्याच्या भानगडीत मला काही ओढू नका. हे मान्य असेल तरच मी प्रदेशाध्यक्ष होतो. हे सांगण्याचे धाडस व तसे वागण्याचे धाडस त्यांनी शेवटपर्यंत दाखविले. निष्कलंकपणे काम करण्याची प्रवृत्ती आज कमी लोकांमध्ये आहे. त्यापैकी एक आबा होते.

सन 2004 मध्ये लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. दुर्दैवाने श्री.पवार साहेबांना आजार झाला. त्यावेळी राष्ट्रवादी पक्षाची धुरा कोण सांभाळणार असा प्रसंग आला होता. तेव्हा श्री.पवार साहेबांनी व पक्षाने त्यांच्यावर धुरा सोपविली. त्यांनी समर्थपणाने त्यावेळी ती धुरा सांभाळली होती.

सभापती महोदय, आबा हे अतिशय हळवे असले तरी त्यांनी अतिशय कणखरपणाने देखील काही निर्णय घेतले आहेत. त्यांनी उप मुख्यमंत्री पदाचा राजीनामा का दिला हे आपणा सर्वांना माहीत आहे. राजीनामा दिल्यानंतर ते गावाला गेले हे आपणा सर्वांना माहीत आहे. मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यामुळे त्यांना जे काही भोगावे लागले ते सर्वांना माहीत आहे. मुंबईवर अतिरेकी हल्ला झाला हे त्यांना समजल्यावर ते आपल्या चित्रकूट या शासकीय निवासस्थानावरून निघाले आणि थेट मुंबई पोलीस मुख्यालयात दाखल झाले. या हल्ल्यामुळे ते दोन दिवस झोपले देखील नव्हते. राज्यातील जनतेची व संकटात सापडलेल्या जनतेची कशी व्यवस्था करायची या विवंचनेत ते होते. त्यातूनच त्यांच्या तोंडून एक शब्द निघाला आणि त्यावरून वादंग उठविण्यात आला. दुर्दैवाने त्यांना मध्यरात्री राजीनामा द्यायला सांगितला. त्यावेळी त्यांनी कोणतेही आढेवेढे न घेता पहाटे आपल्या पदाचा राजीनामा दिला. एवढेच नव्हे तर स्वतःचा शासकीय बंगला, गाडी त्यांनी लगेचच सोडून ते गावाला निघून गेले.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे.....

मी येथे राजकीय अभिनिवेषाने बोलत नाही. काही गोष्टी त्यांच्या मनाला पटत नव्हत्या. ती घटना त्यांच्यासारखा हळव्या मनाला निश्चितपणे लागणारी आहे. असा हळवा माणूस आपल्यातून निघून गेला आहे. आबांबद्दल जेवढे बोलावे तेवढे कमी आहे. आबांच्या जाण्यामुळे त्यांच्या कुटुंबाचे मोठे नुकसान झालेच आहे, परंतु महाराष्ट्राचे आणि माझे व्यक्तिगत नुकसान झालेले आहे. आबांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना आदरांजली अर्पण करतो.

या सदनाचे माजी सदस्य श्री.परशुराम मारुती चव्हाण यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करतो.

कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्याशी माझा फार संपर्क आला नाही. 2013 मध्ये त्यांची आणि माझी पहिली भेट झाली. मराठा आरक्षणासंबंधी परिषद घेतली होती त्यावेळी मी त्यांना निमंत्रित करण्यासाठी गेलो होतो. माझी त्यांच्याशी बरीच चर्चा झाली. त्यांनी त्यांचे स्पष्ट मत माझ्यासमोर मांडले. त्यांच्या वक्तव्यावरुन मला समजले की, ते स्वत:च्या निर्णयाशी ठाम राहतात, परंतु दुसऱ्याच्या विचाराचा देखील आदर करतात, असा हा नेता होता. नंतर त्याच्याशी अनेकवेळा भेट होत होती. मी कोल्हापूरला गेलो तर त्यांची भेट घेत होतो इतके आमचे चांगले संबंध झाले होते. अशा माणसावर हल्ला झाला आणि त्यात त्यांचे दु:खद निधन झाले हे निश्चितपणे महाराष्ट्राला भूषणावह नाही.

श्री.आर.आर.पाटील,श्री.परशुराम चव्हाण आणि कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना आदरांजली अर्पण करुन माझे भाषण पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.वसंतराव डावखरे (उप सभापती) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी आर.आर.पाटील, वि.स.स. व माजी उपमुख्यमंत्री, श्री.परशुराम मारुती चव्हाण, माजी वि.प.स. आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या दु:ख निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला, त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.आर.आर.पाटील यांच्याबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी आबांबद्दल संक्षिप्त स्वरुपात एवढेच सांगेन की, जन्म आणि मृत्यू यामध्ये जो जगतो त्याला आपण जीवन म्हणतो. इतरांना आदर्श ठरावा अशा प्रकारचे जीवन आबा जगले. त्यांच्या आजारपणात मी त्यांना सातत्याने भेटत होतो. आबांवर अंत्यसंस्कार होत होते त्यावेळी माझ्या मनात एकच भावना आली की,

उधळू नका हो फुले तयावर,
जन्मभर तो फुलतची होता
जाळू नका हो कलेवर तयाचे
जन्मभर तो जळतची होता

असे आदर्शवत जीवन आबा जगले. आबा यांच्या दु:खद निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो.

या सदनाचे माजी सदस्य श्री.परशुराम चव्हाण यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करतो.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते व पुरोगामी विचारवंत कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यामध्ये त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या कार्याचा वसा पुरोगामी महाराष्ट्र पुढे सुरु ठेवेल. त्यांना देखील मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी या ठिक्राणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी दिवंगताबद्दल आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आर.आर.पाटील यांच्याबद्दल ऐकत असताना माझ्या मनामध्ये वेगवेगळ्या पद्धतीचे तरंग उमटत होते. तंबाखूच्या व्यसनाने आबांचा घात केला असा एक सार्वत्रिक निष्कर्ष काढला तर तो चुकीचा आहे, असे मी म्हणणार नाही. त्यांना ते व्यसन होते, परंतु त्या पेक्षाही त्यांना एक जबरदस्त व्यसन होते. राजकारणात राहूनही माझ्या स्वच्छ प्रतिमेवर एक छोटासा देखील डाग माझ्या आयुष्यात येऊ देणार नाही असे एक त्यांना व्यसन होते. हे व्यसन जीवापाड जपत असताना खाजगी आणि सार्वजनिक आयुष्य यातील रेषा धूसर होत जातात. त्याला खाजगी आयुष्य राहतच नाही. ज्या समाजात जो घडतो, त्याचे नेतृत्व तो करतो, त्यामुळे त्यांच्या सर्व वागण्या बोलण्यावर एक प्रकारचा अंमल त्या व्यक्तिमत्वावर सातत्याने राहतो. स्वच्छ राहिले पाहिजे, प्रामाणिक राहिले पाहिजे, लोकांसमोर जाताना कर्तव्यनिष्ठ राहिले पाहिजे अशा अपेक्षा वाढत जातात. शेवटी कोणीही सामान्य परिस्थितीतून आलेला, राजकारणात मोठा झालेला, मंत्री पदावर पोचलेला माणूस मुंबईत स्वत:चे घर मिळाल्यावर कुटुंबाला मुंबईत घेऊन येतो कारण त्याला कुटुंबाबरोबर राहणे आवश्यक असते. परंतु माझ्या गावातील मातीशी असलेले नाते कधीच तोडणार नाही अशी आबांची प्रतिमा होती. मी मुंबईत असलो तरी माझे कुटुंब गावात राहील, शेतीत राहील, मातीत राहील. जिल्हा परिषदेच्या शाळेत राहील. माझा उत्कर्ष होऊ शकतो तर तेथेही त्यांचा उत्कर्ष होणार आहे याची मनापासून खात्री असलेला हा एक माणूस होता. राजकारणात असे म्हणतात की, "A politics is an art of managing contradictions." वेगवेगळे अंतर्गत विरोध सांभाळत आपला रस्ता पुढे काढायचा. त्यांच्या अनेक उपक्रमांची माध्यमांनी एकप्रकारची खिल्ली उडवायला कमी केले नाही. छमछम वाजणारे बार पोलीस आज बंद करतील, पण पोलिसांची पाठ फिरल्यावर चालू होतील. परंतु डान्स बारमुळे किती तरी घरेदारे मोडून पडली, संसार उद्ध्वस्त झाले,आया-बहिणी रस्त्यावर आल्या. या नादामुळे नादावलेले तरुण ज्या घराची वासलात लावतात त्या पिढीला वाचविण्यासाठी एक पाऊल उचलणे आवश्यक होते. त्याची कितीही टिंगल केली तरी ते समाज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.....

परिवर्तनासाठी टाकलेले एक भरभक्कम पाऊल होते. आबांनी घेतलेल्या सर्वच निर्णयाबद्दल असे म्हणता येईल.

सभापती महोदय, आबा गृह मंत्री असताना त्यांच्या वर्तणुकीमध्ये पोलिसी खाक्या कधीच नव्हता. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते म्हणाले त्याप्रमाणे शेवटचा कॉन्स्टेबल देखील म्हणायचा, आबा, माझे हे छोटेसे काम करा म्हणून केव्हाही त्यांना फोन करायचे आणि आबा त्यास उत्तर द्यायचे. एवढेच कशाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात आबांचे शव दर्शनासाठी ठेवले होते त्यावेळी बंदोबस्तासाठी आलेल्या पोलिसांपैकी एक तरुण पोलीस आमच्या जवळ आला आणि म्हणाला, आबांनी पोलीस निवडीसाठी जी पद्धती अवलंबिली होती त्यामुळे आम्ही आज पोलीस विभागात कार्यरत आहोत. आबा नाहीत हे सत्य स्वीकारला आम्ही तयार नाही."

सभापती महोदय, आबांना विधिमंडळाकडून "उत्कृष्ट संसदपटू" पुरस्कार मिळालेला आहे. मला वाटते उत्कृष्ट वक्ता असा एक नवीन पुरस्कार विधिमंडळाने सुरु करुन त्यास आबांचे नाव दिले तर त्यांना ती यथोचित श्रद्धांजली होईल, त्या दृष्टीने शासनाने विचार करावा अशी मी नम्र विनंती करतो.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, कॉम्रेड पानसरे यांच्या शोक प्रस्तावावर बोलत असताना, ती हत्या होती की वध होता असा कीस काढण्याचे मला कारण नाही. परंतु शोषित प्रवृत्तीच्या असलेल्या महाराष्ट्रामध्ये, विचारांचा लढा विचारांनी लढावा आचारांनी लढू नये, अशी शिकवण असलेल्या महाराष्ट्रामध्ये वातावरण फार वेगाने बदलत आहे. यामागे ज्या शक्ती काम करीत आहेत त्यांना प्रोत्साहन आणि पाठबळ दिले जात आहे. त्यामुळे त्या शक्ती पुन्हा डोके वर काढत आहेत. महाराष्ट्राच्या भविष्याच्या दृष्टीने ही अतिशय धोक्याची घंटा आहे असे मला वाटते. पानसरेंसारखा एक विचारवंत माणूस वयाच्या 81-82 व्या वर्षापर्यंत सतत सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून काम करीत रस्त्यावर उभे असताना, त्या निष्पाप वृध्दांची घृण हत्या होते. आपण म्हणतो की, काही लोकांच्या निधनामुळे आपल्याला दु:ख होते आणि काही लोकांच्या निधनामुळे आपल्याला शॉक बसतो. महाराष्ट्राला कॉम्रेड पानसरेंच्या निधनाचा एक प्रचंड मोठा शॉक बसलेला आहे. यातून सावरायचे असेल तर शासनाने याकडे वेगळ्या पध्दतीने बघितले पाहिजे. नरेंद्र दाभोळकरांची हत्या झाली, पण त्यांचे मारेकरी सापडले नाहीत असे सांगून उपयोगाचे नाही. तेव्हा आपण मंडळी सत्तेत नव्हता, दुसरे सत्तेत होते. नरेंद्र दाभोळकरांचे मारेकरी सापडले नाहीत म्हणून पानसरेंचे मारेकरी सापडत नाहीत हा चुकीचा युक्तीवाद कृपया आपण करु नका. ताबडतोब पोलिसांच्या सर्व यंत्रणांच्या माध्यमातून या हत्या करणाऱ्यांचा शोध घेतला तर ते यश मिळणे कठीण नाही. या माध्यमातून समाजाला दिलासा देण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारच्या हत्या खपून जातात असा संदेश गेला तर चुकीच्या शक्ती अधिक वेगाने डोके वर काढतील आणि महाराष्ट्राचे सामाजिक जीवन गढूळ करतील आणि त्याला परिसीमा राहणार नाही. त्यामुळे हा प्रश्न अतिशय गांभीर्याने घेतला पाहिजे. कम्युनिस्ट चळवळीत वाढलेली सगळीच विचारवंत माणसे एका विचाराशी निष्ठेने पक्की असतात. साहित्यातून ते आपले विचार प्रसारित करतात. नेहमीच्या पध्दतीच्या साहित्यापेक्षा हे साहित्य समाजाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून कॉम्रेड पानसरेंचे सर्व साहित्य महाराष्ट्र शासनाने आपल्यामार्फत प्रकाशित करुन ते लोकांना उपलब्ध करुन द्यावे अशीही मी सूचना करतो.

महोदय, या सभागृहाचे माजी सदस्य श्री.परशुराम मारुती चव्हाण यांचे दु:खद निधन झाल्याबद्दल शोक प्रकट करुन मी माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर माझ्या संवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, काही व्यक्ती, काही नेते आपला ठसा उमटवून जातात आणि ते आपण विसरु शकत नाही. आबांच्या बाबतीत सुध्दा हेच घडले आहे. आबांनी महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेचा इतिहास निर्माण केला. परंतु तो इतिहास चुकीच्या पध्दतीने लिहिला जाऊ नये किंवा त्यात काही उणिवा राहू नयेत म्हणून मी दोन मिनिटात माझे म्हणणे मांडणार आहे. वास्तविक पाहता आपण मला तीन मिनिटे बोलण्याची संधी दिलेली आहे.

महोदय, आबांनी तंटामुक्ती अभियान आणि संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान राबविले. तसेच त्यांनी डान्सबार बंदी सुध्दा केली. आबांनी केलेल्या या सर्व बाबी सांगत असताना माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, आबा हे सर्वसामान्यांना आपला नेता वाटायचे, शिपायांना आपला नेता वाटायचे. तसेच ते गरिबांना, आदिवासी लोकांना, भटक्या विमुक्तांना, शेतकऱ्यांना आपला नेता वाटायचे. आपल्या पक्षाव्यतिरिक्त इतर पक्षाच्या नेत्यांना सुध्दा ते आपला नेता वाटायचे, अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

सभापती महोदय, मी दर 5 जानेवारीला आझाद मैदान येथे मोर्चा काढत असतो. आदरणीय गोपीनाथ मुंडे हे नेहमी माझ्या मोर्चाला यायचे. 2000 साली मी काढलेल्या मोर्चासाठी गोपीनाथ मुंडे येऊ शकले नाही. मी त्यांना म्हटले की, साहेब, आपण कुठल्या तरी मंत्र्यांना बोलाविले पाहिजे. मला मुंडे साहेबांनी सांगितले की, तुम्ही आबांना बोलवा. मी आबांना बोलाविले आणि त्यांना बंजारा समाजाच्या सर्व व्यथा सांगितल्या. मी त्यांना सांगितले की, बंजारा समाज हा तांड्या, वस्त्यामध्ये राहतो. पण तेथे रस्ता, वीज, शाळा इत्यादी बाबी नाहीत. महोदय, आबांनी दुसऱ्याच दिवशी या विषयी बैठक घेतली. त्यांनी या समाजासाठी जे केले त्याची इतिहासात नोंद झाली पाहिजे यासाठी मी हे सांगत आहे. आबा हे ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी तांडा सुधार योजना सुरु केली. महोदय, आबांनी मला सांगितले की, राठोड साहेब, मी अनेक तांड्यांच्या ठिकाणी जातो, परंतु त्या ठिकाणी सुविधा नाहीत. आज तांडा सुधार योजनेच्या माध्यमातून प्रत्येक तांड्याला 10 लाख रुपयांचा जो विकास निधी मिळतो त्याचे श्रेय केवळ आबांनाच आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड....

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, पारधी समाजासाठी आबांनी मोठे काम केले. या समाजासाठी दरवर्षी आर्थिक नियोजनात 25 कोटी रुपये बाजूला ठेवले. पण त्यातील एक पैसाही खर्च होत नव्हता. मी पारधी समाजाचे प्रश्न घेऊन आबांकडे गेलो. ते म्हणाले, राठोड, गरिबांबद्दल कोणाला काही करावेसे वाटत नाही आणि आपल्या अधिकाऱ्यांना तर काहीच नको आहे. त्यांनी सांगितले की, मी या समाजासाठी सातत्याने दोन वर्षे 25-25 कोटी रुपयांची आर्थिक नियोजनात तरतूद करीत आहे, पण त्यातील एक पैसाही खर्च होत नाही. महोदय, असाच एक विषय जातीच्या दाखल्यांच्या बाबतचा होता. आबांनी सोलापूर जिल्ह्यात मेळावा घेऊन जातीच्या दाखल्यांचे वाटप केले. आज हजारो लोकांना जातीचे दाखले मिळत नाहीत, तरी सुध्दा आम्ही काही करु शकत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, काही ऐतिहासिक गोष्टी असतात, त्या सांगितल्या पाहिजेत. पारधी समाजासाठी आबांनी काय काम केले हे मी सांगितले. कोपरापासून ढोपरापर्यंत सोलण्याची जी भाषा वापरली त्या बाबत मी आणि शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी, आम्ही दोघे जेव्हा खासदार होतो तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत हा प्रश्न उपस्थित केला होता. आम्ही सांगितले की, यवतमाळ जिल्ह्यात सर्वात जास्त आत्महत्या होतात. त्याला सावकार हेच कारणीभूत आहेत. त्यावेळी त्यांचे वाक्य होते की,....

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण एका मिनिटात भाषण संपविले नाही तर मला दुसऱ्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी लागेल.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, हजारो वर्षे आम्ही अन्याय सहन केला, येथेही सहन करु. तो प्रश्न नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड साहेब, अर्ध्या मिनिटात आपण आपले भाषण संपवावे. अन्यथा मला दुसऱ्या सन्माननीय सदस्यांना संधी द्यावी लागेल.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, मी याच ठिकाणी माझे भाषण संपवितो. पुन्हा एकदा दिवंगत आर.आर.पाटील, गोविंदराव पानसरे आणि परशुराम चव्हाण यांना आदरांजली वाहतो व येथेच थांबतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, निरागस चेहरा, स्मित हास्य, संवेदनशील आणि निर्मोही व्यक्तिमत्त्व म्हणजे आपल्या सर्वांचे 'आबा' होय. या शोक प्रस्तावावर बोलताना सर्वच वक्त्यांनी आपापली मते मांडली आहेत. आर.आर.पाटील साहेबांच्या बाबतीत बोलताना एक नेता कसा असावा हे मी एका उदाहरणाने सांगू इच्छितो. रुग्णालयात जी घटना घडली ते सांगून मी माझे भाषण संपवितो. महोदय, माननीय उपसभापती श्री.डावखरे साहेब यांच्या बरोबर मी आबांना भेटण्यासाठी रुग्णालयात गेलो होतो. त्यावेळी आबांचे लहान भाऊ तात्या हे आमच्याजवळ बसले होते. त्यावेळी आबा व्हेंटीलेटरवर होते. त्यांना जास्त बोलता येत नव्हते, परंतु लिहिता येत होते. त्यांनी तात्यांसाठी कागदावर लिहिले होते की, आपल्या भागातील पाण्याची सध्या परिस्थिती काय आहे ?

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. निरंजन डावखरे ....

आबांना त्यावेळी बोलता येत नव्हते. ते व्हेंटिलेटरवर होते. पण तरीही आपल्या भागातील लोकांना पाणी मिळत आहे की नाही, पावसाची परिस्थिती काय आहे याबाबत ते विचारीत होते. संवेदनशील व्यक्तीची, नेत्याची ही ओळख आहे. माझ्यासारख्या राजकारणात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला निश्चितपणे मनाला खूणगाठ बांधून ठेवण्याजोगी ही घटना आहे. मी निश्चितपणे या मोठ्या थोर व्यक्तीला मनापासून आदरांजली वाहतो.

सभापती महोदय, कॉ. गोविंदराव पानसरे ही व्यक्ती नव्हती तर पुरोगामी विचार होता. ते वयाच्या 15 व्या वर्षी कोल्हापूरात आले, त्यांनी तेथे वर्तमानपत्रे वाटण्याचे काम केले आणि शिक्षक म्हणून सेवाही केली. वेगवेगळी कामे करीत असताना त्यांनी समाजकार्यामध्ये स्वत:चा ठसा उमटविला. या मोठ्या, पुरोगामी विचार असलेल्या व्यक्तीवर झालेल्या हल्ल्याचा, तिच्या खूनाचा निषेध राज्यात निश्चितपणे होत आहे. कॉ. पानसरे यांच्या खुन्याला शोधणे फार महत्त्वाचे आहे. राज्यात वेगवेगळे प्रसंग उद्भवत आहेत. त्यामुळे राज्य शासनासाठी त्यांच्या खुन्याला शोधणे तेवढेच महत्त्वाचे आणि जिकरीचे राहील.

सभापती महोदय, श्री. परशुराम चव्हाण हे विधानपरिषदेचे सदस्य होते. ते ज्येष्ठ वकीलही होते. मी त्यांच्या निधनाबद्दलही शोक व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सदनाचे नेते श्री. एकनाथराव खडसे यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे. सन 2015 चा फेब्रुवारी महिना हा संपूर्ण राज्याला हादरवून सोडणारा ठरला. आमचे, महाराष्ट्राचे लाडके नेते, राष्ट्रवादीचे नेते श्री. आर.आर.पाटील साहेब यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांचा मृत्यू असा होईल असे कोणत्याही कार्यकर्त्याला किंवा जवळच्या लोकांना किंवा राज्यातील सर्वसामान्य माणसांना वाटत नव्हते.

सभापती महोदय, आबांनी घेतलेल्या अनेक निर्णयांतील डान्स बार बंदीच्या निर्णयाचा मी उल्लेख करीन. डान्स बार बंदीचा निर्णय अतिशय चांगला व सर्वसामान्य महिलांना दिलासा देणारा होता. परंतु, राज्यात असे वातावरण निर्माण करण्यात आले की, डान्स बार बंदीच्या निर्णयामुळे डान्स बारमधील मुली रोजीरोटीला मुकतील, त्यांच्यावर मोठा अन्याय झाला आहे. राज्यात त्या विरोधात मोर्चे काढण्यात आले, आंदोलने करण्यात आली.

सभापती महोदय, आम्ही त्यावेळी छबिलदास हायस्कूलमध्ये परिसंवाद ठेवला होता. त्यामध्ये विरोधी पक्षनेत्यांपासून सर्वांना बोलाविण्यात आले होते. त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, डान्स बार बंदीचा निर्णय राज्यासाठी खूप चांगला आहे. राज्यातील महिलांना आबांच्या मृत्यूने खूप दु:ख झाले आहे. पार्ले येथे मॅजेस्टिक गप्पा असतात. पार्ले येथील सुसंस्कृत लोकांनी टिळक मंदिरमध्ये आबांना बोलाविले होते. त्यावेळी लोकांनी त्यांना खोचक प्रश्नही विचारले होते. आबांनी त्या प्रश्नांना अत्यंत हसतखेळत, अत्यंत छान उत्तरे दिली होती. पार्ले येथील सर्व मध्यमवर्गीयांनी सुध्दा आबांच्या उत्तरांना दाद दिली होती. मला 2-3 प्रसंग आठवत आहेत.

सभापती महोदय, आबांच्या आईचे दु:ख खूप मोठे आहे. आबांनी उप मुख्यमंत्री होऊन आईला जगातील सर्वात मोठे सुख दिले आणि मृत्यूसारखे प्रचंड मोठे, डोंगरासारखे दु:ख दिले. मी त्यांच्या पत्नीला, मुलांना, प्रत्येक कार्यकर्त्याला दु:ख झेलण्याचे बळ मिळो अशी प्रार्थना करते. आबांचे कार्य मोठे होते. अंजनी गावात आबांचे खूप चांगल्याप्रकारे एक स्मारक उभे करावे अशी सुध्दा मी या निमित्ताने शासनाला मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आदरणीय नेते श्री. शरद पवार साहेब फ्रॅक्चर झालेल्या अवस्थेत सुध्दा आबांना बघण्यास लीलावती हॉस्पिटलमध्ये जायचे. त्यावेळी साहेबांना सुध्दा असहायता वाटत होती की, आपण आबांना वाचवू शकत नाही. प्रत्येक कार्यकर्त्याचे तेच दु:ख होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण ....

सभापती महोदय, दिनांक 20 ऑगस्ट, 2013 ला नरेंद्र दाभोळकर यांची हत्या झाली आणि तशीच दुसरी हत्या 5 वर्षांपूर्वी सतिश शेटट्ी या माहिती अधिकार चळवळीतील कार्यकर्त्याची झाली होती. 16 तारखेला कॉ. पानसरे आणि त्यांच्या पत्नी उमाताई यांच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या. कॉ. पानसरे यांच्या हत्येचा प्रचंड मोठ्या प्रमाणात निषेध करावा असे मला वाटते. कारण त्याच कॉ. पानसरे यांनी त्या आगेदर आपल्या भाषणात म्हटले होते की, कोण म्हणते हा महाराष्ट्र पुरोगामी राहिलेला आहे ? असा खडा सवाल फक्त कॉ. पानसरे यांनीच विचारला होता. कणखर देशा, राकट देशा, महाराष्ट्र देशा, असे हे आपले राज्य आहे. त्या महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या शाहू महाराजाच्या नगरीत जीवन व्यतित केलेल्या कॉ. पानसरे यांची हत्या झाली. एखाद्या अग्नीत तप्त होऊन घन कणखर होतो, तसे कणखर, विद्वान, दणकट, करारी बाणा त्यांच्या चेहऱ्यावर दिसायचा. कामगार, महिला, गोरगरीब, कष्टकरी जनता यांच्या लढ्याला सदैव बळ देणारे असे कॉ. पानसरे होते. दाभोळकर हे सौम्य, शांत आणि समाजवादी पण साने गुरूजीच्या पठडीतील रूपाचे होते. अशा या दोन्ही नेत्यांचा खून झाला आहे. कोणीतरी दबा धरून बसायचे आणि अतिशय प्लॅन करून हत्या करायची असा हा प्रकार आहे. एकाने हत्या करायची आणि एकाने आम्ही त्यातील नाही असे दाखवायचे असे चालले आहे. महात्मा गांधींजींची खुलेआम हत्या करणारी वृत्ती दबा धरून बसलेली आहे. मॉर्निंग वॉकला निघालेल्या व्यक्तींवर पाळत ठेवून जबरदस्त निडरपणे असामान्य नेत्यांची हत्या करणे अतिशय घृणास्पद आहे. मला वाटते की, प्रशासन, शासन असे सांगत असेल की, आम्हाला त्याबाबत काही माहीत नाही तर हे दुर्दैव आहे. मला सर्वांना सांगायचे आहे की, राज्याची कणखर जनता दबा धरून बसलेल्या खुन्यांना पकडल्याशिवाय राहणार नाही. मी कोल्हापूरला पोहचले त्यावेळी कॉ. पानसरे यांची चिता जोरात धगधगत होती. त्या चितेची अग्नी सुध्दा अनेकांना बळ, ऊर्जा देऊन गेली आहे. शासनाने तळमळीने लढणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण ....

सभापती महोदय, श्री. परशुराम चव्हाण यांचे देखील दु:खद निधन झाले आहे. तीनही मृत व्यक्तींच्या निधनाबद्दल त्यांना श्रध्दांजली वाहण्याचा प्रस्ताव ठेवला आहे, मी त्याला पाठिंबा देते आणि मृत व्यक्तींच्या आत्म्यास ईश्वर शांती देवो अशी प्रार्थना करते. धन्यवाद !

(अनेक सन्माननीय सदस्य भावना व्यक्त करण्यास संधी मिळण्याबाबत आग्रह धरीत असतात.)

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सदनात अत्यंत गंभीरपणे शोक प्रस्ताव मांडला जातो. आपण शोक प्रस्तावाच्या संदर्भात संकेत पाळत आहोत की, सभागृहाचे माननीय नेते शोक प्रस्ताव मांडतात, सन्माननीय विरोधी पक्षनेते त्यावर भावना व्यक्त करतात. तसेच, सन्माननीय गट नेतेही भावना व्यक्त करतात. एवढ्याच मर्यादेत शोक प्रस्ताव असतो. मी आता कोणालाही भावना व्यक्त करण्यासाठी परवानगी देणार नाही.

श्री. आर.आर.पाटील साहेब, श्री. परशुरामजी चव्हाण साहेब, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ. गोविंदराव पंढरीनाथ पानसरे यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाच्या माननीय नेत्यांनी शोक प्रस्ताव मांडला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यावर भावना व्यक्त केल्या आहेत. श्री. रावसाहेब रामराव ऊर्फ आर.आर.पाटील यांच्या तालुक्यामध्ये मी सन 1958 पासून 6 वर्षे नोकरीच्या निमित्ताने होतो.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती.....

मी त्यांच्या घरी अनेक वेळा गेलो आहे. त्यांच्या वडिलांचा आणि माझा व्यक्तिशः चांगला परिचय होता. त्यांच्या घरी मी पाच ते सहा वेळा जेवणही केले आहे. त्या काळात तासगाव-पूर्व विभागाची परिस्थिती अत्यंत भयावह होती. दुर्दैवाने त्या भागात पाणी नव्हते. शेतीमध्ये बागायती करण्याची शक्यता नव्हती. अशा परिस्थितीत एका अत्यंत साध्या कुटुंबात जन्मलेला, एक अत्यंत उमेदी, कुशाग्र बुध्दीचा, जबरदस्त ध्येयवादी तरुण आपल्या जीवनाला आकार देत होता. समाजाच्या दृष्टीने आर.आर.पाटील साहेबांच्या या सुरुवातीच्या आणि नंतरच्याही जीवनाचे संशोधन करणे गरजेचे आहे, असे मला वाटते. कारण, सर्व परिस्थिती प्रतिकूल असताना, अवतीभवती अन्य काहीही नसताना हा ध्येयवादी, विचारी तरुण त्यामधून बाहेर पडतो, हे सहजसोपे नव्हते. या संदर्भात मी एकच उदाहरण आपल्याला देईन.

सभागृहातील अनेकांनी हा प्रसंग आर.आर.पाटील साहेबांच्या आत्मचरित्रात वाचलाही असेल. वडील वारले त्यावेळी आर.आर.पाटील साहेब वयाने लहान होते. एकदा असा प्रसंग घडला की, अंगावर घालण्याकरिता कपडेच नाहीत, अशी अवस्था होती. त्यांनी आपल्या वडिलांचे कपडे हुडकून काढले, ते एका टेलरकडे गेले आणि त्याला त्यांनी सांगितले की, "हे कपडे मला अल्टर करुन द्या." टेलरने त्यांना असे सांगण्याचा प्रयत्न केला की, "मृत व्यक्तीचे कपडे पुन्हा घालायचे नसतात." त्यावर आर.आर.पाटील साहेबांनी सांगितले की, "ठीक आहे, तरीही मला ते कपडे अल्टर करुन द्या, ते माझ्याच वडिलांचे कपडे आहेत." आपल्या मुलाच्या अंगावर वडिलांचे कपडे बघितल्यानंतर त्यांच्या आईला खूप दुःख झाले. त्यावर त्यांनी विचारले की, "यावर उपाय काय आहे ?" एखादी व्यक्ती किती संकटात असू शकते, किती प्रतिकूल परिस्थितीमध्ये असू शकते, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

आर.आर.पाटील साहेब शिकत होते. त्यांच्या गावाला लागून सावळज हे एक मोठे गाव आहे. तेथील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी, स्वातंत्र्य सैनिकांनी त्यांचे खऱ्या अर्थाने लालनपालन केले आणि त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. आर.आर.पाटील साहेबांचे जीवन घडत असताना त्यांना अन्य कुणाचीही मदत झाली नाही. परंतु, या लोकांची त्यांना खूप मदत झाली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती.....

त्यामध्ये सर्व समाजाचे लोक होते. आर.आर.पाटील साहेबांचे अनेक कार्यकर्ते माझेही जवळचे सहकारी मित्र आहेत.

तासगाव तालुक्यात एखादा राजकीय कोंब दुसऱ्याच्या घरात निर्माण होणेच मुळात अवघड होते. अशा तालुक्यात आर.आर.पाटील साहेबांच्या माध्यमातून एक राजकीय कोंब कसा बहरला, यावर सुध्दा संशोधन करणे गरजेचे आहे, एवढी तेथील परिस्थिती कठीण होती. असे असताना आर.आर.पाटील साहेब तयार होत होते आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत होते. ते आपल्या शालेय आणि महाविद्यालयीन जीवनामध्ये उत्कृष्ट वक्ता म्हणून सर्वांना परिचित होते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी त्यांच्या बद्दल सांगताना "कमवा आणि शिका", या गोष्टीचा उल्लेख केला. अलीकडच्या काळात "कमवा आणि शिका", ही पध्दत खूप कमी बघावयास मिळते. परंतु, 30-40 वर्षापूर्वी लोकांची आर्थिक परिस्थिती वाईट होती. गावातून बाहेर पडणेच मुळात कठीण होते. शिकायचे असेल तर तीन तास काम करा, बोर्डिंगमध्ये जेवण करा आणि शिका, अशी परिस्थिती होती. बोर्डिंगमध्ये सुध्दा भाकरी आणि आमटी या शिवाय काही मिळत नसे. महिन्यातून दोन-तीन वेळाच फक्त भात मिळायचा. अशा परिस्थितीत जबरदस्त ध्येयवादाने प्रेरित झालेला तरुण सांगली जिल्ह्यामध्ये तयार होत होता.

त्यानंतरच्या काळात सन्माननीय श्री.पी.बी.पाटील साहेबांनी त्यांना फार चांगली मदत केली. स्व.वसंतदादा पाटील साहेबांच्या नजरेत हा तरुण आला आणि तेथून ते पुढे आले. सांगलीतील जिल्हा परिषदेची निवडणूक सुध्दा अवघड होती. परंतु, या तरुण आणि ध्येयवादी मुलाने सावळज मतदारसंघामधून निवडणूक लढविण्याचे निश्चित केले. तेथील लोकांनीही असे ठरविले की, काहीही झाले तरी आर.आर.पाटील यांना निवडून द्यायचे आणि पुढे सांगलीच्या राजकारणात नेऊन सोडायचे. अशा पध्दतीने आर.आर.पाटील जिल्हा परिषदेत निवडून आले. सांगलीमध्ये राहणे सुध्दा महाकठीण होते. परंतु, काही लोकांनी सांगली शहरात त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. जवळ जवळ 10 ते 11 वर्ष जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांनी अतिशय प्रभावीपणे काम केले. प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करणे, ही त्यांची सवय होती. एखाद्या अधिकाऱ्याने एखाद्या कामास नकार दिला की, आर.आर.पाटील साहेब सर्व शासन निर्णय, नियम वाचून काढत असत. हे एक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती.....

त्यांचे वैशिष्ट्य होते. अशा प्रकारचा कार्यकर्ता कसा तयार झाला, असा प्रश्न माझ्यासारख्याला पडतो. एका जबरदस्त जिद्दीने ते त्या प्रश्नाच्या पाठीमागे लागत असत आणि त्या अधिकाऱ्याला दाखवून देत असत. काम झाले नाही तर आम्हाला बंड पुकारावे लागेल, असाही पवित्रा ते कधीतरी घेत असत. जिल्हा परिषदेमध्ये असताना त्यांच्या कार्यकाळात दोन अध्यक्ष होऊन गेले. या दोन्ही अध्यक्षांना टार्गेट करायचे, विधायक पध्दतीने त्यांच्यावर हल्ला करायचा आणि त्यामुळे आर.आर.पाटील साहेबांच्या मतदारसंघातील सर्व कामे आपसूक होत असत. अशा प्रकारे त्यांनी त्यांचा राजकीय पाया कणखरपणे उभा केला.

आर.आर.पाटील साहेबांना विधानसभेचे तिकीट सहज मिळाले, असे अनेकांना वाटते. स्व.वसंतदादांचे त्यांच्यावर जरुर प्रेम होते. गेल्या 40 वर्षामध्ये माझे आणि आर.आर.पाटील साहेबांचे व्यक्तिगत संबंध होते. ते मला मुलासारखे होते. ज्यावेळी त्यांना विधानसभेचे तिकीट देण्याचा प्रसंग आला त्यावेळी त्यांच्या तिकीटासाठी दिल्लीमध्ये फार मोठा अडसर निर्माण झाला होता. तो अडसर कुणी उभा केला, हे मी येथे सांगणार नाही. पण तासगाव हे आर.आर.पाटील साहेबांचे तालुक्याचे गाव आणि विटा हे अनिल बाबर यांचे तालुक्याचे गाव होते. आर.आर.पाटील यांना तिकीट न देता अनिल बाबर यांना द्यावे, यासाठी या दोन्ही गावांमध्ये बंद पाळला गेला. मला दिल्लीमध्ये काँग्रेस श्रेष्ठींकडून असे विचारले गेले की, दोन्ही तालुक्यांमध्ये बंद पाळला गेला असताना How you recommend Mr.R.R.Patil ? मी त्यांना एवढेच सांगितले की, एखाद्या ठिकाणी 25 दगड मारल्यानंतर सगळे गाव बंद होते. आर.आर.पाटील आणि तेथील दुसरे आमदार यांना 100 टक्के तिकीट द्यावयाचे आहे. मग प्रश्न असा आला की, तेथील जे सिटिंग आमदार होते त्यांचे काय करायचे ? मी सांगितले की, त्यांना आपण जिल्हा परिषदेचे अध्यक्ष करु. त्यादृष्टीने पाच दिवस चर्चा होऊन मोठ्या मुश्कीलीने तिकीट मिळविण्यात आर.आर.पाटील साहेब यशस्वी झाले.

आर.आर.पाटील साहेबांच्या विधानसभेच्या सहाच्या सहा निवडणुका अवघड झाल्या. आर.आर.पाटील साहेबांच्या जीवनात सहजसाध्य यश मिळाले, असे कधी झालेच नाही. त्यांना सातत्याने संघर्ष करावा लागला. लोकांनी जरुर त्यांच्यावर प्रेम केले, त्यांनीही लोकांवर प्रेम केले,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती.....

पण त्यांना संघर्ष करावा लागला, हेही खरे आहे. सहाव्या निवडणुकीत संघर्ष करावा लागला आणि पहिल्या निवडणुकीतही संघर्ष करावा लागला. अशा संघर्षातून तयार झालेले आर.आर.पाटील साहेबांचे व्यक्तिमत्त्व होते.

आर.आर.पाटील साहेबांनी मंत्री म्हणून किंवा उप मुख्यमंत्री म्हणून ज्या विविध खात्यांमध्ये काम केले आहे, त्याबद्दलची भरपूर चर्चा सन्माननीय सदस्यांनी येथे केलेली आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती...

मी त्यांना असे सांगितले होते की, गडचिरोली जिल्ह्याचे तुम्ही पालकमंत्रीपद स्वीकारले ते चुकीचे आहे. तुम्ही राज्याचे नेते आहात, हजारो लाखो सामान्य माणसांची खऱ्या अर्थाने तुम्ही शक्ती आहात. या दृष्टीने काम करीत असताना नेत्याने साहस करायचे नसते. माझ्या भागातील 100 माणसे गडचिरोली भागात नोकरी करीत आहेत. त्यांनी मला भेटून असे सांगितले होते की, तेथील काही लोक श्री.आर.आर.पाटील यांच्या संदर्भातील संपूर्ण माहिती विचारण्याचा प्रयत्न करीत होते. त्यावेळी मी श्री.आर.आर.पाटील यांना तीन वेळा बोलावून सांगितले होते की, तुम्ही जो प्रयोग करीत आहात तो तुमच्या जिवावर बेतणारा होऊ शकतो. त्यामुळे असे आपण करु नका. असे साहस नेत्याने करणे बरोबर नाही. मंत्री महोदय श्री.एकनाथराव खडसे व इतरांना माझा वडिलकीचा सल्ला आहे की, नेत्याने साहस करुन चालत नाही. कारण नेता वाचला पाहिजे, हा विचार आपण सर्वांनी केला पाहिजे. श्री.आर.आर.पाटील यांना जे व्यसन होते ते माझ्यासारख्या सहा लोकांना देखील लागले होते. सुरुवातीला ते खूप कमी तंबाखू खात होते. त्यातून दुर्दैवाने त्यांना व्यसन लागले होते. 23 वर्षापूर्वी मला एका डॉक्टरने सांगितले होते की, दोन वर्षात तुम्ही मरणार आहात. तुम्ही तंबाखू सोडली तरच वाचाल. तेव्हा पासून म्हणजे मी 23 वर्षापूर्वीच तंबाखू सोडली आहे. श्री.आर.आर.पाटील यांना आम्ही सांगत होतो की, आपण काय वाटेल ते करा पण तंबाखू खाणे सोडून द्यावे. दुर्दैवाने त्यांचे व्यसन सुटले नाही. मी एक उदाहरण देतो ते योग्य आहे किंवा कसे मला माहिती नाही. श्री.आर.आर.पाटील यांचे अकाली निधन झाले त्याच प्रमाणे सयाजी महाराज गायकवाड हे फार मोठे होते. मी यादृष्टीने उदाहरण देतो की, ज्यावेळी गायकवाड घराण्यात दत्तक घेण्याचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी सर्व मुलांना बोलविण्यात आले होते. प्रत्येक मुलगा तेथे येऊन बसला होता. हा 6 वर्षाचा मुलगा पुढे गेला व सरळ सिंहासनावर जाऊन बसला होता. त्याला विचारले की, तू का आलास, त्यावेळी त्यांने सांगितले की, मी राजा होण्यासाठी आलो आहे. श्री.आर.आर.पाटील यांचे जीवन या पध्दतीचे होते. ते प्रयत्न करीत होते, धडक देत होते, कोणी विचारले तर सांगत होते. मी खऱ्या अर्थाने नेता व कार्यकर्ता होण्यासाठी आलो आहे. या पध्दतीचे श्री.आर.आर.पाटील यांचे नेतृत्व होते. श्री.आर.आर.पाटील यांचा दुखवटा कार्यक्रम कार्यकर्त्यांनी घेतला होता त्यावेळी देखील मी सूचित केले होते की, श्री.आर.आर.पाटील यांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती...

सहकार्यांनी श्री.आर.आर.यांना वाचविण्याकरिता खूप मोठा प्रयत्न केला आहे. माझी अशी विनंती आहे की, आपण सर्व पक्षांनी विचार करुन एखादा ट्रस्ट काढण्याचा प्रयत्न करावा. कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता अशा प्रकारे आजारी पडला तर त्याला वाचविण्याच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. हा ट्रस्ट आर.आर.पाटील यांच्या नावाने काढण्याचा आपण प्रयत्न करु या. एखादा कार्यकर्ता अशा पध्दतीने संकटात आला तर त्याच्या पाठीमागे आपण सर्वजण उभे राहिलो पाहिजेत. श्री.आर.आर. पाटील यांच्या घरची परिस्थिती अत्यंत कठीण होती. मी त्यांना अनेक वेळा सांगितले होते की, तुम्ही मंत्री म्हणून मुंबईत राहत आहात व तुमच्या मुलांनी तासगांव किंवा अंजनी येथे राहणे ही पध्दत योग्य नाही. आम्ही सर्वांना सांगून देखील त्यांना ही बाब पटली नाही. श्री.आर.आर.पाटील व माझे व्यक्तिगत संबध होते. दुर्दैवाने ते आपल्यातून निधून गेले आहेत.

त्याचप्रमाणे माजी विधानपरिषद सदस्य श्री.परशुराम मारुती चव्हाण यांचा जन्म 25 फेब्रुवारी, 1935 रोजी पुणे जिल्ह्यात झाला. चव्हाण हे अत्यंत निष्णात वकील होते. सर्व सामान्याच्या हिताकरिता ते सातत्याने काम करीत होते.श्री.परशुराम चव्हाण हे राज्यपाल यांच्याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवर 1980 मध्ये नियुक्त झाले होते. त्यांचे निधन 27 जानेवारी, 2015 रोजी झाले आहे.

त्याचप्रमाणे एक जबरदस्त व्यक्तिमत्व व ज्यांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो असे कॉ.गोविंदराव पंढरीनाथ पानसरे व मी महाविद्यालयात 1954 ते 1958 या काळात एकाच वेळी शिक्षण घेत होतो. त्याकाळात देखील एक तरुण, ध्येयवादी व जबरदस्त संघर्ष करणारा विद्यार्थी या दृष्टीने त्यांची व माझी ओळख होती. त्या नंतरच्या काळात सातत्याने वेगवेगळ्या चळवळीत भाग घेणे. लोकांना अचूक मार्गदर्शन करणे. गरिबांच्या पाठीशी उभे राहून त्यांच्या अनेक अडचणी व जटिल प्रश्न सोडविणे. कितीही कठीण प्रसंग असला तरी त्यासाठी सातत्त्याने लढा देणे, या दृष्टीने कॉ.गोविंद पानसरे यांनी कोल्हापूर व संपूर्ण महाराष्ट्रात डाव्या विचारसरणीची चळवळ उभी केली होती. त्या माध्यमातून हजारो व लाखो लोकांना त्यांनी मदत केली होती. कॉ.गोविंद पानसरे यांचे दु:खद निधन झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती...

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे, प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज आता संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 10 मार्च 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 58 मिनिटांनी मंगळवार दिनांक 10 मार्चच्या दुपारी 12 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION